
जून २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




## लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन !



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट

| | |
|---|---|
| चौंडी येथे सुशीलाबाई व माणकोजी शिंदे यांच्या पोटी जन्म | ३१ मे १७२५ |
| खंडेराव होळकरांशी विवाह | १७३३ |
| पुत्रप्राप्ती (मालेराव) | १७४५ |
| कन्यारत्न प्राप्त (मुक्ताबाई) | १७४८ |
| पती खंडेराव यांचा मृत्यू | १७ मार्च १७५४ |
| गौतमाबाईंचा मृत्यू | २९ सप्टेंबर १७६१ |
| जयपूर, उदयपूर, झांशी येथे मल्हाररावांची मोहीम | १७६३ ते १७६६ |
| मल्हारराव होळकरांचा मृत्यू | २० मे १७६६ |
| पुत्र मालेरावांस सुभेदारीची वस्त्रे | ३ जून १७६६ |
| मुक्ताबाईंचा यशवंतराव फणसेंशी तर मालेरावांचा वाघांच्या कन्येशी विवाह | १७६६ |
| पुत्र मालेरावांचा मृत्यू | २७ मार्च १७६७ |
| राघोबा व अहिल्यादेवी यांच्यात संघर्ष | जून १७६७ |
| मुक्ताबाईस पुत्रप्राप्ती (नथ्याबा) | १७६७ |
| अहिल्यादेवी व तुकोजी यांच्यात वितुष्ट | १७७९ |
| नातू नथ्याबा याचे लग्न | १७८० |
| महादजी शिंदे आणि अहिल्यादेवी यांची भेट | १७८१ |
| अहिल्यादेवी आणि तुकोजीमधील वितुष्टात वाढ | १७८२ |
| बंधु महादजी यांचा मृत्यू | १७८४ |
| बंधु शहाजी यांचा मृत्यू | १७८६ |
| राजपुतांचा बीमोड आणि युद्धात विजय | १७८७ |
| नथ्याबाचा मृत्यू | १५ नोव्हेंबर १७९० |
| जावई फणसे यांचा मृत्यू व मुक्ताबाई यांचे सहगमन | ३ नोव्हेंबर १७९१ |
| होळकर आणि शिंदे यांच्यात लढाई | १७९२ |
| नर्मदेकाठी महेश्वर येथे महानिर्वाण | १३ ऑगस्ट १७९५ |

## ६ अलौकिकतेला अभिवादन

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावन पर्वानिमित्ताने चौंडी येथे शासन प्रशासन गेले ते मंत्रिमंडळ बैठकीची औपचारिकता पूर्ण करायची म्हणून नाही, तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा आशीर्वाद, त्यांच्या विचारांची शिदोरी पुन्हा गाठीशी बांधून घेण्यासाठी...

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

## ७ महाराष्ट्राची लोकमाता!

महाराष्ट्राने या देशाला अनेक रत्ने दिली आहेत. त्यापैकी एक अनमोल रत्न म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर... अहिल्यादेवींच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वानुसार राज्यातील महायुती सरकार सामान्यांसाठी काम करीत आहे.

**- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

## ८ सर्वश्रेष्ठ स्त्री राज्यकर्त्या!

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करत असताना त्यांनी त्या काळात दाखविलेली दूरदृष्टी, घेतलेले निर्णय, केलेले कार्य आजच्या राज्यकर्त्यांसाठीही मार्गदर्शक, प्रेरणादायी आहे.

**- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

## ३५ अन्न हे पूर्णब्रह्म!

संयुक्त राष्ट्राच्या डिसेंबर २०१८ मध्ये पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये 'जागतिक अन्नसुरक्षा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि पहिला 'जागतिक अन्नसुरक्षा दिवस' ७ जून २०१९ रोजी जगभरात साजरा केला.

**- नरहरी झिरवाळ, अन्न व औषध प्रशासन मंत्री**


अहिल्यादेवींना जन्मभूमीत मंत्रीपरिषदेचे अभिवादन — ९
प्रवीण कुलकर्णी

लोकोत्तर कार्याचा आदर्श! — १२
डॉ. देवीदास पोटे

लोककल्याणकारी धर्मपरायणता! — १५
प्रा. ग. वा. कवीश्वर

समाजकार्याचे व्रत! — १७
डॉ. मंजुषा कुलकर्णी

एक तात्त्विक रूप! — १९
शांता ज. शेळके

राजयोगिनी अहिल्यादेवी — २१
डॉ. मो. दि. पराडकर

दातृत्वातून सांस्कृतिक एकता — २४
डॉ. बालकृष्ण पंजाबी

गौरव तेजस्वी स्त्रीशक्तीचा 'पुण्यश्लोक ३००' उपक्रम — २५

चांदवडचा रंगमहाल — २६
शरद बर्वे

आदर्श स्त्री नेतृत्वाला वंदन! — २७
वर्षा फडके-आंधळे

अहिल्यादेवींचे वेगळेपण! — २८
हीरालाल शर्मा

द्रष्ट्या लोककल्याणकारी! — ३०
डॉ. सुलोचना पाटील

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना — ३२
संध्या गरवारे

एक मार्गदर्शक दीपस्तंभ — ३३
सुदर्शन दहातोंडे

अन्नसुरक्षेसाठी कटिबद्ध — ३६
योगेश कदम, राज्यमंत्री, अन्न व औषध प्रशासन

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् — ३७
राजेश नार्वेकर, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन

अन्न संपुष्टीकरणाचे महत्त्व — ३८
ऋषिकेश मरेवार

अन्नपदार्थांवरील लेबलिंग — ४०
गौरी जोशी

अन्नसुरक्षा कवच — ४२
नारायण सरकटे

आरोग्यदायी अन्नपूरके — ४४
सायली टाव्हरे

उदयोन्मुख सेंद्रिय बाजारपेठ — ४६
योगेश देशमुख

अन्नसंजीवनी! — ४८
मिलिंद महांगडे

मनोरंजनविश्वाची मुंबईवारी सर्जननिष्ठांची मांदियाळी — ४९
सागरकुमार कांबळे

'महिला व बालविकास'ची सुप्रशासनात आघाडी — ५२
श्रद्धा मेश्राम

विद्यार्थ्यांसाठी 'अटल' उपक्रम — ५४
चंद्रकांत पाटील, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

राष्ट्रीय शिक्षण धोरण : शाश्वत विकासाकडे वाटचाल — ५५
ब्रिजकिशोर झंवर

वाळू निर्गती धोरण — ५७
ब्रिजकिशोर झंवर

वर्ष ७६ वे | अंक ५ | जून २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
- विशेष साहाय्य — बाबा भांड, डॉ. देवीदास पोटे
- संपादक — केशव करंदीकर
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या स्मृतीस्थळास ६८१ कोटी



पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मगाव असलेल्या मौजे चौंडी (ता.जामखेड, जि. अहिल्यानगर) येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाचे जतन व संवर्धन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या ६८१ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासंदर्भातील निर्णय नियोजन विभागाने नुकताच जारी केला आहे. या आराखड्याच्या संनियंत्रण आणि अंमलबजावणीची जबाबदारी अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी याबाबत प्राधान्याने पाठपुरावा केला होता.

राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय दर्जाची महत्त्वाची स्थळे, तीर्थक्षेत्रे परिसर विकास आराखडे यांची व्याप्ती आणि स्वरूप लक्षात घेऊन त्यांच्या विकासासाठी आराखडे तयार करण्यात येतात. स्थानिक पातळीवरील संबंधित आणि तज्ज्ञांशी चर्चा करून चौंडी स्मृतीस्थळ जतन व विकास व त्यास लागणाऱ्या निधीचा आराखडा अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. त्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या माध्यमातून ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यातच नियोजन विभागाने ६८१ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मंजुरी देणारा शासन निर्णय जारी केला आहे.

या निर्णयानुसार विकास आराखड्यातील कामे करताना संबंधित स्थळाचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन वास्तूंची मूळ शैली जपण्यासाठी पुरातत्वीय जाण असलेल्या व्यक्ती आणि संस्थांकडूनच ही कामे करून घ्यावीत, असे निर्देश देण्यात आले आहेत. जी कामे केंद्र शासनाच्या PRASAD योजना, स्वदेश दर्शन योजना किंवा अन्य योजनांमधून शक्य आहेत. ती त्या माध्यमातून पूर्ण करण्यात येणार आहेत. विकास आराखड्यातील सर्व कामे पुढील तीन वर्षात ३१ मे २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही शासन निर्णयात दिले आहेत.

# अहिल्यादेवींच्या सुप्रशासनाचा वारसा!

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची धर्मपरायणता, दातृत्व, विविध समाजोपयोगी उपक्रम, अनेक मंदिरांचे केलेले जीर्णोद्धाराचे कार्य, बांधलेले घाट याची दखल इतिहासाने घेतलीच; पण त्यांचे प्रशासनकौशल्य, न्यायप्रियता, सक्षम राजकीय नेतृत्व आणि आर्थिक विचार आजही आदर्शवत आहेत. याच विचारांचा वारसा महाराष्ट्र शासन पुढे नेत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा उपक्रमाच्या यशस्वितेनंतर पुढील १५० दिवसांच्या सुधारणा टप्प्यास आता गती देण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत 'विकसित भारत २०४७'च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र २०४७' व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सुप्रशासनाचा वसा पुढे चालविण्याचाच प्रामाणिक प्रयत्न आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जनहितकारी प्रशासनाप्रमाणेच या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमात लोकाभिमुखता, सुलभता आणि उत्तरदायित्व या तीन मूलभूत तत्त्वांवर विशेष भर देण्यात आला आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे विविध क्षेत्रातील कर्तृत्व थक्क करणारे आहे. तप, त्याग आणि तेज या गुणांनी परिपूर्ण असे त्यांचे व्यक्तिमत्त्व मूर्तिमंत भारतीय स्त्रीत्वाचे प्रतीकच! लोकप्रशासन, निर्माणकार्य, कूटनीती, अन्य राज्यांशी संबंध, वैचारिक स्पष्टता, दूरदर्शिता, आत्मविश्वास, रणनीती, तार्किक विचार आणि या सर्वांना असलेले धर्माचे अधिष्ठान या गुणसमुच्चयाच्या आधारावर त्यांनी आदर्श राज्य प्रशासन चालवले, प्रजाहिताला अत्युच्च प्राधान्य देऊन रयतेला सदैव सुखी ठेवण्याचा प्रयत्न केला. राज्यातील जनतेच्या आर्थिक उन्नतीसाठी सतत प्रयत्न केले. महेश्वर आजसुद्धा हातमाग व्यवसायासाठी प्रसिद्ध आहे. ज्याची सुरुवात अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी केली. महेश्वरला वस्त्र उत्पादन सुरू केले, त्यातून 'महेश्वरी' हा ब्रँड बनला. त्यांच्या काळात शेती लाभदायक होण्याचे एक महत्त्वाचे कारण ठरले त्यांचे पाणी व्यवस्थापन, खासगी उपयोगासाठी प्रदूषणमुक्त पाण्याचे वेगळे स्रोत, प्रवाह आणि शेतीच्या उपयोगासाठी वेगळे स्रोत हे नियोजन लाभदायक ठरले. भूमिहीन शेतकऱ्यांना त्यांनी कसायला जमीन दिली. भूमिगत जलाचा स्तर वाढवणाऱ्या झाडांची लागवड करायला सांगितले. राजकोषीय उत्पन्न वाढवत जनतेचे हितही साधले. आज ज्याला Public Private Participation (PPP) म्हटले जाते त्या 'प्रशासन व व्यक्ती सहकार्य' कल्पनेचा पाया त्यांनी रचला, असे आपण सार्थ अभिमानाने म्हणू शकतो. दूरदर्शी प्रशासक म्हणून त्यांनी जमीन महसूल व्यवस्थापनाची प्रक्रियाही सुलभ केली. महिलांच्या हक्कांसाठी व सामाजिक-आर्थिक उन्नतीचे मार्ग निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले.

### महाराष्ट्र स्टार्टअपची राजधानी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रजाहितदक्ष प्रशासनाचा, राज्याच्या आर्थिक सक्षमतेसाठी प्रयत्नांचा वारसा पुढे चालविण्याच्या दिशेने महाराष्ट्र शासन पावले उचलत आहे. नुकत्याच मुंबई येथे झालेल्या वर्ल्ड ऑडिओ - व्हिज्युअल ॲण्ड एंटरटेंन्मेंट समिट - वेव्हज् २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी मार्गदर्शनाखाली ८ हजार कोटींचे चार महत्त्वाचे करार करण्यात आले. गुंतवणूक आणि स्टार्टअप्स् संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. राज्य शासनाने स्टार्टअप इको सिस्टिम उभी करण्यासाठी १२० कोटी रुपयांचा 'फंड ऑफ फंड्स' तयार केला असून, ज्याद्वारे आर्थिक सक्षम आणि विक्रीयोग्य स्टार्टअप्सना आर्थिक मदत दिली जाणार आहे. कृषी क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर स्टार्टअप्स उदयास येत आहेत. सर्क्युलर इकॉनॉमीवर भर देत महाराष्ट्र राज्य देशाची स्टार्टअप राजधानी बनले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे सुप्रशासन आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी उचललेली पावले हा त्यांचा वसा जपणे आणि पुढे नेणे हेच खऱ्या अर्थाने त्यांना अभिवादन ठरेल.

जागतिक अन्नसुरक्षा दिनानिमित्त 'लोकराज्य'च्या या अंकात अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व राज्यमंत्री योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा व विविध उपक्रम यांची माहिती देण्यात आली आहे.

तसेच मुंबईत नुकत्याच झालेल्या वेव्हज्-२०२५ परिषदेच्या यशस्वितेचा आढावा, महिला व बालविकास विभागाची प्रशासकीय गुणांकनात भरारी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा 'अटल' उपक्रम, राष्ट्रीय शिक्षण धोरण, वाळू निर्गती धोरण याबाबतही माहितीपूर्ण लेखांचा 'लोकराज्य'च्या या अंकात समावेश करण्यात आला आहे.

'लोकराज्य'चा हा अंक वाचकांच्या पसंतीस निश्चितच उतरेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावन पर्वानिमित्त त्यांच्या जन्मगावी चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे मंत्रीपरिषद घेण्यात आली. त्या निमित्ताने चौंडी येथे शासन प्रशासन गेले ते मंत्रिमंडळ बैठकीची औपचारिकता पूर्ण करायची म्हणून नाही, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आशीर्वाद, त्यांच्या विचारांची शिदोरी पुन्हा गाठीशी बांधून घेण्यासाठी...**

# अलौकिकतेला अभिवादन

**देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

शस्त्राच्या जोरावर जगाला जिंकणारे अनेक योद्धे इतिहासात होऊन गेले; पण प्रेम, भक्ती धर्म आणि न्याय या जोरावर संपूर्ण देशातील जनतेच्या मनात कायमस्वरूपी विराजमान झालेली लोकमंगल माता म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर.

अहिल्यादेवींना पुण्यश्लोक म्हटले जाते. पुण्यश्लोक फक्त त्याच राज्यकर्त्यांना म्हटले जाते, ज्यांनी आपल्या प्रजेला सर्व प्रकारच्या दुःखापासून मुक्त करून सुखी केले आहे. एकप्रकारे जनतेविषयी असलेल्या आपल्या कर्तव्यातून जे मुक्त झाले आहेत. त्यांनाच पुण्यश्लोक म्हटले जाते.

महाराष्ट्रात लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा पाया छत्रपती शिवाजी महाराज यांनी घातला, तर लोककल्याणाच्या या मंदिरावर कळस चढविण्याचे कार्य पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या कार्यातून केले.

अहिल्यादेवी होळकर या केवळ एक स्त्री राज्यकर्त्या नाहीत, तर ते एक शक्तीपीठ आहे. या शक्तीपिठाचे अधिष्ठान असलेले ठिकाण म्हणजे चौंडी. जिथे त्यांचा जन्म झाला, ज्या मातीमध्ये त्या खेळल्या, वाढल्या ती ही माती आहे. त्यामुळे ही आम्हाला सदैव ललामभूत होती, आहे आणि राहील. काळाच्या कित्येक शतके पुढे बघण्याचे द्रष्टेपण लाभलेल्या या मातेने महाराष्ट्राला एक परिवर्तनाची, धर्माची आणि सामाजिक न्यायाची दृष्टी दिली. अहिल्यादेवी म्हणत, ज्या रूढी अंधाराकडून प्रकाशाकडे नेतात त्या रूढी आम्हाला मान्य आहेत. ज्या रूढी प्रकाशाकडून अंधाराकडे नेतात, त्या रूढींना आम्ही अंधश्रद्धा म्हणतो. अशा रूढी पाळताना प्रत्येकाने विचार करावा. विकसित भारत आणि अमृतकाळामध्ये अहिल्यादेवींची जीवनगाथा प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देणारी म्हणून अधिक प्रासंगिक आहे. अहिल्यादेवींचे कार्य आपल्यासाठी एक सांस्कृतिक संचित आहे. त्यांनी आजन्म भारतीय संस्कृती पुसून टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या आक्रमणाविरुद्ध लढा उभारला. फक्त महाराष्ट्रात नाही, तर संपूर्ण देशात अहिल्यादेवींच्या कार्याच्या ठिकठिकाणी खुणा आहेत. कोठे घाट तर, कोठे मंदिरे आहेत, कोठे विहिरी आहेत, तलाव आहेत, पाणपोया, अन्नछत्र अशी शेकडो बांधकामे आज जवळपास ३०० वर्षांनंतरही त्यांच्या धर्मपरायणतेची आणि औदार्याची ग्वाही देतात. अहिल्यादेवींची शिवभक्ती व्यक्तिगत स्वरूपातच मर्यादित होती असे नव्हे, तर त्यांनी मंदिर उभारणी, जीर्णोद्धार व घाट बांधण्याचे केलेले कार्य हे तत्कालीन मुघल साम्राज्याच्या काळात धर्माला पुनर्चेतना देणारे होते. परकीय शक्तींनी उद्ध्वस्त केलेल्या स्थळांची पुनर्बांधणी कोणीतरी करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने अहिल्यादेवींचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते. काशी विश्वनाथाच्या आवारात आज अन्नपुर्णेप्रमाणे अहिल्यादेवींची मूर्ति आहे ती यामुळेच. त्यांच्या मते सत्ता म्हणजे भोग नसून एक महान योग होता. एक फार मोठी साधना, तपश्चर्या होती. गंभीर अशा जबाबदाऱ्यांनी भरलेले आद्यकर्तव्य होते.



त्यांनी बागा, पूल, रस्ते याचेही बांधकाम केले. अनेक सण उत्सवांना, यात्रांना खासगीतून देणग्या दिल्या. अजिंठा येथील कैलास मंदिरातील पुरातन चित्रांचे पुनरुज्जीवन केले. ३४ देवस्थांनाना वर्षातून एकदा गंगाजल पाठविण्याची व्यवस्था केली. यामागे देशाची एकजूट करण्याचे धोरण होते. शेतीपासून उद्योगापर्यंत, महिला सक्षमीकरणापासून न्यायदानापर्यंत आणि कला कौशल्यापासून सैन्यापर्यंत प्रत्येकाच्या कल्याणाची जबाबदारी शासकांची मानणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे चरित्र प्रत्येकाला प्रेरणादायी आहे. त्यांच्या ३०० व्या जयंतीच्या पावन पर्वावर त्यांच्या जन्मगावी चौंडी येथे मंत्रीपरिषदेची बैठक घेण्यात आली. त्यानिमित्ताने चौंडी येथे शासन प्रशासन गेले ते मंत्रिपरिषदेची बैठकीची औपचारिकता पूर्ण करायची म्हणून नाही, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा आशीर्वाद, त्यांच्या विचारांची शिदोरी पुन्हा गाठीशी बांधून घेण्यासाठी गेले होते. अहिल्यादेवींच्या अलौकिक कार्याची महती जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक निर्णय या बैठकीमध्ये घेतले गेले. त्यांनी बांधलेल्या घाट, विहिरी, बारव यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी विशेष योजना आखली आहे. चांदवड, त्र्यंबकेश्वर, मल्हार गौतमेश्वर, जेजुरी येथील तीन ऐतिहासिक तलावांचे पुनरुज्जीवन करण्यात येईल. तसेच त्यांनी बांधलेल्या १९ विहिरी, ६ घाट, ६ कुंड, अशा एकूण ३४ जलाशयांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन, सुशोभिकरण इत्यादी कामे केली जाणार आहेत.

महिला सक्षमीकरणासाठी राज्यात आदिशक्ती अभियान राबवण्यात येणार असून महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना आदिशक्ती पुरस्कार प्रदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित मराठीसह बहुभाषिक व्यावसायिक चित्रपटाची शासनामार्फत निर्मिती करणार आहे.

महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, आपल्या प्रांताचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा विचार हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी ३०० वर्षांपूर्वी आपल्या प्रशासनाचे धोरण ठेवले होते. त्यांच्या विचारांचे धन आम्हाला पुढील काळात या सर्व क्षेत्रात सकारात्मक बदल करण्यासाठी मिळेल, हा विश्वास आहे.

**शब्दांकन : किर्ती पांडे,**
(मा. मुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी)

**महाराष्ट्राने या देशाला अनेक रत्ने दिली आहेत. त्यापैकी एक अनमोल रत्न म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर... अहिल्यादेवींच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वानुसार राज्य शासन सामान्यांसाठी काम करीत असल्याचे सांगताहेत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे...**

# महाराष्ट्राची लोकमाता!

**एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

दोन वर्षांपूर्वी मी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावाला गेलो होतो. निमित्त होते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीचे. याच कार्यक्रमात अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याचा निर्णय मुख्यमंत्री या नात्याने मी जाहीर केला होता. त्यानंतर १३ मार्च २०२४ मध्ये झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अहमदनगरचे 'अहिल्यानगर' या नावावर शिक्कामोर्तब करण्याचा निर्णय आम्ही घेतला आणि अवघ्या सात महिन्यांत केंद्र सरकारने या नावाला मंजुरी देऊन राजपत्र जारी केले. लोकमातेच्या नावाने महाराष्ट्राच्या एका जिल्ह्याची ओळख हा ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतला. अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त नुकतीच राज्य मंत्रिमंडळाची बैठक चौंडी येथे घेऊन शासनाने अहिल्यादेवींना मानाचा मुजरा केला.

छत्रपती संभाजीनगर, धाराशिवप्रमाणेच, अहिल्यानगर नाव देणे हा माझ्या राजकीय कारकिर्दीतील सगळ्यात महत्त्वाचा निर्णय असे मी समजतो. आज राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच चौंडीसारख्या एका छोट्या गावामध्ये राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. यापूर्वीच्या काळात छत्रपती संभाजीनगरला त्याचप्रमाणे सिंधुदुर्गात ओरोसला तसेच महाबळेश्वरलासुद्धा मंत्रिमंडळाची बैठक झाली आहे; पण अहिल्यानगर जिल्ह्यात तेसुद्धा चौंडी गावात मंत्रिमंडळाची बैठक होणे खूप महत्त्वाचे आहे.

चौंडी येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतही विविध निर्णय घेतले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी ओळखल्या जातात ते त्यांच्या उत्तम प्रशासनासाठी. लोककल्याणकारी राज्यकर्त्या म्हणून अहिल्यादेवींचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. आदर्श प्रशासक म्हणून आजही त्यांची लोककल्याणकारी राज्यपद्धती अनुकरणीय आहे. त्यांनी भारताला प्रशासकीय संरचनेची मोठी देणगी दिली आहे. राज्यव्यवस्थेमध्ये धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करणारे प्रशासकीय अधिकारी कार्यक्षम, विश्वासू असावे लागतात, तरच राज्यकारभार व्यवस्थितरीत्या चालतो.



आजच्या बदलत्या काळातही नीती मूल्यांचे महत्त्व असून प्रशासनात आजही सर्वसामान्यांना सेवा देणे हे मूळ तत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनीदेखील त्यांच्या राज्यकारभारातून अनेक गोष्टींची शिकवण आपल्याला दिली आहे. आपले राज्य छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आहे. या भूमीचा वसा आणि वारसा वाहणाऱ्यांची मोठी मांदियाळी आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे काम आणि कर्तृत्व खूप मोठे होते. सर्वसामान्यांसाठी त्यांनी केलेला त्याग सगळ्यांना ठाऊक आहे. त्या काळात जमीन महसूल, शेतसारा, चलन व्यवस्था, डाकसेवा यांसारख्या व्यवस्था त्यांनी उभारल्या. शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांनी जन्म घेतलेल्या या मातीचे आपल्यावर खूप मोठे ऋण आहे आणि म्हणूनच महायुती सरकारचा अजेंडा एकच आहे तो म्हणजे, सर्वसामान्यांना न्याय देणे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत करणे, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना आणि अशा कितीतरी लोकाभिमुख योजनांमुळे महाराष्ट्राचे नाव देशात आघाडीवर गेले. खुद्द प्रधानमंत्र्यांनीसुद्धा राज्य शासनाचे कौतुक केले. ही ऊर्जा आम्हाला कुणाकडून आली, तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान न्यायदेवतेने हे आम्हाला शिकवले.

गेल्या अडीच वर्षांमध्ये आम्ही विविध लोककल्याणकारी निर्णय घेतले. त्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्त्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद केली. मेंढपाळांसाठी कर्ज योजना, पावसाळ्यात चराई रान राखून ठेवणे, राज्यातील धनगरवाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडणे, धनगर समाजबांधवांसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतला. अहिल्याबाईऐवजी 'अहिल्यादेवी' असा उल्लेख करण्याचा निर्णय घेतला. अहिल्यादेवींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विविध जुनी मंदिरे, धार्मिक स्थळे त्याचप्रमाणे गडकोट किल्ले यांचे जतन, संवर्धन मोठ्या प्रमाणावर सुरू केले.

शेतकरी हा जगाचा अन्नदाता असतो. त्यामुळे अहिल्यादेवींनी आपल्या राज्यात शेतकरी आणि शेतीच्या हिताचा विचार केला. शेतकऱ्यांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या कार्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचा विस्तार संपूर्ण देशभर केला. न्यायप्रिय शासनव्यवस्थेतून सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवण्याचे काम केले. त्यांनी राज्यात पायाभूत सुविधांसोबतच हुंडाबंदी, मद्यबंदी जागृतीचे काम केले. भारतभर त्यांनी नद्यांना घाट बांधले, विहिरी खोदल्या, प्रवासी मार्गांवर अन्नछत्र, धर्मशाळा सुरू केल्या, असंख्य हिंदू मंदिराचे जीर्णोद्धार केले, देव, धर्म आणि ब्राह्मणांचे रक्षण केले, लोकांना रोजगार दिला, कलाकार, कारागीर यांना राजाश्रय दिला.

आपले संपूर्ण आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र संपूर्ण देशासाठी नेहमीच प्रेरणा देणारे ठरले आहे आणि भविष्यातही ते आपल्याला प्रेरणा देत राहील. संपूर्ण देशावर छाप पाडलेल्या महाराष्ट्राच्या या लोकमातेच्या पावलावर पाऊल ठेवून महायुती सरकार पुढील काळातदेखील काम करीत राहील, असा मला विश्वास आहे.

**शब्दांकन : अजय जाधव,**
(मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करत असताना त्यांनी त्या काळात दाखविलेली दूरदृष्टी, घेतलेले निर्णय, केलेले कार्य आजच्या राज्यकर्त्यांसाठीही मार्गदर्शक, प्रेरणादायी आहे.**

# सर्वश्रेष्ठ स्त्री राज्यकर्त्या!

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री

जगातील सर्वकालीन, सर्वश्रेष्ठ, आदर्श स्त्री राज्यकर्त्या राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त सर्वप्रथम त्यांना कृतज्ञतापूर्वक वंदन करतो. त्यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी त्यांच्या अलौकिक लोककार्यातून, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी विचारातून राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याचा, विचारांचा वारसा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील महायुतीचे सरकार सक्षम व यशस्वीपणे पुढे नेत आहे. त्यांच्या सन्मानार्थ त्यांचे चौंडी जन्मस्थान असलेल्या नगर जिल्ह्याचे नाव 'पुण्यश्लोक अहिल्यानगर' करण्याचा निर्णय आमच्या सरकारने घेतला. बारामतीतील शासकीय रुग्णालयालाही पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देण्यात आले आहे, याचा आम्हाला मनस्वी आनंद, सार्थ अभिमान आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्ताने त्यांच्या कार्याचे स्मरण करत असताना, त्यांनी त्याकाळात दाखवलेली दूरदृष्टी, घेतलेले निर्णय, केलेलं कार्य आजच्या राज्यकर्त्यांसाठीही मार्गदर्शक, प्रेरणादायी आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचा झेंडा डौलाने फडकवत ठेवला. आपल्या धैर्य, शौर्य, त्याग, पराक्रमाच्या बळावर महाराष्ट्राचा मान, सन्मान, स्वाभिमान उंचावला. जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, राज्यांच्या सीमा ओलांडून रस्ते, पूल, विहिरी, घाट, मंदिरे, धर्मशाळा, पांथशाळा, आश्रयशाळा बांधल्या, पाणपोया उभारल्या. प्रशासन, महसूल, न्यायव्यवस्थेत सुधारणा केल्या. जाचक कायदे रद्द करून जनहिताचे कायदे केले. शेतकऱ्यांकडून सारावसुली सौम्य केली. जमीन करार-पट्ट्यानं देण्याची नवी पद्धत आणली. राजधानी इंदूरहून महेश्वरला नर्मदाकाठी हलविली. महेश्वरच्या विणकरांना, वस्त्रोद्योगाला तंत्रज्ञान, प्रोत्साहन दिलं. महेश्वरी साड्यांची लोकप्रियता तीन शतकांनंतर आजही टिकून आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी ३०० वर्षांपूर्वी नर्मदाकाठी बांधलेल्या वास्तू, मंदिरे, नदीघाट, धर्मशाळांसारख्या वास्तू आजही भक्कम असून मोठ्या ऐटीने, डौलाने अहिल्यादेवींच्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाची प्रचिती देत आहेत.



राजमाता अहिल्यादेवी खऱ्या अर्थाने पुण्यश्लोक होत्या. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला जात, धर्म, प्रांत, राज्यांच्या सीमांची मर्यादा नव्हती. आपल्या राज्याची सीमा ओलांडून त्यांनी लोकहिताची कामे केली. अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंडीसारख्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरे बांधली. सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वरसारख्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंडी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वरला नद्यांवर घाट बांधले. गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैयनी, रामेश्वर, भीमाशंकरसारख्या ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामांच्या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रेकरूंची सोय केली. जेजुरीत श्रीमल्हारी गौतमेश्वराची छत्री, कुंभेरीजवळ खंडेरावांच्या स्मरणार्थ त्यांनी छत्री उभारली आहे. इंदूरला मालेराव, गौतमीबाईंच्या छत्र्या, महेश्वरला मुक्ताबाईंच्या स्मरणार्थ कलाकुसरयुक्त मंदिर त्यांनी बांधले. नदीघाटावर, तलावावर स्त्रियांना सुरक्षित स्नानासाठी, कपडे बदलण्यासाठी बंदिस्थ ओवऱ्यांची व्यवस्था केली. माणसाला, प्राण्यांना सर्पदंश झाल्यास तातडीच्या उपचारांसाठी हकीम, वैद्यांच्या नेमणुका करणाऱ्या त्या पहिल्या राज्यकर्त्या होत्या. त्यांच्या लोकोपयोगी कार्याचा, प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांचा वारसा पुढे नेत असताना राज्यातल्या महायुती सरकारने नुकतीच अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चौंडी या त्यांच्या जन्मगावी राज्यमंत्रिमंडळाची बैठक घेऊन त्या बैठकीत अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या लोककार्याची ओळख नव्या पिढीला होण्यासाठी त्यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती मराठीसह इतर भाषांमध्ये करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांच्या स्मृतिस्थळाचे जतन, संवर्धनासाठी ६८१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तीर्थक्षेत्र विकासाची ही योजना अहिल्यादेवींच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक कार्याला निश्चितपणे पुढे घेऊन जाईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या राज्यात विद्वान आणि विद्वत्तेला मान होता. अनेक विद्वानांना त्यांनी राजाश्रय दिला. अहिल्यादेवींकडे विपुल, दुर्मिळ ग्रंथसंपदा होती. निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्यसारख्या ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती संग्रही असलेल्या त्या एकमेव राज्यकर्त्या होत्या. कवी मोरोपंत आणि शाहीर अनंत फंदी यांचाही त्यांनी आदर-सत्कार केल्याच्या नोंदी आढळतात. यावरून पुण्यश्लोक अहिल्यादेवी या गुणग्राहक होत्या हे लक्षात येते. त्यांच्यासारख्या धैर्यवान, पराक्रमी, विद्वान, आदर्श राज्यकर्त्या आपल्या महाराष्ट्रात जन्मल्या. छत्रपती शिवाजी महाराजांचा लोककल्याणाचा विचार जिवंत ठेवणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवींना मी पुनश्च वंदन करतो. आपल्याला त्यांच्या त्रिशताब्दी जयंतीच्या शुभेच्छा देतो.

**शब्दांकन : संजय देशमुख,**
(मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी)

**महाराष्ट्राच्या भूमीला संत, समाजसुधारक, क्रांतिकारक आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांची परंपरा लाभलेली आहे. या परंपरेतील एक तेजस्वी नक्षत्र म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. चौंडी गावाच्या पावन भूमीत जन्मलेल्या या अद्वितीय राज्यकर्तीला अभिवादन करण्याची संधी महाराष्ट्र शासनाने घेतली आहे.**

# अहिल्यादेवींना जन्मभूमीत मंत्रीपरिषदेचे अभिवादन

**प्रवीण कुलकर्णी**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य स्थापन करताना राज्य कसे असावे, याचा वस्तुपाठ घालून दिला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महाराजांच्या या विचारांना अंगीकृत करत सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यात बदल घडविणारे कार्य केले. अध्यात्मातून मानवी मूल्यांचे वृद्धीकरण आणि कठोर प्रशासनातून समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक या दोन्ही पातळ्यांवर त्यांनी केलेले काम अतिशय दिशादर्शक आहे. त्यांच्या या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी चौंडी येथे मंत्रीपरिषदेची बैठक घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवींना त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

महाराष्ट्राच्या भूमीला संत, समाजसुधारक, क्रांतिकारक आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांची परंपरा लाभलेली आहे. या परंपरेतील एक तेजस्वी नक्षत्र म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. चौंडी गावाच्या पावन भूमीत जन्मलेल्या या अद्वितीय राज्यकर्तीला शासनामार्फत अभिवादन करण्यात आले.

अहिल्यादेवी म्हणजे कर्तव्यकठोर; पण प्रजेविषयी मायेचा ओलावा ठेवणारी राज्यकर्ती. त्यांचे सासरे मल्हारराव होळकरांनी अभिमानाने म्हटले होते, तलवार आमची आहे, पण भरवसा सूनबाईंचा. या एकाच वाक्यात त्यांच्या कर्तृत्वाची प्रचिती येते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महेश्वरला राजधानी केल्यानंतर १७६७ ते १७९५ या काळात लोकाभिमुख कारभार उभारला. उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत मंदिरांचे पुनरुज्जीवन, अन्नछत्रे, धर्मशाळा, घाट, विहिरी यांची निर्मिती केली. त्यांनी महाराष्ट्रात नंदुरबारजवळ बांधलेली 'अहिल्याबाई विहीर' आजही त्यांच्या कार्याची साक्ष देत आहे. मात्र त्यांच्या कार्याचं वैशिष्ट्य केवळ बांधकामांपुरतं मर्यादित नाही. त्यांनी करप्रणालीत सुधारणा, शेतकऱ्यांना सवलती दिल्या आणि सर्व जातींना प्रशासकीय यंत्रणेत सहभागी करून सामाजिक समतेचे उदाहरण घालून दिले. त्या





काळी जेव्हा दांडगाई आणि अस्थिरता नित्याची झाली होती, तेव्हा माळवा हे एकमेव सुप्रशासन असलेले राज्य म्हणून ओळखले जात होते. स्त्रियांना शक्ती द्यायची असेल, तर त्यांना शस्त्रही चालवता आले पाहिजे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. समाजात स्त्रियांसाठी बंदी असलेल्या अनेक गोष्टी त्यांनी उघड मनाने स्वीकारल्या आणि राबवल्या.

अहिल्यादेवींनी जनसामान्यांच्या सुखासाठी आयुष्यभर तन-मन-धन वेचले. त्यांची प्रशासकीय कारकिर्द आगळीवेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरली. अहिल्यादेवींच्या आयुष्याचा आणि कर्तृत्वाचा विचार करताना, या संकल्पना नीटपणे लक्षात घेणे अगदी आवश्यक आहे. अहिल्यादेवींची धार्मिकता लोकाभिमुख होती. त्यांनी 'धर्मपरायणता म्हणजे लोककल्याण' हे समीकरण प्रस्थापित केले. त्यांच्या लोककल्याणकारी राज्याची संकल्पना त्यांच्या धार्मिकतेवर उभी होती.

शेती, पाणी, व्यापार, रस्ते क्षेत्रांत अतिशय योजनाबद्ध रीतीने आणि विचारपूर्वक त्यांनी आपले धोरण राबविले. शेती हा पायाभूत व्यवसाय मानून त्यास अनेक प्रकारे प्रोत्साहन दिले. वेगवेगळे प्रयोग केले. पाण्याचे व्यवस्थित, शास्त्रशुद्ध नियोजन केल्याने त्यांच्या राज्यात कधीही पाण्याचे दुर्भिक्ष जाणवले नाही. त्यांनी व्यापाराच्या विविध क्षेत्रांत उत्कर्षाची दालने उभी केली. विविध राज्यांशी सलोख्याचे, स्नेहपूर्ण संबंध ठेवून लोकहितपूर्ण धोरणाचा स्वीकार केला. आयुष्यभर अहिल्यादेवींनी मानवधर्म पाळला. त्यांची ही दयापूर्ण दृष्टी केवळ मानवापुरतीच मर्यादित नव्हती. त्यांनी गुरांना चारा आणि पक्ष्यांना दाणा मिळावा, म्हणून शेत आणि कुरणे राखून ठेवली होती. अहिल्यादेवींच्या राजाश्रयामुळेच महेश्वरी वस्त्रांची भरभराट झाली. शांतता आणि संरक्षण मिळाल्याने, राज्याच्या समृद्धीला व्यापारी व सावकार यांचे चांगले सहकार्य लाभले. परोपकार अहिल्यादेवींच्या जीवनाचे सूत्र होते.

अहिल्यादेवी यांच्या या कार्याला अभिवादन करण्याच्या दृष्टीने चौंडी येथील मंत्रिपरिषद बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले. योजनांना अहिल्यादेवी यांचे नाव देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

## अहिल्यादेवींवर चित्रपट

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जीवनचरित्रावर आधारित मराठीसह बहुभाषिक व्यावसायिक चित्रपट निर्मिती करण्यास मंजुरी देण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्याची दृष्य स्वरूपात जागतिक स्तरावर ओळख निर्माण होण्यासाठी मराठीसह विविध भाषांमध्ये चित्रपट निर्मिती करण्यात येणार आहे. चित्रपट निर्मितीसाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## आदिशक्ती अभियान व पुरस्कार

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान आणि आदिशक्ती पुरस्कार योजना सुरू करण्यास मान्यता. राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविण्यात येत आहे. महिलांचे आरोग्याबाबत समस्यांचे संवेदनशीलपणे निवारण करणे, कुपोषण, बालमृत्यू, माता मृत्यूचे प्रमाण कमी करणे. मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवणे, लैंगिक आणि शारीरिक अत्याचाराला प्रतिबंध करणे, पंचायत राज पद्धतीत महिला नेतृत्वाचा

सहभाग वाढविणे, महिलांना आर्थिक सक्षम करणे आदी या अभियानाची उद्दिष्टे आहेत.

### तलाव, घाटांच्या जतनासाठी निधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी उभारलेल्या तलाव, बारव, कुंड, घाट विहिरी आणि पाणी वाटप प्रणालीच्या जतनासाठी विशेष योजना राबवण्यात येणार आहे. या कामासाठी सुमारे ७५ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

### तीर्थस्थळांच्या विकासासाठी निधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मंदिर पुनर्निर्माणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील विविध सात तीर्थस्थळांच्या विकासासाठी ५,५०३ कोटी रुपयांच्या आराखड्यांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये चोंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतिस्थळाचे जतन आणि संवर्धन : ६८१.३२ कोटी, - अष्टविनायक गणपती मंदिरांचा जीर्णोद्धार (लेण्याद्री वगळता) - १४७.८१ कोटी, - श्री क्षेत्र तुळजाभवानी देवी मंदिर विकास आराखडा : १,८६५ कोटी, श्री क्षेत्र जोतिबा मंदिर विकास आराखडा : २५९.५९ कोटी, नाशिकमधील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर विकास आराखडा - २७५ कोटी, कोल्हापूर श्री क्षेत्र महालक्ष्मी विकास आराखडा - १,४४५ कोटी रुपये, नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड विकास आराखडा - ८२९ कोटी रुपये, यांचा समावेश आहे.

### इंग्रजी निवासी शाळेत प्रवेश योजनेस राजे यशवंतराव होळकरांचे नाव

धनगर समाजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेत शिक्षण देण्याच्या योजनेला राजे यशवंतराव होळकर यांचे नाव देण्यात येणार आहे. राजे यशवंतराव होळकर यांनी १७९७ ते १८११ या काळात शैक्षणिक प्रगतीसाठी अनेक कामे केली. गुरुकुलसारख्या पारंपरिक शिक्षणाला चालना दिली. लष्करी शिक्षणात शिस्त, नीती आणि नेतृत्वगुणांचा समावेश केला. शिक्षण सर्वांसाठी खुले करून राजवाड्यात मुलींसाठी शिक्षणाच्या सुविधा उभारल्या. या योजनेतून २०२१-२२ ते २०२४-२५ अखेर १६२ शाळांची निवड करण्यात आली असून या शाळांत धनगर समाजातील ३१,३०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. यासाठी २८८ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.




### वसतिगृह योजना नावास मंजुरी

धनगर समाजातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी वसतिगृह बांधण्याच्या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना असे नाव देण्यास मंजुरी देण्यात आली.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि या महाविद्यालयास संलग्न ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. या महाविद्यालयास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असे नाव देण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयासाठी आवश्यक; तसेच अतिरिक्त बांधकाम करण्यासाठी सुमारे ४८५ कोटी ८ लाख रुपयांच्या अपेक्षित खर्चास बैठकीत मान्यता देण्यात आली. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार या महाविद्यालयाकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या पायाभूत सुविधा पुढील सात वर्षांसाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### मुलींसाठी अहिल्यानगरला आयटीआय

अहिल्यानगर येथे मुलींसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी लागणारे आवश्यक २७ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाची १२ अशा एकूण ३९ पदांना मान्यता देण्यात आली. या पदांच्या आवश्यक वेतनासाठी दरवर्षी २३२.०१ लाख रुपये खर्च अपेक्षित असून त्या खर्चास मान्यता देण्यात आली. या पदांचा प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्यासही मंजुरी देण्यात आली. संस्थेकरिता आवश्यक यंत्रसामग्री, साधने आणि इतर खर्च यासाठी २०२५-२६ या आर्थिक वर्षात अकरा कोटी ऐंशी लाख एकोणीस हजार रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

**(मा. मुख्यमंत्री महोदयांचे माहिती अधिकारी)**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर याच काळात बंधुप्रेम आणि गोरगरिबांचा चरितार्थ या बाबींची देशभरात पेरणी करीत होत्या. 'राष्ट्रीय' वा विश्वबंधुत्व हे शब्द त्या काळात कदाचित रूढ नसतील; पण त्यांनी रुजवलेला 'धर्म' या संकल्पनांना पोटात घेऊन 'दशांगुळे' वर उरला होता. त्यांचा धर्म राष्ट्रीय होताच तसाच त्याला मानवतेचा स्पर्श होता. जगा आणि जगू द्या (Live and Let Live) हा या धर्माचा गाभा होता.**

# लोकोत्तर कार्याचा आदर्श!

**डॉ. देवीदास पोटे**

अहिल्यादेवींच्या काळात इंग्रज, फ्रेंच हे परकीय लोक; मराठे, रजपूत, जाट, बुंदेले हे हिंदू, रोहिले आणि पठाण हे एतद्देशीय परके विविध ठिकाणी लढाया, आक्रमण यात मग्न झाले होते. त्यामुळे देशात कलह आणि मत्सराचे जणू पीक आले होते. मात्र अहिल्यादेवींची कृती याला अपवाद होती. अहिल्यादेवी याच काळात बंधुप्रेम आणि आणि गोरगरिबांचा चरितार्थ या बाबींची देशभरात पेरणी करीत होत्या. 'राष्ट्रीय' वा विश्वबंधुत्व हे शब्द त्या काळात कदाचित रूढ नसतील; पण त्यांनी रुजवलेला 'धर्म' या संकल्पनांना पोटात घेऊन 'दशांगुळे' वर उरला होता. त्यांचा धर्म राष्ट्रीय होताच तसाच त्याला मानवतेचा स्पर्श होता. जगा आणि जगू द्या (Live and Let Live) हा या धर्माचा गाभा होता.

अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत लोकहिताची कामे केलीच; पण त्यांची विचारदृष्टी पशुपक्षी, लहान कीटक यांच्यापर्यंत पोहोचली होती. आपल्या राज्यात त्यांनी धान्य पिकून तयार झालेली शेते शेतकऱ्यांकडून योग्य ती किंमत देऊन विकत घेतली आणि पशुपक्ष्यांसाठी खुली केली. या शेतात जनावरे आणि पक्षी यांना मुक्तद्वार होते. याशिवाय फक्त जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याकरिता वेगळे तलाव व पाण्याची कुंडे निर्माण केली. त्याचप्रमाणे पाण्यातील मासे आणि जलचरांसाठी पिठाचे गोळे त्यांनी पाण्यात टाकण्याची व्यवस्था केली.

अहिल्यादेवींनी आपल्या कारकिर्दीत पाण्याचे योग्य नियोजन केले. लोकांना पिण्याचे पाणी आणि शेतीकरिता पाणी, झाडांना, पांथस्थांना पाणी अशा विविध अंगांनी विचार करून त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया बांधून पाण्याचे व्यवस्थापन केले. आज जलव्यवस्थापन ही एक महत्त्वाची शाखा मानली जाते. अहिल्यादेवींनी ही जलनीती २५० वर्षांपूर्वीच अमलात आणली होती. परिणामी त्यांच्या ३० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांच्या राज्यात कधीही दुष्काळ पडला नाही. इंग्रज अधिकारी ल्युअर्ड याने आपल्या टिपणीत भारतातील राजपुताना, बुंदेलखंड येथे दुष्काळ पडल्याचा उल्लेख केला आहे. मात्र अहिल्यादेवींच्या राज्यात दुष्काळ पडल्याचा कुठेही उल्लेख नाही.

ही प्रेरणा 'सर्वांभूती परमेश्वर' या व्यापक विचारातून आली होती. हा विचार संतांचाच होता. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' किंवा 'भूतांची दया हे भांडवल संता' असे संत तुकारामांनी म्हटले आहे. प्रत्येक चराचरात ईश्वरी तत्त्व सामावले असल्याची संतांची भूमिका होती. अहिल्यादेवींच्या पशुपक्ष्यांप्रति असलेल्या विचारात हाच संतविचारांचा धागा होता.



चौंडी येथील अहिल्यादेवींचे स्मारक

जगाच्या इतिहासात अनेक राजे, सम्राट झालेत. त्यांनी आदर्श राज्यकारभार करून आपल्या प्रजेला सुख, समाधान दिले; पण आपल्या राज्याच्या सीमेबाहेर लोकहिताची कामे करणारी ही एकमेव महाराणी आहे. त्या काळात भारतात अनेक छोटीछोटी संस्थाने होती. 'देश' ही संकल्पना आजच्या स्वरूपात अस्तित्वात नव्हती; पण आपल्या धार्मिक आणि लोककल्याणकारी कामांच्या माध्यमातून त्यांनी देश जोडण्याचे काम केले, असे म्हणता येईल. भारतवर्षातील केदारनाथ, जगन्नाथपुरी, सोमनाथ आणि रामेश्वर या विविध ठिकाणी त्यांनी वेगवेगळ्या स्वरूपाचे स्थापत्य निर्माण करून लोकांकरिता सोयीसुविधा निर्माण केल्या. भारताच्या नकाशात ही चार ठिकाणे एकत्र केली तर एक चौकोन तयार होतो. या चौकोनाला देश जोडणारा सुवर्ण चौकोन (Golden Quadrangle) असे म्हटले तर ते अगदी यथार्थ

होईल. म्हणजे धार्मिक कामांच्या माध्यम ातून सामाजिक काम साध्य केले.

अहिल्यादेवींनी विविध ठिकाणी मंदिरांचे निर्माणकार्य केले. यामागे विचारांचे अनेक पैलू होते. पहिला विचार म्हणजे परंपरागत आदर्श हिंदू धर्मविचारांची पाठराखण. नवीन मंदिराचे निर्माण करण्यामागची भूमिका होती, लोकांच्या सगुण स्वरूपातील भक्तीला पाठबळ देणे. परकी जुलमी शासकांनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यामागची भूमिका होती, लोकांच्या मनातील भीतीची, हतबलतेची आणि नैराश्याची भावना मिटवणे, धर्मवेड्या आक्रमकांनी मंदिरातील मूर्तीची विटंबना करून तिची तोडफोड केली वा मंदिर उद्ध्वस्त केले तरी ते मंदिर पुन्हा उभारणे, यामागचा विचार होता की, मंदिर पाडून वा मूर्ती तोडून मनातील श्रद्धा नाहीशी करता येत नाही. उद्ध्वस्त मंदिर वा मूर्ती यांची पुन्हा प्रतिष्ठापना करणे म्हणजे भयभीत वा उद्ध्वस्त झालेल्या मनांना पुन्हा प्रेरणा आणि ऊर्जा देणे.

आपला पुत्र मालेरावाच्या मृत्युनंतर तुकोजी होळकर यांच्या नावाने पेशव्यांकडून सुभेदारीची वस्त्रे त्यांनी मिळविली. या काळात थोरले माधवराव हे पेशवेपदी होते. सैन्य, लढाया हे तुकोजींकडे आणि इतर प्रशासन व्यवस्था अहिल्यादेवींकडे अशी विभागणी होती. व्यावहारिक अर्थाने सुभेदारी तुकोजीरावांकडे असली, तरी लोकांनी आणि अन्य शासकांनीही राजकर्ती वा राणी मानले ते अहिल्यादेवींनाच. म्हणजे स्त्री म्हणून वा विधवा म्हणून परंपरेने नाकारलेले राणीपद लोकांनी त्यांना उत्स्फूर्तपणे बहाल केले. अहिल्यादेवींनीही आपल्या असामान्य, सर्वात्मक कर्तृत्वाने ते राज्ञीपद पुरेपूर सार्थ ठरविले. सर्व प्रकारे सक्षम असूनही स्त्री विधवा असणे या बाबी त्यांच्या सुभेदार म्हणून राज्यपदी बसण्याच्या आड आल्या. स्त्री-पुरुष असा भेद करणाऱ्या परंपरेच्या उणिवा स्पष्ट झाल्या. मात्र आपल्या कर्तृत्वाने त्यांनी परंपरेतील उणिवांवर मात केली आणि आपल्या कर्तृत्वाने लोकहृदयात लोकांची राणी हे स्थान निर्माण केले.


घृष्णेश्वर मंदिर, वेरूळ

अहिल्यादेवींच्या बाबतीत एका राज्याची राणी असतानाच त्यांना लोकांनी आई मानले, लोकमाता मानले. त्यांची साधी राहणी, ईश्वरनिष्ठ आयुष्य, लोकांप्रति प्रेम आणि वात्सल्यभाव यामुळे लोकांनी त्यांच्या हयातीतच त्यांना 'देवी' मानले. त्यांना 'पुण्यश्लोक' या उपाधीने गौरविले.

अहिल्यादेवींचे इतर अनेक समकालीन राज्यकर्त्यांपेक्षा असलेले वेगळेपण म्हणजे त्यांचा ग्रंथसंग्रह. बालपणापासूनच धार्मिक, सात्त्विक प्रवृत्ती असल्याने विविध ग्रंथ, पोथ्या, पुराणे वाचण्याचा छंद असल्याने त्यांनी महेश्वरला सुमारे २०० ग्रंथांचा ग्रंथसंग्रह केला होता. इ. स. १७८६ मध्ये त्यांनी चांदवडहून दुर्मिळ ग्रंथ मागवून घेतल्याचा उल्लेख कागदोपत्री आला आहे. त्यांचे ग्रंथप्रेम आणि ज्ञानलालसा अपार होती, हे यावरून दिसून येते.

महाराष्ट्र, गुजरात, माळवा आदी प्रांतांतील पंडित, कवी, कीर्तनकार, प्रवचनकार, विद्वान, शास्त्री यांचा त्यांनी आपल्या दरबारात यथोचित सन्मान केला. त्यात कविवर्य मोरोपंत, शाहीर अनंत फंदी यांचाही समावेश होता. याशिवाय आपल्या दरबारातील विद्वान पंडित खुशालीराम भट्ट यांच्याकडून धार्मिक बाबींचे विवेचन करणारा 'अहिल्याकामधेनू' हा ग्रंथ लिहवून घेतला.

आपले राज्य ईश्वरार्पण करून ईश्वराला साक्ष ठेवून राज्य चालविणे ही कल्पना ट्रस्टीची आहे. ट्रस्टी म्हणजे निरिच्छ, तटस्थपणे, प्रामाणिकपणे सांभाळ करण्याची भूमिका. अहिल्यादेवींचे कुलदैवत श्री शिवशंकर, म्हणूनच त्यांनी आपले राज्य शिवार्पण केले होते. राजाच्या राजमुद्रेवर राजाचे नाव असावे, असा संकेत आहे; पण अहिल्यादेवींच्या राजमुद्रेवर कुठेही त्यांचे नाव नव्हते. राजमुद्रेवर 'श्री शंकर आज्ञेवरून' अशी अक्षरे होती. हातात शिवपिंडी घेऊन त्यांनी शिवशंकराच्या साक्षीने राज्यकारभार चालविला. अहिल्यादेवींच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक प्रेरणा या विश्वात्मक स्वरूपाच्या होत्या. 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत ।।' या व्यापक भूमिकेतून त्यांनी दीनदुबळे, गरीब, पीडित यांच्या उद्धाराकरिता, त्यांच्या कल्याणाकरिता कामे केली. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयः।।' अशी त्यांची सर्वात्मक मनोभूमिका होती. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या पसायदानात विश्वात्मक देवाला केलेली प्रार्थना अहिल्यादेवींनी आपल्या लोकहितकारी कामांद्वारे काही प्रमाणात मूर्तस्वरूपात आणली असे म्हणता येईल. ही विश्वात्मक प्रेरणा अवघ्या मानवजातीला मानवतेच्या एका सूत्रात बांधणारी आहे.

अहिल्यादेवींच्या चरित्रातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा सर्वस्पर्शी आणि

लोकाभिमुख राज्यकारभार. त्यांची पारदर्शी हिशोबपद्धती आणि अद्ययावत खतावण्या हे त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचे महत्त्वाचे अंग होते. जिथे शिस्त, प्रामाणिकपणा, उत्तरदायित्व आणि ईश्वरी अधिष्ठान असते तिथेच हे शक्य असते. 'वाहिले ते गंगाजल, राहिले ते तीर्थ' ही त्यांची चारित्र्यविषयक भूमिका होती. दरबारातल्या कामकाज व वेळेबाबत त्यांचे धोरण अत्यंत काटेकोर होते. म्हणूनच 'दरबाराचा वेळ महत्त्वाचा असतो हे ध्यानात घेऊन कुणीही दरबाराचा वेळ घेऊ नये' असा त्यांचा आदेश होता.

आपण आपल्या कर्तव्याबाबत ईश्वराप्रति उत्तरदायी आहोत अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणूनच त्यांनी म्हटलंय, 'ईश्वराने माझ्यावर जे उत्तरदायित्व दिले आहे ते पार पाडणे हे माझे कर्तव्य आहे. प्रजेला सुखी ठेवणे हे माझे काम आहे. माझ्या प्रत्येक कृत्याची जबाबदारी माझ्यावर आहे. सत्ता आणि बळाच्या जोरावर मी जे कार्य करत आहे, त्याचा मला परमेश्वरापुढे अखेरी जाब द्यावा लागेल.'

सर्व प्रकारे चांगली कामे करूनही इतकी विनम्र जाणीव असणे हीच त्यांची महानता आणि वेगळेपण. ईश्वरनिष्ठेचे हे अधिष्ठान ही संतपणाची खूण आहे. त्यांच्या राजकर्ती महाराणी, लोकमाता या विविध भूमिकांशी संतत्वाचा हा धागा अतूटपणे जोडला गेला आहे. म्हणूनच महाराणी, रणरागिणी, अष्टावधानी, मातोश्री, लोकमाता, कर्मयोगिनी, संन्यस्त स्वामिनी, शिवयोगिनी, महाश्वेता ही बिरुदे त्यांना एकाच वेळी लागू पडतात.

सरकारी कोष आणि खासगी कोष हे होळकरशाहीचे वैशिष्ट्य होते. अशी व्यवस्था मराठेशाहीच्या काळात फक्त होळकर घराण्यातच होती. खासगी कोष म्हणजे खासगी जहागिरीतून मिळालेले उत्पन्न. ही जहागीर थोरले बाजीराव यांनी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या पत्नी गौतमाबाई यांच्या सनद करून दिली होती (२० जानेवारी १७३४). गावाच्या खासगी कारभारासाठी स्वतंत्र कारभारी नेमलेले होते. या खासगीचा कारभार घराण्यातील प्रमुख कर्त्या स्त्रीने पाहावा, अशी तरतूद होती. ही खासगी म्हणजे एक प्रकारे स्त्री-धन होते.


गोदावरी नदीवरील पुणतांबे घाट

गौतमाबाईंनी खासगीच्या रकमेचा विनियोग लोककार्य आणि धर्मकार्यासाठी केला. गौतमाबाईं आणि मल्हाररावांच्या निधनानंतर खासगीचा कारभार परंपरेने अहिल्यादेवींकडे आला. (इ.स. १७६१). त्यावेळी खासगीत जमा असलेली संपत्ती १६ कोटी रुपये इतकी होती. गौतमाबाईंच्या इ. स. १७३४ ते १७६१ या २७ वर्षांतील नियोजनबद्ध कारभाराचा हा परिणाम होता, असे दिसून येते. अहिल्यादेवींनी खासगीचा कारभार आणखी विस्तारीत केला.

त्यांनी आपल्या राज्यात आणि भारतभर जी लोककल्याणकारी कामे केली ती या खासगीच्या कोषातून. त्यात नद्यांवर घाट, विहिरी, बारवा, तळी, मंदिरे, धर्मशाळा, मंदिरांचे जीर्णोद्धार, रस्ते, रस्त्यांच्या कडेला यात्रेकरूंच्या सोयीसाठी वृक्षारोपण, अन्नछत्रे, पाणपोया अशा विविध प्रकारच्या कामांचा समावेश होता. एवढेच नव्हे तर त्यांच्या दैनंदिन उदरनिर्वाहाचा खर्चही त्या खासगीतून करीत. आपल्या उदरनिर्वाहाचा खर्च खासगीच्या उत्पन्नातून करणे हा जगातील कुठल्याही राज्यकर्त्यांसाठी एक आदर्श आहे.

अहिल्यादेवींनी सैन्यावर खर्च न करता दानधर्मावर पैसा उधळला असा काही इतिहासकारांनी त्यांच्यावर आरोप केला आहे. वास्तविक त्यांनी दानधर्म व लोककल्याणाची कामे केली ती आपल्या स्त्रीधनाच्या वा खासगी वतनाच्या उत्पन्नातून. स्त्रीधनाचा उपयोग लोकोपयोगी कार्यासाठी करावा, असा आपल्याकडे संकेत आहे. अहिल्यादेवींनी जुनी परंपरा आणि आपल्या व्यापक लोकाभिमुखी विचारांचा समन्वय साधला. त्यांच्यावरील हा आरोप म्हणूनच निराधार, तथ्यहीन वाटतो.

आपल्या स्त्रीधनाचा पैसा आपल्या कल्पनेप्रमाणे लोकोपयोगी कामात वा गोरगरिबांना मदत वा दान करण्यात वापरला, याला उधळपट्टी म्हणणे हे त्यांच्या विचारांवर आणि सर्वात्मक कर्तृत्वावर अन्याय करणारे आहे. अहिल्यादेवींचे योग्य ते मूल्यमापन करण्यात इतिहासकार कमी पडले, असा निष्कर्ष यातून निघतो.

अहिल्यादेवींचे चरित्र, चारित्र्य आणि कर्तृत्व यांचा अभ्यास अनेक परिप्रेक्ष्यांद्वारे करणे अजून बाकी आहे. ही काळाची गरज आहे आणि हे आपले ऐतिहासिक, सांस्कृतिक कर्तव्य आहे.

**(लेखक हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या गौरवग्रंथाचे संपादक आहेत. )**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी वैधव्यपूर्ण वैयक्तिक जीवनातही तत्कालीन धार्मिक परंपरेनुसार आजीवन आचरण केले. त्यांनी स्थापन केलेली धार्मिक स्थळे आजही त्यांची कीर्ती जाहीररीत्या स्पष्ट सांगत असली, तरी तिच्या वैयक्तिक धर्माचरणांची चिन्हे अर्थातच आता प्रकट उपलब्ध नसल्याने, त्याविषयी वर्तमान समाजाला फारशी माहिती नसते, परंतु सुदैवाने त्याचे 'चक्षुर्वेसत्यं' वर्णन उपलब्ध आहे.**

# लोककल्याणकारी धर्मपरायणता!

**प्रा. ग. वा. कवीश्वर**

महेश्वरची महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आपल्या विशुद्ध कीर्तीने इतिहासात अजरामर झाल्या आहेत. वैयक्तिक संसारात सतत दुर्धर दुःखांनी पीडित असतानाही अहिल्याबाईंनी अत्यंत न्यायपूर्ण शासन करून प्रजापालन केले; आणि महाकवि कालिदासाने रघुवंश काव्यांत आदर्श नृपतीचे वर्णन करताना म्हटल्याप्रमाणे :

*प्रजानां विनयाधानात् रक्षणात् भरणादपि ।*
*स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ।।*
*रघुवंश ।।*

महाराणी अहिल्याबाई आपल्या प्रजेची मातापिता झाली. अशाच प्रकारे महाभारतात भीष्मांनी आदर्श राजाचे केलेले पुढील वर्णनही अहिल्याबाईंनी प्रत्यक्ष आचरणात आणून दाखविले -

*आत्मवांश्च जितक्रोधः शास्त्रार्थकृत निश्चयः । धर्मे अर्थेच कामेच मोक्षे च सततं रतः ।।*

ज्याने मनावर नियंत्रण ठेवले आहे, क्रोध जिंकला आहे, शास्त्रग्रंथांचा वास्तविक आशय ग्रहण केला आहे आणि धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांच्या उचित साधनेत जो सतत रत असतो. फार काय, अहिल्याबाईंनी ईशोपनिषदांतील पुढील सुप्रसिद्ध वचनही संपूर्णपणे पालन करण्याचा आदर्श स्वतःच्या जीवनाच्या रूपाने समाजासमोर प्रत्यक्ष ठेवला.

*ईस्यावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।*
*तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम् ।।*

जगात जे जे आहे ते सर्व परमेश्वराने व्याप्त आहे अशी भावना ठेवून स्वार्थ त्यागपूर्वक त्याचा उपभोग घ्यावा, कोणाच्याही धनाचा लोभ करू नये.

प्रातःस्मरणीय अहिल्याबाईंच्या व्यक्तित्वाची व शासनाची ही अशी महानता त्यांच्या जीवनकालांतच कविवर्य मोरोपंतांनी पुढील मार्मिक शब्दात व्यक्त करून ठेवली आहे.

देवि अहिल्याबाई झालीस जगत्रयांत तू धन्या । न न्यायधर्मनिरता अन्या कलिमाजि ऐकिली कन्या ।। आणि राजा दिलीपविषयी (रघुवंश काव्यांत) कालिदासांच्या, न किलानुययुस्तस्य राजानो रक्षितुर्यशः (प्रजापालनतत्पर त्याचे यश कोणीही अन्य राजा प्राप्त करू शकला नाही.) या उक्तीची मराठीत पुनरुक्ती करीत मोरोपंत अहिल्याबाईंविषयी आणखी म्हणतात, तुज देवि भेटली जी सत्कीर्ती कधीच हे न राजन्या.

## भारतीय संस्कृतीची देशव्यापी पुनर्स्थापना

अहिल्यादेवींची 'सत्कीर्ती' केवळ न्यायपूर्ण कुशल प्रजापालनासाठीच झाली. या महाराणीने त्या धामधुमीच्या काळात आसेतुहिमाचल भारतीय देवदेवतांच्या (परकीय धर्मांधांनी दुष्टपणे नष्टभ्रष्ट केलेल्या) मंदिरांचा पुनरुद्धार करून नवीन मूर्ती स्थापन केल्या व त्यांच्या नित्यपूजनादीची व्यवस्था लावून दिली आणि अशा प्रकारे सनातन हिंदू धर्माविषयी जनतेत पुनः आत्मविश्वास जागृत केला. अहिल्याबाईंचे हे अद्भूत कार्य पाहिले म्हणजे असे म्हणावेसे वाटते की, प्राचीन काळी व्यर्थ शापभ्रष्ट होऊन त्या पतिव्रता अहिल्येला दगडरूपाचा आश्रय घेऊन श्रीराम चरणस्पर्शाची वाट पाहत काळ कंठावा लागला, तिने या जन्मात दगडाचे उपकार स्मरून भारतवर्षांत ठिकठिकाणी दगडांना देवत्वरूप देऊन त्यांची मंदिरात श्रद्धापूर्वक स्थापना केली!

## वैयक्तिक धर्माचरण

अहिल्याबाईंनी आपल्या वैधव्यपूर्ण वैयक्तिक जीवनातही तत्कालीन धार्मिक परंपरेनुसार आजीवन आचरण केले. देवीने स्थापन केलेली धार्मिक स्थळे आजही तिची कीर्ती जाहीररीत्या स्पष्ट सांगत असली, तरी तिच्या वैयक्तिक धर्माचरणांची चिन्हे अर्थातच आता प्रकट उपलब्ध नसल्याने, त्याविषयी वर्तमान समाजाला फारशी माहिती नसते, परंतु सुदैवाने त्याचे 'चक्षुर्वेसत्यं' वर्णन उपलब्ध आहे. महेश्वरला महाराणी अहिल्याबाईंच्या दरबारी विठ्ठल शामराज व केसो भिकाजी हे पेशव्यांचे वकील (राजप्रतिनिधी) होते. त्यांनी वेळोवेळी नियमितपणे पुण्यास पाठविलेली पत्रे उपलब्ध झाली असून, ती 'महेश्वर दरबारची बातमीपत्रे' या शीर्षकाने पुस्तकरूपात प्रकाशित आहेत. त्यात तत्कालीन राजकीय वृत्तांताशिवाय अहिल्याबाईंच्या वैयक्तिक धर्मपालनाचेही प्रत्यक्ष

छायाचित्र : मनोज अहिरे



**नाशिक विश्वेश्वर मंदिरासमोरील घाट.**

पाहिलेले तपशीलवार वर्णन आले आहे.

विठ्ठल शामराज हे २७ जुलै १७८१ च्या पत्रांत लिहितात, 'येथे बाईचे श्रावणमासाचा उत्साह होत आहे, तीन-चार हजार ब्राह्मण मिळाले आहेत. नित्य संतर्पण होत आहे. श्रावण एक मासपर्यंत उत्साह (उत्सव) होईल. तदोत्तर ब्राह्मणांच्या संभावना करून बिदा करतील. याप्रमाणे येथील वर्तमान.' अहिल्याबाईंचा लौकिक देशात दूरवर पसरण्याने अन्य प्रांताचेही ब्राह्मण महेश्वरला येत व अहिल्याबाई त्यांनाही दानधर्माने संतुष्ट करी. आषाढ वद्य ७ शके १७०४ च्या पत्रात म्हटले आहे. गुजराथ वगैरे प्रांतचे ब्राह्मण येथे श्रावणमासास आले आहेत. त्यांनी वर्तमान सांगितले जे, तमाम गुजराथ प्रांत फार खराब आहे. जागा जागा इंग्रजांची ठाणी मातबर स्थळी आहेत. राजश्री नारो शिवदेव व आबाजी नाईक व बाजी विठ्ठल रेवा दक्षिणतीरास आले. ते दिवशीच नावा पाठवून पावसातच संध्याकाळपर्यंत रेवा उतरून अलीकडे जेथे माधवराव राहिले आहेत, तेथेच जाऊन उतरले. दो घटका रात्री मुहूर्तेकडून बाईचे दर्शन घेऊन मुक्कामास गेले. दुसरे चार घटका दिवस राहता, त्रिवर्गास बाईंनी बोलावू पाठविले. तेही आले. मीही त्यांस भेटावयास गेलो होतो. सांगातेच वाड्यात आलो. बाई स्नान करून पूजा करीत होत्या. अर्ध्या घटकानंतर बाहेर येऊन एक घटका बसल्या. आगतस्वागत करून बाई भोजनास गेल्या. तदोत्तर तिसरे दिवशी बाई श्रीदेवी दर्शनास गेल्या होत्या.

वरील श्रावणमासाचे समाप्तीसमयी लिहिलेल्या पत्रामध्ये, सांप्रतचे वर्तमान येथे श्रावणमासी तीन-चार हजार ब्राह्मण जमा झाले होते. त्यांस पंचमी, षष्ठी, सप्तमी, तीन दिवस धर्मदेकार झाला. उत्तम, मध्यम, कनिष्ठ, प्रती रांगडे ब्राह्मण ये देशी त्यास पावला. तदोत्तर एकापासून तीन रुपये मध्यमप्रती, चार-पाच उत्तम प्रत, ऐसे देशस्थ व तैलंग तीन साडेतीन हजार ब्राह्मणात सात हजार नऊशे रुपये देकार दिला. रांगड्यात व बायका व गरीब खळक यांस, सारे मिळून, हजार-अकराशे रुपये वाटले. पाचशे ब्राह्मणांस शिधे देत असतात. त्यातील व काही नवीन देशस्थ, रांगडे व तैलंग असे



अनुष्ठानास लाविले आहेत. अनुष्ठान श्रीलिंगे असे व काही शिवकवचाचे याप्रमाणे अनुष्ठान चालू प्रतिवर्षाप्रमाणे केले आहे. आणखी एका पत्रांत लिहिले आहे, सांप्रत श्रावणमासाचा उत्साह आहे. नित्य शिधा श्रावण मासपर्यंत चालतो.

ग्रहणानिमित्त महाराणी अहिल्याबाईंनी केलेल्या धार्मिक आचरणाचे हे वर्णनही एका पत्रात आले आहे. ६ फेब्रुवारी १७९५ च्या पत्रांत केसो भिकाजी म्हणतो, गंगाजळ निर्मळ मातुश्री अहिल्याबाई यांचे नावाचा लखोटा होता. पावताच क्षणी जाऊन, वर्तमान कानावर घातले, भोजनोत्तर पत्रे श्रवण करीन. ते दिवशी ग्रहणाची कर होती. स्नाने करून, दाने करून श्रमली होती. दिवसभर उपोषण, रात्रीस भोजन झाल्यानंतर काही कचेरी जाली होती, ती बरखास्त करून, बिछान्यावर एकलीच बसून, कारभारी यापैकी विनायक बाजीराव व बाळाजी कृष्ण यांस बोलावून, त्यांजकडून पत्रे अक्षरशः श्रवण केली.

## दिनचर्या व दानधर्म

भारमलदादा होळकरांनी अहिल्याबाईंची अनेक वर्षे सेवा केली होती. अहिल्याबाईंच्या स्वर्गवासानंतर थोड्या वर्षांनी भारतात आलेल्या जॉन मालकमला भारमलदादाने अहिल्याबाईंच्या दिनचर्येची पुढील माहिती दिली. अहिल्याबाई सूर्योदयाच्या एक तास पूर्वी उठून, प्रातःकालीन प्रार्थना व पूजाअर्चा आदी नित्यकर्म केल्यानंतर नियमित वेळ पुराणे आदी धर्मग्रंथाचे श्रवण करीत. त्यानंतर दान देऊन आपल्यासमोर ब्राह्मण भोजन करून तत्पश्चात स्वतः भोजन करीत. ते सदा शाकाहारी असे. त्यांच्या घराण्यात मांसाहार वर्ज्य नसला तरी स्वतः अहिल्याबाईंनी त्याचा त्याग केला होता. भोजनोपरान्त पुनः काही ईश्वरभजन करून त्या थोडा आराम करीत. त्यानंतर पोशाख करून त्या दुपारी सुमारे दोन वाजता दरबारात उपस्थित होत; तेथे प्रायः सायंकाळच्या सहा वाजेपावेतो त्या असत. तेथून परतल्यावर अहिल्याबाई पुनः दोन तीन धार्मिक कार्यात व्यतीत करून अल्पाहार घेत. रात्री सुमारे नऊ वाजता पुनश्च शासनासंबंधी कामकाज चालत असे; ते सुमारे अकरा वाजेपावेतो चालत राहून अहिल्याबाई झोपी जात असत. (A Memoir of Central India Including Malwa by John Malcolm, Vol. I. P.P. १७७, १९५, मराठी रूपांतर)

## अखिल मान व इतिहासात अग्रस्थान

महेश्वरच्या प्रातःस्मरणीय महाराणी अहिल्याबाईंची ही नित्य दिनचर्या व नैमित्तिक धर्मपालन पाहिले म्हणजे अखिल मानव इतिहासांतील सर्वश्रेष्ठ महान महिला राज्यकर्त्यांच्याच नव्हे, तर एकूण राज्यकर्त्यांच्या नामावळीत अहिल्याबाईंचे स्थान निःसंदेह अग्रपंक्तीत स्थित होते. एका संस्कृत सुभाषितात म्हटले आहे,

*यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वं अविकेकिता*
*एकैकमपि अनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।।*

(यौवन, धनसंपत्ती, अधिकार आणि अविवेकता यांतील एक एकही अनर्थास कारणीभूत होऊ शकते; मग जेथे हे चारही असतील तेथील अवस्था काय वर्णावी?) परंतु पुण्यश्लोक देवी अहिल्याबाईंनी आपल्या पावन व्यक्तित्वाने व निष्कलंक चारित्र्याने दाखवून दिले की, 'यौवन, धनसंपत्ती व प्रभुत्व यांतील एकेकच काय; पण हे तीनही असेल तरी, जर त्यांबरोबर अविवेकता नसेल, तर ते अनर्थकारक न होता, उलट जगद्धितकारक, आत्मोद्धारक व मोक्षदायक होऊ शकतात !'

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून)

**भारतीय इतिहासात आपल्या कार्याने महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या अनेक स्त्रियांपैकी एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणजे राजमाता अहिल्यादेवी होळकर. महाराष्ट्रात जन्म घेऊन मध्यप्रदेशातील होळकर घराण्याचे नाव आपल्या सत्त्वशील, धैर्यशील, लढवय्या वृत्तीने, आध्यात्मिक जीवनशैलीने, परोपकारी व समर्पित कार्यामुळे देशभरात आणि त्रिखंडात उजळवणाऱ्या या महान स्त्रीचे कार्य इतिहासात अढळ स्थान प्राप्त करून देते.**

# समाजकार्याचे व्रत!

**डॉ. मंजुषा कुलकर्णी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रावर आधारित एकपात्री प्रयोग सादर करण्याची अनेकदा संधी मिळाली. संहिता स्वतःची असल्यामुळे सादरीकरणाच्या वेळी जणू अहिल्यादेवी माझ्यात संचारल्यासारख्या वाटायच्या. त्यांचं जीवन उभं करताना मन अश्रू, रोमांच, आनंद, कृतार्थता, देशभक्ती आणि वेदनांनी भरून यायचं.

अहिल्यादेवींचे व्यक्तिगत आयुष्य किती दुःखी, विरही, वेदनादायी तरी यांचे राजकीय आयुष्य किती कर्तव्यकठोर, चोख व देशाभिमानी असे वाटत असे. त्यांच्या त्यागी व समर्पण वृत्तीने भल्याभल्यांना नमविले होते, तर कणखर बाण्याने राघोबादादांसारख्यांनाही लाजविले होते. त्यांची दानशूरता आजही साक्ष देत उभी आहे, तर त्यांची सामाजिक कामे त्यांच्या कार्याचे द्योतक आहेत. राजकीय कारकिर्दीत समाजकार्याचा उत्तुंग हिमालय उभे करणारे लोक विरळेच असतात. त्यांच्या समाजकार्यासाठी तेव्हाचा समाज तर ऋणी होताच; पण उत्तरकालीन शतकानुशतकातील समाज ऋणी आहे. त्यांच्या या कार्याचा लाभ आजही मिळत आहे.

## जनसेवेची संधी

'अन्नं वै ब्रह्म' या तत्त्वाशी एकरूप होत अहिल्यादेवींनी अन्नदान हेच जीवनकार्य मानले. उपाशी कोणी राहू नये, हा त्यांचा दृढ संकल्प होता. त्या देवाला नैवेद्य दिल्यानंतर गोमातेला गोग्रास, ब्राह्मणांना भोजन, मगच स्वतः अन्नग्रहण करीत असत. राजप्रासादाजवळ कोणी उपाशी नाही ना, याची जातीने खात्री घेत. देशभर यात्रेकरूंसाठी त्यांनी अन्नछत्रे उभारली, ती चालू राहावीत, यासाठी दान व व्यवस्थाही केली. पशु, पक्षी, जलचर यांच्यासाठीही अन्न, चारा, दाण्यांची सोय केली. नर्मदेत माशांसाठी रामनामाच्या कणकेच्या गोळ्यांची व्यवस्था हे त्यांचे भूतदया आणि अन्नव्यवस्थापन कौशल्य दाखवते. गोरगरीब, पांथस्थ, ब्राह्मण, गोमाता, प्राणी-पक्षी सर्वांच्या अन्नाची जबाबदारी त्यांनी उचलली. त्या खऱ्या अर्थाने अन्नपूर्णा होत्या. जनसेवेला ईश्वरसेवा मानत. जनसेवेची एकही संधी त्या व्यर्थ दवडत नसत. सजीवांच्या मुखी पडलेल्या अन्नाच्या घासाने त्यांच्या तृप्तीतच त्यांना समाधान मिळत असे हीच त्यांची उदार, विशाल अंतःकरणाची शिकवण होती.

## जलसंवर्धनाचे कार्य

'जलमेव जीवनम्' या तत्त्वाची जाणीव ठेवून अहिल्यादेवींनी पाण्याच्या व्यवस्थेला अन्नाइतकेच महत्त्व दिले. केवळ आपल्या राज्यातच नव्हे, तर देशभर त्यांनी जलस्रोत उभारले. यात्रेकरू आणि प्रजेसाठी त्यांनी अनेक ठिकाणी विहिरी, बारवं, सुंदर पायऱ्या आणि उत्कृष्ट दगडी बांधकामाची जलसुविधा उभी केली. त्यांच्या बांधलेल्या विहिरी आजही दर्शनीय आणि उपयोगी ठरतात. अहिल्यादेवींनी अनेक ठिकाणी तलाव, तळी निर्माण करून पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही जलस्रोतांची व्यवस्था केली. गोड्या पाण्याच्या साठ्यांचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांनी त्या काळातच जलसंवर्धनाचे दूरदर्शी पाऊल उचलले. त्यांनी बांधलेले नदीघाट आजही नयनरम्य, श्रद्धावान आणि विसाव्याचे स्थान ठरतात. हे घाट म्हणजे त्यांच्या पवित्र जीवननदीचे काठच आहेत. उन्हाळ्यात वाटसरूंना थंड पाण्याची सोय व्हावी म्हणून अहिल्यादेवींनी ठिकठिकाणी पाणपोया उभारल्या. त्या थंडगार पाण्याने तृप्त झालेला प्रत्येकजण अहिल्यादेवींना नकळत आशीर्वाद देत असे. अशा लोकोपयोगी कार्यांतूनच त्यांच्या पुण्याची राशी वाढत गेली आणि त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. त्यांनी केवळ माणसांसाठी



चांदवड रंगमहाल बारव

पाण्याची व्यवस्था केली नाही, तर प्राणी पक्षी यांच्यासाठीही जागोजागी पाण्याचे हौद, पाणवठे तयार केले. अन्न व पाणी या मूलभूत गरजांकडे त्यांनी सर्वप्रथम आपले लक्ष केंद्रित केलेले होते, त्यामुळेच त्या उत्तम जलव्यवस्थापिकेबरोबरच आदर्श राज्यकर्त्या ठरल्या. वेदपुराणांमध्ये अन्न व पाण्याच्या दानाचे महत्त्व अधोरेखित आहे आणि अहिल्यादेवींनी त्यांच्या प्रत्यक्ष आचरणातून अमर साक्षात्कार घडवला. हिंदू संस्कृती ही मानवतावादी विचारांची पाईक आहे, हे त्यांनी जाणलं होतं. म्हणूनच त्यांच्या कार्य आणि कृतीतून आजही समृद्ध सांस्कृतिक मूल्यांचं दर्शन घडताना दिसून येतं. विदेशी पर्यटकही त्यांच्या कार्यशिल्पांजवळ थबकतात, आणि त्यातून त्यांच्या अनुकरणीयतेची प्रचिती घेतात.

## सामाजिक कार्य

अहिल्यादेवींनी संपूर्ण भारतात विविध सामाजिक कार्ये केली जसे की, विहिरी, तलाव खोदणे, मंदिरांची उभारणी व जीर्णोद्धार, घाट व रस्ते बांधणे, पशुपक्ष्यांच्या चाऱ्याची व्यवस्था, अन्नछत्रे सुरू करणे इत्यादी. हिमालयातील केदारेश्वरपासून ते दक्षिणेतील रामेश्वर, पूर्वेतील जगन्नाथ आणि पश्चिमेतील द्वारकेपर्यंत प्रमुख देवालयांवर लक्ष ठेवून अनेक कार्ये केली आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याला धर्मवृत्तीचीही जोड होती. त्यांच्या दानधर्मातून मंदिरांमध्ये पूजाअर्चा, नैवेद्य, अन्नछत्र, कथा-कीर्तन यांची व्यवस्था सुरू ठेवली गेली. त्यांनी चित्रकूट पर्वतावर रामपंचायतनाचे मंदिर बांधून प्राणप्रतिष्ठा केली, सोरटी सोमनाथाचे देवालय नव्याने उभे केले, गयेला विष्णुपद मंदिर व काशीतील दशाश्वमेघ व मनकर्णिका घाट बांधले. महेश्वरच्या नर्मदा तीरावरही अनेक घाटांची निर्मिती त्यांनी केली. अनेक रस्ते बांधले. कलकत्ता ते काशीपर्यंत त्यांनी रस्ता बांधला. अहिल्यादेवींनी समाजातील कलाकार व बाराही बलुतेदारांना सन्मान व योग्य संधी दिली. त्यांनी भूतदया आणि परोपकाराच्या भावनेने अन्नदान, वस्त्रदान, गरजूंना कपडे व घोंगड्यांचे वाटप, उन्हाळ्यात विहिरी-पाणपोया उभारणे; तसेच पशुपक्ष्यांसाठी दाणे, चारा व पाण्याची व्यवस्था केली. अहिल्यादेवींनी १७८३ मध्ये महेश्वर-पुणे दरम्यान तीन टप्प्यांची टपालव्यवस्था सुरू केली. काशी मार्गावरील लुटमार थांबवण्यासाठी भिल्लांना खासगी दौलतीतून कसण्यास जमीन देऊन यात्रेकरूंच्या रक्षणाची जबाबदारी दिली. चांदखेड, धवा, अशीरगड, गाळणा, कुशलगड, हिंगणलगड या सहा किल्ल्यांचे संरक्षण व दुरुस्ती करून नवीन रस्त्यांची निर्मिती केली. बारा ज्योतिर्लिंगे, सप्तपुरी, चार धामांसह अयोध्या, मथुरा, हरिद्वार,



काशी, अवंती, द्वारका या सप्तनगरी तीर्थक्षेत्रांवर मंदिरे, घाट, बागा, कुंडे, अन्नछत्रे व धर्मशाळा उभारून त्यांनी यात्रेकरूंसाठी सुविधा निर्माण केल्या. समाजसेवा म्हणजेच ईश्वरसेवा या तत्त्वाने प्रेरित होऊन अहिल्यादेवींनी संपूर्ण भारतभर सामाजिक कार्य केले.

## लोकोपयोगी निर्णय

'मरावे परि कीर्तीरूपे' उरावे या म्हणीप्रमाणे आजही अहिल्यादेवी कीर्तीरूपाने जिवंत आहेत. मनुष्याच्या कर्माचा सुगंध दाही दिशांना पसरत असतो. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्पा हा त्याग, दुःख, सहनशक्ती व कर्तृत्वाचे उदाहरण आहे. त्यांनी स्वसुखांचा त्याग करून होळकरांचा राज्यकारभार उत्तमपणे सांभाळला. अहिल्यादेवींनी केलेला राज्यकारभार अनेक कार्याने आदर्श व प्रेरणादायी ठरणारा आहे. अहिल्यादेवी नऊ वर्षांच्या असताना होळकर घराण्यात आशेचा किरण बनून आल्या, अन् पुढे तेजस्वी सूर्यासारख्या झळकल्या. त्यांच्या उत्तम कार्यामुळे, लोकोपयोगी निर्णयांमुळे आणि दानधर्मामुळे त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. विद्वान व गरजू गोरगरिबांना त्यांच्याविषयी नितांत आदर होता.

अहिल्यादेवींनी अनेक आघाड्या सहज लढवल्या. संघर्ष करत येणाऱ्या प्रत्येक दुःखांवर मात केली. त्या कधी खचल्या नाहीत, थांबल्या नाहीत, त्या चालत राहिल्या खांद्यावर होळकरांची धुरा, हृदयात देशप्रेमाचा झरा, धर्मावर नितांत विश्वास, पेशव्यांचरणी अपार निष्ठा अन् कर्मांवर उदंड श्रद्धा हीच त्यांची खरी दौलत होती. राज्याची धुरा खांद्यावर घेऊन देशप्रेम, धर्मनिष्ठा आणि कर्मश्रद्धेच्या बळावर प्रजेसाठी जीवन अर्पण केले. धर्माधिष्ठित राज्यकारभार उभा केला.

मातीशी इमान त्यांनी प्राणपणे राखले होते. सासऱ्यांच्या कर्तबगार प्रतिमेला स्वकर्तृत्वाने कोंदण दिले होते. पावित्र्याला नवी परिभाषा दिली होती. आपल्या कार्यातून पुण्यांचा श्लोक अढळ केला होता. अहिल्या या अहिल्यादेवी, देवी ते मातोश्रीपदापर्यंत पोहोचल्या होत्या. त्यांची कीर्ती भारतवर्षात पसरली होती. पेशव्यांच्या दरबारी त्या सन्मानित झाल्या होत्या.

शूर वीरांगना, श्रेष्ठ समाजसेविका, राजधुरंधर, कुशल प्रशासक, संयमी आणि भक्तिमय जीवन जगणाऱ्या मातोश्री अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त, महाराष्ट्राच्या तेजस्वी, महान स्त्रीरत्नाला लेखाच्या माध्यमातून कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहण्याचे सौभाग्य मिळाले त्याचा आनंद वाटतो. दुःखाने भरलेले व्यक्तिगत आयुष्य असून सुद्धा इदं न मम आणि राष्ट्राय इदं न मम या समर्पण भावनेने आपल्या जीवनरूपी चंदनाला शेवटपर्यंत उगाळून सुगंधित करणाऱ्या या मातोश्रीपदावर पोहोचलेल्या अद्वितीय व कर्तबगार स्त्रीस शतशः मानवंदना !

(लेखिका कवयित्री असून साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त आहेत.)

अहिल्याबाईंनी आपला राज्यकारभार महेश्वरवरून चालवला. नर्मदेच्या काठावर उभे असलेले हे गाव अहिल्याबाईंच्या वास्तव्याने पावन झाले. त्या महेश्वरला राहायला आल्यानंतर या नगराचे वैभव पुन्हा वाढले. अहिल्याबाईंनी महेश्वर येथे सुंदर घाट व मंदिरे बांधली. संस्कृत पाठशाला स्थापन केल्या. अहिल्याबाईंनी सुरू केलेली कोटी लिंगार्चनाची प्रथा आजही महेश्वर येथे विधीपूर्वक चालू आहे.

# एक तात्त्विक रूप!

**शांता ज. शेळके**

एखाद्या इतिहासकालीन थोर व्यक्तीशी आपला परिचय क्रमाक्रमाने कसा होत जातो ते बघण्याजोगे आहे. आपल्या बालपणी छत्रपती शिवाजी महाराज यांना आपण ओळखू लागलो ते बहुधा त्यांच्या सर्व परिचय चित्रामधून. महाराजांचे स्वराज्य स्थापनेचे महान कार्य, त्यांची उदार परधर्मसहिष्णु वृत्ती, त्यांची लोकसंग्रह करण्याची हातोटी किंवा त्यांचा असामान्य मुत्सदीपणा यांची ओळख पटण्यापूर्वी आपल्याला महाराजांचे ते गरुडनाक, त्यांच्या मस्तकावरचा तो जिरेटोप, त्यातून रुळणारा तो मोत्यांचा तुरा आणि गळ्यातल्या त्या मोत्यांच्या माळा याचीच ओळख आधी पटते आणि आपल्या मनपटलावर ते रूप कायमचे ठसून राहते. ज्ञानदेव म्हटले, की अनेक बऱ्या-वाईट, ओबड-धोबड चित्रातून पाहिलेली त्यांची ती पद्मासन घालून बसलेली मूर्तीच आधी आठवते. तुकाराम म्हटले, की बुक्क्याचा टिळा, गळ्यातल्या तुळशी माळा अन् हातातली वीणा आठवते. तानाजी मालुसऱ्यांचे स्मरण झाले, की आधी लगीन कोंडाण्याचे, मग माझ्या रायबाचे या त्यांच्या घनघोर प्रतिज्ञावाक्याच्या आधी एकेक लिंबू पेलू शकतील, अशा त्यांच्या भरघोस मिशांचा तपशीलच मनात जागा होतो आणि लोकमान्य टिळकांचे 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच...' हे ब्रीदवाक्य लोकमान्यांच्या बालपणातल्या त्या भुईमुगाच्या शेंगांच्या टरफलाच्या सुप्रसिद्ध कथेच्या हातात हात घालून मुळी आपल्यासमोर येते.



चौंडी येथील शिल्पसृष्टी.

### तात्त्विक रूप

या सर्व गोष्टी आज आठवण्याचे कारण म्हणजे अहिल्याबाई होळकर या पुण्यश्लोक साध्वीशी आपला परिचय कसकसा होत गेला याचा मी विचार करू लागले आणि मन अगदी भूतकाळात गेले, मग डोळ्यापुढे आले ते अहिल्याबाईंचे एक चित्र, तेही शाळकरी जीवनात शाळेच्या क्रमिक पुस्तकात पाहिलेले. अहिल्याबाईंचे मला झालेले ते पहिले दर्शन. डोक्यावरून घेतलेला पदर, सरळ भांगाखाली कपाळावर कुंकवाची बोटभर आडवी चिरी, हातामध्ये घेतलेले पार्थिव लिंग आणि त्यावर हातानेच धरलेली बेलफुले असे त्या चित्रात पाहिलेले. अहिल्याबाईंचे साधे सरळ सात्त्विक रूप मनामध्ये एकदम भरले. खरे तर त्यावेळी अहिल्याबाईंचे इतिहासामधील स्थान, तिचे कर्तृत्व, औदार्य किंवा तिचे कारुण्य, वैधव्य कशाचाच काही पत्ता नव्हता. तो सारा इतिहास फार नंतर कळला; पण अहिल्याबाईंनी प्रथम मनाशी जवळीक साधली ती त्या चित्रातून. आजही अहिल्याबाई होळकर हे नाव आठवले की, प्रथम तिचे रूप डोळ्यापुढे उभे राहते.

त्याच बालवयात नंतर केव्हातरी शाळेमध्ये आमच्याकडून एक महाराष्ट्र गीत पाठ करून घेण्यात आले होते. मराठीत प्रसिद्ध महाराष्ट्र गीते दोन, एक श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे, दुसरे गोविंदाग्रजांचे; पण हे महाराष्ट्रगीत एका वेगळ्याच लेखकाने लिहिले होते. दत्तो अप्पाजी तुळजापुरकर हे त्या लेखकाचे नाव. त्यांच्या 'माझे रामायण' या कादंबरीच्या शेवटी ते गीत दिलेले होते. मला ते गीत फार आवडायचे. अजूनही आवडते, त्यात एक कडवे होते.

*शांभवी अहिल्या होळकरांची पुरी।*
*ती सती रमा भटवंशाला उद्धरी ।*
*स्वातंत्र्य लक्ष्मी प्रचंड संगर करी । प्रणिपात*
*असो या देवींना महाराष्ट्र देशा।*
*तुला प्रभाती प्रसन्न हृदये प्रणाम परमेशा।*

या कडव्यात कवीने ज्या तीन देवींना वंदन केले आहे, त्यात त्यांनी अहिल्याबाईंचा अंतर्भाव केला आहे. माधवरावांबरोबर सती जाणारी रमाबाई, 'स्वामी' कादंबरीने मनात जिवंत उभी केली. स्वातंत्र्य लक्ष्मी लक्ष्मीबाईच्या पराक्रमाची स्फूर्तिदायक गाथा मराठी आनंदराव टेकाड्यापासून तो हिंदी सुभद्राकुमारी चौव्हानपर्यंत अनेक कवी कवयित्रींनी उत्कट शब्दात गायिलेली. लहानपणी पाठ केलेल्या त्या महाराष्ट्र गीतातून पुन्हा एकदा अहिल्याबाई होळकर माझ्याजवळ आल्यासारख्या वाटल्या.

## अलौकिक तेज

इतिहासाने मला सांगितलेली अहिल्याबाईंची ही चरित्र कथा. ती जुजबी आहे. केवळ रूपरेषात्मक आहे. या रेषात्मक चित्रात नंतर रंग भरत गेले. अहिल्याबाईंसंबंधी ऐकलेल्या अनेक कथा-काव्यात आलेले त्यांच्या संबंधीचे उल्लेख, एकदा ओझरते पाहिलेले इंदोर, यातून रंग चित्राला जिवंत करू लागला. मनातले अहिल्याबाईंचे चित्र आणखी थोडेसे जिवंत झाले. याच अहिल्याबाईंनी अनंत फंदींसारख्या गुणी शाहिराचा गौरव केला; पण त्याबरोबरच आपली कवित्वशक्ती श्रृंगारिक लावण्यांऐवजी ईश्वरविषयक भक्तिभावाची कवने लिहिण्यात त्याने खर्ची घालावी, असा प्रेमाचा इशाराही तिने त्याला दिला. या शाहिराने अहिल्याकालीन महेश्वराचे वर्णन असे केले आहे.

*नर्मदा तट निकट घाट। बहुत अफाट।*
*पायऱ्या दाट। चिरेबंदी वाट।*
*मुक्तिची शिवालये। कैलाससाम्यता नाना*
*परिची रचना । रचली रामकृष्ण मंदिरे।*
*बहुत सुंदरे। बांधली घरे ।।*
*रम्य रमणूक हवेल्या । नयनी पाहिल्या...*
*गरिब गुरिब कंगाल गांजले अडले।*
*भिडले त्या देखोनिया अन्नछत्र।*
*सर्वत्र सारखे, नाही पारखे पाहिले नयनी।*
*महेश्वर क्षेत्रपुर।*

अनंतफंदींच्या या काव्यपंक्तीतून अहिल्याबाईंचे धर्मशील मन, त्यांची दानशूर वृत्ती, गोरगरिबांना साहाय्य करण्याची त्यांची तत्परता, त्यांचे वैराग्य आणि त्यांचा हृदय तपशील पुन्हा मनात गोळा होत गेला. त्याबरोबरच एका अगदी आधुनिक अगदी वेगळ्या प्रकारचे प्रतिभेचे देणे लाभलेल्या कवीनेही अहिल्याबाईंचा गौरव केलेला पाहिला आणि अहिल्याबाईंबद्दलचा आदर कितीतरी पटीने वाढला. हा कवी म्हणजे माधव जूलियन. कुणी काय बांधले? नावाची त्यांची एक काहीशी अप्रसिद्ध कविता आहे. या कवितेने कवी अहिल्याबाईंचे कर्तृत्व पुढील सुंदर कविता पंक्तीतून गौरवितो.

*स्थळे शोधुनी निसर्गसुंदर रम्य मंदिर*
*घाट कुणी। वा पडशाळा बांधून केले*
*येते जाते लोक, ऋणी ।।*



अन्नछत्रही विद्याभिक्षुक यात्रिक यास्तव करून सुरू। संस्कृती चिंतेतून सोडविले विद्याध्यापक धर्मगुरू ।। जिच्या व्यक्तिगत उत्पन्नातून वाहे दानाची सरिता। ती गंगाजल निर्मल राणी कोण जिचा नच कोश रिता ।। भोग पराङ्मुख होय परी न घे कर्तव्याचा संन्यास। निदिध्यास घे सदा शिवाचा-योग कठीण हा अन्यास। राजयोग जनकाचा नाही भाकड गोष्ट पुराणीची। रहस्य दावी इतिहासीची कथा अहिल्या राणीची। कांचन गंगा वाहवूनी जी उभवी यशाचा धवलगीरी। होळकर कुलप्रभा, कोण हो तत्स्मृतीला न धरील शिरी।।

लहानपणी शाळेतल्या क्रमिक पुस्तकात अहिल्याबाईंचे जे चित्र मी पाहिले होते, त्या चित्रात एक एक रंग भरत जाता जाता त्याला शेवटी जिवंत परिपूर्णता आली ती माधव जूलियनांच्या या सुंदर काव्यपंक्तीतून. पुढे प्रौढ वयात दुर्गाबाई भागवतांसारख्या रसिक आणि व्युत्पन्न विदुषीने महेश्वरची महाश्वेता आपल्या लेखाच्या द्वारा अहिल्याबाईंचे पुण्यस्मरण पुन्हा एक वेळ मनात जागे केले. जुन्या चित्राचे रंग नव्याने उजळून आले.

## शिवपूजेचे कठोर व्रत

आता अहिल्याबाईंबद्दल विचार करताना तिच्या व्यक्तिमत्त्वात पडलेल्या अनेक परस्परविरोधी गुणांचा मेळ जाणवतो आणि त्यातून साकार झालेले तिचे कर्तृत्व मनाला चटका लावून जाते. पतीच्या निधनानंतर ती सती गेली नाही. पण वैधव्याच्या आगीत ती जन्मभर जळत राहिली. जातीने स्त्री; पण पुरुषांच्या कर्तबगारीने तिने राज्य चालवले. जन्मभर राज्यवैभवात राहूनही भोग न घेता ती कमलपत्रासारखी अलिप्त राहिली. शिवपूजेचे कठोर व्रत तिने जन्मभर पाळले. आपल्या उदार धर्मशीलतेने दानाचा अखंड प्रवाह तिने अशा रीतीने वाहता ठेवला की, परकीय इंग्रज राजवट वा इथली देशी राजवटही त्यावर कसले बंधन घालू शकली नाही. विद्याशाळा आणि अन्नछत्रे, वृक्षाच्छादित रस्ते आणि जलसंपन्न तलाव अहिल्याबाईंच्या दातृत्वाची ही जिवंत स्मारके आजही सर्वत्र बघावयास मिळतात. स्त्रीत्वाचे परमवैभव, शीलसंपन्नता सांभाळून प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालून आपल्या जीवनाची ही जी सुंदर घडण केली, त्याला खरोखर तोड नाही. रणात तलवार गाजवण्याहून, सती जाण्याहून प्रपंचाचा त्याग करून संन्यास घेण्याहूनही हे अवघड आहे. ते जन्मभर पाळणारी अहिल्याबाई आता प्रौढ वयात अधिक थोर वाटू लागते. शौर्य आणि कारुण्य यांचा जणू संगमच असे तिचे व्यक्तिमत्त्व काळजाला चटका लावून जाते. मस्तक तिच्या पायाशी आदराने लवते.

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून)

**मराठ्यांच्या इतिहासात वैध्यव्याच्या आणि पुत्रशोकाच्या अग्नीत होरपळून निघालेल्या या कर्तृत्ववान महिलेने कर्तव्याच्या वेदीवर निधड्या अंतःकरणाने उभे राहून मल्हारराव होळकर यांच्या या सुनेने मराठी साम्राज्याचा कीर्तीसूर्य तळपत ठेवला आणि प्राचीन काळातल्या सातवाहन राज्ञी नागनिका, वाकाटक राज्ञी प्रभावतीगुप्ता चालुक्य लोकमहादेवी आणि यादव लस्थियज्वा यांच्या मालिकेत आपले नाव गुंफून टाकले, यात शंका नाही.**

# राजयोगिनी अहिल्यादेवी

**डॉ. मो. दि. पराडकर**

तीनशे वर्षांपूर्वी म्हणजे १३ ऑगस्ट १७९५ ला पंचतत्वात विलीन झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या हयातीत कर्तृत्वाच्या जोरावर बारामतीच्या कविवर्य मोरोपंतांकडून देवी अहिल्याबाई जाहली जगत्त्रयांत तू धन्या। न न्याय धर्मनिरता अन्या कलीमाजि ऐकिली कन्या।। हा प्रशंसेचा नजराणा मिळवला आणि इंदूर शहराला 'अहिल्या नगरी' हे नाव मिळवून दिले हे उल्लेखनीयच ठरेल. मराठ्यांच्या इतिहासात वैध्यव्याच्या आणि पुत्रशोकाच्या अग्नीत होरपळून निघालेल्या मल्हारराव होळकर यांच्या या कर्तृत्ववान सुनेने कर्तव्याच्या वेदीवर निधड्या अंतःकरणाने उभे राहून मराठी साम्राज्याचा कीर्तीसूर्य तळपत ठेवला आणि प्राचीन काळातल्या सातवाहन राज्ञी नागनिका, वाकाटक राज्ञी प्रभावतीगुप्ता चालुक्य लोकमहादेवी आणि यादव लस्थियज्वा यांच्या मालिकेत आपले नाव गुंफून टाकले, यात शंका नाही.

सीना नदीच्या काठी मराठी सैन्याचा तळ पडलेला असताना वाळूत शिवलिंग घडवणाऱ्या या मुलीने घोडा उधळला असतानाही शिवलिंगाचे रक्षण आपल्या देहाने केलेले पाहून बाजीराव पेशवे आणि सरदार मल्हारराव होळकरांनी असे साहस करण्याबद्दल जाब विचारला असताना धिटाईने उत्तर दिले, ही वाळू नव्हे... हे शिवलिंग! मी घडविले!

आपण जे घडवावं ते आणप्राणे रक्षावे ऐसे तर सारेच थोर सांगतात. मी तेच केले. काही चुकलं का? बाजीरावांनी तात्काळ हिऱ्याची पारख केली आणि ते म्हणाले, मल्हारबा, या पोरीला तुमची सून करून



घ्या. मल्हाररावांनी हे प्रमाण मानले आणि सन १७२५ मध्ये जन्मलेली माणकोजी शिंद्यांची कन्या होळकरांची सून बनली. तिने मिळालेल्या दौलतीचे पन्नास-साठ वर्षे रक्षण आणि संवर्धन करून 'मरावे परी कीर्तिरूपे उरावे' ही उक्ती खरी करून दाखवली. यासाठी पतिमरणानंतर सती जाण्याच्या रूढीविरुद्ध तिला उभे राहावे लागले. सासऱ्याचा सल्ला मानून दौलतीतल्या गोरगरीब प्रजेची माता व्हावे लागले, 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाहीं' हेच खरे ठरले आणि कर्तव्याच्या कठोर वेदीवर प्रजेचे हित तेच आपले हित हे असिधाराव्रत स्वीकारणाऱ्या, राजकारण आणि धर्मकारण यांचा समन्वय साधणाऱ्या 'शिवनिर्माल्यापरी सतीने विभव मानिले सारे' याचे मूर्तिमंत उदाहरण घालून देणाऱ्या उपभोगशून्य राणी अहिल्यादेवींचा आयुष्यक्रम सुरू झाला.

महेश्वरच्या आसपासच्या मर्यादित क्षेत्रात जिचा अधिकार चालत होता तिने काशी, गया, पुरी, सोमनाथ, बद्रीकेदार अशा दूरदूर ठिकाणी लाखो रुपये कसे पाठविले? या क्षेत्रांची माहिती त्या काळी तिला कशी मिळाली? आणि परप्रदेशात प्रचंड बांधकामे करून घेत असताना अपहार, लबाडी असे अपप्रकार झाल्याची नोंद कशी नाही? यापैकी पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे मनाने श्रीमंत असणाऱ्या अहिल्याबाईंच्या व्यक्तित्वातच शोधली पाहिजेत. होळकरांची गंगाजळी सोळा कोट रुपयांची होती हे खरे; परंतु ती स्त्रीधनाची होती. धनगरी रिवाजानुसार घरधनी दिवसभराची कमाई म्हणून बायकोला एक रुपया देत असे त्यातील चार आणे तिचे खास स्त्रीधन म्हणून वेगळे असे. मल्हारराव ही माळव्याची सुभेदारी मिळवणारी, राजपुतांना जरबेत राखणारी, पेशव्यांतर्फे उत्तरेकडील मुलुखगिरी वसूल करणारी मातबर असामी. त्यांची बायको गौतमाबाईंपासून ही गंगाजळी होती. सन १७३३ मध्ये बाजीरावांनी मल्हाररावांना सनद देऊन होळकरांच्या एकूण जहागिरीपैकी काही प्रांत गृहिणीकडे असावे असे म्हटले होते. दरएक परगण्यातील खासगी जहागीर 'यावच्चंद्रदिवाकरौ चालावी' असे नमूद केलेले होते. गौतमाबाईंनंतर अहिल्याबाईंकडे आलेल्या पहिल्या सनदेनुसार असलेल्या स्त्रीधनाच्या वसुलीचा आकडा रुपये २,९९,०१० इतका होता हे लक्षात ठेवले पाहिजे. त्यात गौतमाबाईंच्या सवती आणि अहिल्याबाईंच्या ८-९ सवती यांना मिळालेले प्रीतिदत्त धन त्यात मिळवले



चौंडी येथील शिल्पसृष्टी.

आणि दरसाल अहिल्याबाईला चोळीसाठी म्हणून एक लाख तेरा हजार आठशे रुपये मिळत असत. या खासगी मिळकतीतून अहिल्याबाई खर्च करीत असे. सत्ता आणि संपत्ती असताना या दानाला अविवेकाचा स्पर्श झाला नाही किंवा राज्यकारभाराकडे दुर्लक्षही झाले नाही.

वस्तुतः राज्यकारभाराकडे तिचे विशेष लक्ष होते हे अनेक उपलब्ध पत्रांवरून सांगता येते. पुणे-महेश्वर अशी टपाल व्यवस्था तिने १७८३ पासून पदमसी नेनसीच्यामार्फत सुरू केली. २० मुक्कामांची (टप्प्याची) ही डाक चालू ठेवण्यासाठी २० कासीद जोड्या नेमून दर जोडीला २०४ रुपयांचा मुशाहिरा ठरवून टाकला होता. पाच-सहा दिवसात एका वेळची फेरी पुरी होई; अधिक वेळ लागला तर मुशाहिऱ्यात 'कार' होत असे. काही नुकसान झाले तर पदमसीकडून भरपाई मिळे.

पेशवाई हिशेबानुसार होळकरांकडे ७५ लाख रुपयांची मामलत होती. त्या मुलखाचा एकूण वसूल सुमारे १ कोटींचा होत असे. हा सर्व हिशेब स्वतः अहिल्याबाई पाही. पुण्यातील पेशव्यांच्या हिशेबात अहिल्याबाईंनी कधी वेळ चुकविली नाही. इतकी दक्षता बाळगणारी फक्त तीच होती.

तिचे वकील कोण कोठे कोठे यांची जी यादी उपलब्ध आहे त्यात अयोध्या, उदेपूर, कोटा, ग्वाल्हेर, जयपूर, दिल्ली वगैरे १३ ठिकाणी तिने खंडो जगदेबराव, भगवंतराव जगताप यासारख्यांची नेमणूक केली होती असे दिसते. हे निव्वळ शोभेसाठी असणे शक्य नाही. राजधर्म जर ती जाणत नसती तर १३ दरबारांनी तिच्या वकिलांना आपल्या दरबारी कसे राहू दिले असते?

'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र शास्त्रचिन्ता प्रवर्तते' हा सिद्धान्त अहिल्याबाईंना माहीत होता. सेनापती जरी तुकोजीराव असले, तरी सैन्याच्या व्यवहाराकडे या क्षत्राणीचे बारीक लक्ष असे. इ. स. १७६७ साली भले मोठे सैन्य घरभेदेपणाला बळी पडलेले आणि होळकर राज्यावर चालून आलेल्या राघोबाला तिने मुत्सद्दीपणाने आपलेसे करून घेतले हे खरे; परंतु सैन्याची जय्यत सिद्धता करून ठेवून क्षिप्रा पार करून आलात तर तलवारीला तलवार भिडेल असा निरोप तिने तुकोजीकरवी पाठवलाच होता हे विसरता येणार नाही. रामपूरचे बंड लष्कराच्या जोरावर आत्मविश्वासाने मोडून काढण्याचे काम तिचेच. बंडखोर चंद्रावतांची हाडे खिळखिळी करण्याच्या कामात तिने हयगय केली नाही. त्यांचा पुढारी बनलेल्या सोभागसिंगाला सरळ तोफेच्या तोंडी देण्यात तिने कमी केले नाही. हल्लेखोरांवर तिने जे विजय मिळवले ते ऐकून नाना फडणीसांनी पुण्यात तिचा गौरव करण्यासाठी तोफा उडवल्या आणि 'शापादपि शरादपि' अशी बायकात अहिल्याबाईच दिसून आली, असे उद्‌गार काढले. 'बाईच्या मांडीवर कुणीतरी दत्तक द्यावा, तिला दानधर्मात गुंतवावे, कारभार माझ्या हाती द्यावा' अशी मागणी करणाऱ्या गंगोबातात्या चंद्रचूडांना तिने राज्यातून हाकलून दिले खरे; परंतु पुढे राघोबाच्या बाजूने उभे राहिल्यामुळे त्यांची संपूर्ण संपत्ती, किल्ले, जहागीर ज्यावेळी माधवरावांनी जप्त केली त्यावेळी या जुन्या सेवकाच्या सर्व कुटुंबीयांना आपल्या घरी आणण्याची व्यवस्था या कर्तव्यकठोर; परंतु माणुसकीला जपणाऱ्या राणीने केली हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. आपल्या सैन्याची उत्तम व्यवस्था ठेवणाऱ्या आणि प्रजेवर पुत्रवत् प्रेम करणाऱ्या आणि रुढार्थाने राजकारणी नसणाऱ्या या राणीच्या विरुद्ध इ. स. १७८० मध्ये ज्यावेळी तुकोजीरावांनी कारस्थान केले त्यावेळी सैन्याने त्यांना चक्क बजावले अहिल्याबाईंशी तुम्ही लढाई करू म्हणाल तर आम्ही तुमचे चाकर नाही. या रोखठोक उत्तरातच अहिल्याबाईंचे यश साठविलेले आहे. मराठी सरदारांनी मिळवलेल्या विजयाचा त्यांना आनंद



आणि अभिमान वाटे. म्हणूनच सन १७८३ मध्ये महादजी शिंद्यांनी ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केल्यानंतर त्यांनी तोफा उडवून आपला आनंद व्यक्त केला. १२ वर्षांनंतर मराठ्यांनी खर्चाच्या लढाईत निजामावर मिळवलेला विजयही त्यांनी साजरा केला.

'प्रजाहिते हितं राज्ञः' हे कौटिल्याने सांगितलेले तत्त्व त्यांनी आचरणात, आणलेले दिसते. जाती, वर्ण आणि धर्म यांतील भेद त्यांच्याजवळ नव्हता. दुराग्रह आणि मत्सर यांनी अंतःकरण दूषित झालेले नसल्यामुळे त्यांनी संस्थानाच्या कारभारात शिस्त आणली आणि उत्कृष्ट राजनीतीचा धडा घालून दिला. त्यांनी घडवून आणलेल्या अर्थ-सुधारणाही 'फडणीसांचे कायदे' या नावाने होळकर दप्तरांत जमा झालेल्या कागदांवरून स्पष्ट होते.

आस्वलाचे मारणे फार कठीण. सुरत धरून मारले तरच मरेल नाहीतर आस्वलाचे चपेटीत कोणी सापडला तर गुदगुल्या करूनच अस्वल त्यास मारील. तद्वत ही इंग्रजांची लढाई आहे. पाहता यांचे मारणे कठीण. देवी अहिल्याबाईंनी बाळाजी बाजीराव व नानासाहेब पेशव्यांपासून सवाई माधवरावांच्या मृत्यूपर्यंत (इ.स. १७४० ते १७९५) पर्यंतच्या मराठी राज्यातल्या उलाढाली डोळसपणाने पाहिल्या होत्या याची साक्ष त्यांच्या वेळोवेळी लिहिलेल्या पत्रांवरून स्पष्ट होते.

अहिल्यादेवीच्या काळात धनसंपत्तीचे वैयक्तिक आणि सार्वजनिक असे दोन भाग स्पष्ट असत. त्यांनी अपरंपार दानधर्म केला, आसेतुहिमाचल देवळे बांधली, घाट बांधले अन्नछत्रे चालविली, धर्मशाळा बांधल्या हे



भारतातील इंग्रजी राजकारणाचे अंतःस्थ स्वरूप या दूरदृष्टी असणाऱ्या अहिल्याबाईंना समजले होते. अहिल्याबाईंनी त्यांच्या राजकारणाची केलेली व्याख्या त्यांच्या मार्मिकतेची व चाणाक्षपणाची द्योतक आहे. इंग्रजांची प्रबलता हिंदुस्थानात फार झाली. इंग्रज सर होणे दुरापास्त आहे. त्यांस सर करण्यास साहाय्य एक श्रीमंत रावसाहेबांचा पुण्यप्रताप. ते केवळ अवतारी पुरुष. त्यांच्या कृपावीक्षणे मात्र मसलत सिद्धीस जाईल पावेल. वरकड व्याघ्रादिक श्वापदे बळ व युक्तिप्रयुक्तीने मारतील; परंतु

खरे; परंतु या कामी सार्वजनिक संपत्तीचा एक पैसाही उपयोगात आणला नाही, प्रसंगी वैयक्तिक संपत्ती खर्च करूनही होळकर प्रजाजनांचे हित केले. वाटमारी करणाऱ्या भिल्लांना साखळदंडांनी बांधून पकडून आणले व त्यांना लूटमारीचे कारण शांतपणे विचारले. त्यांनी यात्रेकरूंना लुबाडण्याचा धंदा चालू ठेवल्याशिवाय पोटे भरत नाहीत असे सांगितल्यावर प्रमुख टोळ्यांची मोजदाद करून त्यांच्या उदरनिर्वाहाइतकी जमीन आपल्या खासगीतील जमीन काढून देण्याचे हुकूम

दिले; काहींना घाटामध्ये रखवालीचे काम देऊन दौलतीकडून त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली तर काहींवर यात्रेकरूंच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली. यामुळे यात्रेकरूंचा मार्ग तर निर्वेध झालाच; शिवाय भिल्लांच्या जीवनमानाचा प्रश्नही सुटला. पुढे होळकरी राज्य खालसा केल्यानंतर चिकित्सक इंग्रजांनी प्रजेची माहिती जमा करताना अहिल्यादेवींच्या काळात हयात असलेल्या वृद्ध माणसांना एकत्र करून त्यांच्याकडून बाईंच्या राज्यकारभाराबद्दल आणि नैतिक वर्तनाबद्दल खोदून-खोदून प्रश्न विचारले. जनरल मालकमसारख्या जबाबदार अधिकाऱ्याने या प्रश्नांची उत्तरे नोंदवून ठेवलेली आहेत. विविध गावी विविध वयोगटातील लोकांना आम्ही हे प्रश्न विचारले. सर्वांच्या तोंडून एकच उत्तर ठाम शब्दात आले. ही बाई सामान्य राणी नसून देवता होती! आमचे पालन करण्यासाठी तिने मानवी देह धारण केला होता.

असे असामान्य यश महाराष्ट्रात मिळवणाऱ्या दोनच व्यक्ती. एक छत्रपती शिवाजी महाराज व दुसरी इहलोकीचे देवीपद प्राप्त करून घेणारी स्त्री देवी अहिल्याबाई.

ईशावास्योपनिषदांतल्या पहिल्याच श्लोकातल्या

*ईशावावास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत्।*
*तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम् ।।*

या शब्दात व्यक्त झालेल्या आदर्श स्वतःच्या पुण्यश्लोक जीवनाच्या रूपाने सादर करणाऱ्या अहिल्याबाईंना उद्देशून श्रीमती शांता शेळके यांनी लिहिलेल्या काव्यपंक्ती

*राजयोगिनी सती अहिल्या होळकरांची राणी।*
*अजून नर्मदा जळी लहरती तिच्या यशाची गाणी।।*

यथार्थच आहेत.

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून पुनर्मुद्रित)

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर १८व्या शतकातील भारतीय राज्यकर्त्यांत संभवतः अशी एकमात्र शासिका होती, जी जनकल्याणात्मक धोरणांच्या कसोटीवर पूर्णतः उतरते. आपल्या जीवनकालातच त्यांना 'वनिता ते देवता' होण्याचा गौरव प्राप्त झाला.**

# दातृत्वातून सांस्कृतिक एकता

**डॉ. बालकृष्ण पंजाबी**

इंदूर जिल्हा १९८० च्या दशकात पुरातत्वीय संघाच्या उपाध्यक्षपदी असताना होळकरांसंबंधी एक दुर्लभ फोटो अल्बम पाहण्यात आला होता. त्यातील काही फोटो होळकरांच्या कुलदेवता श्री मल्हारी मार्तंडाच्या मंदिराचे होते. मंदिराच्या पूजागृहात ठेवलेल्या देवी-देवतांबरोबरच लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची धातुनिर्मित एक छोटीशी प्रतिमा ही एका फोटोत दिसत होती. अहिल्यादेवींच्या समकालीन, लेखकांनी, चरित्र लेखकांनी कवींनी आणि जनसामान्यांनीही त्यांना 'देवी, प्रातः स्मरणीय' आणि 'लोकमाता' अशा श्रद्धापूर्ण शब्दांनी संबोधित करून त्यांना पूजनीय मानले होते. कोणत्याही महाराजा, महाराणी किंवा शासकाला त्याच्या हयातीतच देवत्व प्रदान करून त्याला पूजनीय मानले असेल असे तेव्हाच संभाव्य असू शकते की, त्या राज्यकर्त्याचे राजस्व (आर्थिक) सिद्धांत आणि राजकीय धोरणात व्यापक स्वरूपात जन-कल्याणात्मक भावना प्रतिबिंबित होत असेल.

अहिल्यादेवी होळकर अठराव्या शतकातील भारतीय राज्यकर्त्यांत संभवतः अशी एकमात्र शासिका होती, जी जनकल्याणात्मक धोरणांच्या कसोटीवर पूर्णतः उतरते. आपल्या जीवनकालातच त्यांना 'वनिता ते देवता' होण्याचा गौरव प्राप्त झाला. आगामी पिढ्यांसाठी तर त्या श्रद्धा भक्ती आणि पूजेच्या मानकरी ठरल्या.

अठराव्या शतकातील अस्थिर आणि अराजकतेच्या युगात होळकरांच्या एका लहानशा राज्याची शासिका अहिल्यादेवी व लोकमाता होण्याचा गौरव व सन्मानाची मानकरी कशी ठरली? हा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या तीन दशकाच्या (इ. स. १७६७ ते १७९५) राजकीय कार्यकाळाचा सखोल अभ्यास केला तर सहजच उमगते. या अभ्यासाचा निकष निदर्शनास येतो की, त्यांनी पूर्ण योग्यता आणि निष्ठेने राजधर्माचे उत्कृष्टरीत्या पालन केले. याचबरोबर राजवैभवाचा कैफ, मोह आणि विकृत विचार यापासून त्यांनी खंबीरपणे स्वतःला पूर्णतः अलिप्त ठेवले. राज्याला 'भगवान शंकराची अमानत'



आणि राजकोषाला 'राज्यातील नागरिकांची अमानत' ही संकल्पना मनी ठेवून लोककल्याणासाठी ज्या नीती नियमांना कार्यरूपात परिणीत केले. त्यामुळेच त्यांना आपल्या जीवनकालातच 'लोकमाता', 'देवी' हा बहुमानाचा दर्जा प्राप्त झाला. अहिल्याबाईंची सहज, सरळ व साधी राहणी ही जीवनशैलीच लोकांच्या श्रद्धेसाठी कारणीभूत ठरली. मानवी संवेदनांचे आकलन करण्याची अपार क्षमता त्यांच्या अंगी होती.

अहिल्यादेवींच्या महानतेचा पायाभूत आधार होता त्यांचे न्यायसंमत शासन, सर्वधर्मसमभाव व सहिष्णुतेचे धोरण. इंदूर व महेश्वरच्या नागरिकांचा विकास आणि कुशल राजनीती हा त्यांच्या अंगचा मूलभूत गुण, परंतु ज्या कार्यांमुळे त्यांना अखिल भारतीय ख्याती मिळाली; त्यांची महानता स्वीकारली गेली ती कार्ये म्हणजे दानशीलता आणि निर्माणकार्य ही होत. त्यांच्या दानशीलतेचे प्रामुख्याने दोन विशेष आढळतात. प्रथम म्हणजे त्यांची दानशीलता सार्वजनिक उपयोगितेबद्दलच्या सिद्धांतावर आधारित असणे हा गुण होय. अर्थातच जनसामान्यांच्या सार्वजनिक उपयोगासाठी धर्मशाळा, घाट, विहिरी, मंदिरे व अन्नछत्रासाठी विशाल निर्माणकार्य. दुसरे विशेष हे की, या सार्वजनिक उपयोगितेच्या सिद्धांतावर आधारित या दानशीलतेच्या पार्श्वभूमीवर असणारी अखिल भारतीय दृष्टी. ज्यांना काही लोकांनी 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' असे उल्लेखिले आहे, त्यांच्या दानशीलतेची विस्तृत व्याख्या करीत असता हे म्हणणे योग्यच ठरेल की, त्यांच्या दानशीलतेतून होणारे सार्वजनिक निर्माण कार्य आपल्या लहानग्या राज्यसीमेपर्यंतच सीमित नसून ते उत्तरेला बद्रीनाथ धामापासून ते दक्षिणेला रामेश्वरापर्यंत आणि पूर्वेला जगन्नाथपुरीपर्यंत पसरलेले आहे. अहिल्याबाईंची ही अखिल भारतीय दृष्टी त्यांच्या हृदयात वसलेली भारतीय सांस्कृतिक एकता आणि राष्ट्रीय समभावनेलाच अभिव्यक्त करीत आहे.

व्यावहारिक आणि उपयोगी दानशीलतेचे प्रतीक आणि निर्माणकार्याची विस्तृत यादी आणि प्रामाणिक माहिती होळकरांच्या दफ्तरात उपलब्ध आहे. चारधाम, सप्तपुरी आणि बारापैकी आठ ज्योतिर्लिंगांशिवाय अखिल भारतवर्षात अन्य अशी स्थळे आहेत जी यादीत अधिकृतरीत्या समाविष्ट केलेली आहेत. बद्रीनाथ (हिमालय) धामांत पाच धर्मशाळेसहित एकंदर १३ निर्माणकार्ये आहेत. यात मंदिर आणि कुंडही सामील आहेत. याचप्रमाणे द्वारका, रामेश्वर आणि जगन्नाथपुरी या तीर्थक्षेत्रात मंदिर आणि निराश्रितांसाठी आश्रमांची स्थापना केलेली

आहे. सप्तपुरीत नगरांत सर्वाधिक दानशीलतेची गंगा बनारस अयोध्या आणि उज्जयिनी येथे आहे. वाराणसी येथे काशी-विश्वनाथ मंदिराची पुनर्स्थापना, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र मणिकर्णिका घाट, सहा मंदिरे, दोन धर्मशाळा आणि खासगी निवासगृह श्रद्धाळु भाविक आणि तीर्थ यात्रेकरूंसाठी निर्मित केलेले आहेत. अयोध्येत श्री राम मंदिर आणि शरयु घाटांव्यतिरिक्त सात निर्माणकार्यांचा उल्लेख आहे. उज्जयिनीत लीला पुरुषोत्तम मंदिरासहित चार मंदिर आणि एक धर्मशाळा निर्मित आहे. मथुरेत चैनबिहारी मंदिर व कालिया घाट सहित चार अन्य निर्माणकार्याचा उल्लेख आहे. हरिद्वार येथेही घाट व धर्मशाळा आहेत.

ज्योतिर्लिंगात सोमनाथ (काठियावाड) येथे इ. स. १७८५ मध्ये प्रतिमेची पुनर्स्थापना, मल्लिकार्जुन (मद्रास प्रेसिडेन्सी) येथे मंदिर निर्माण, ओंकारेश्वर येथे चांदीची प्रतिमा आणि फुलबाग व नौका घाट, परळी वैजनाथ (निजाम स्टेट) येथे मंदिर पुनर्निर्माण या शिवाय अन्य ज्योतिर्लिंग क्षेत्रातही यात्रेकरूंच्या सुखसोयीसाठी आवश्यक सहयोगाचा उल्लेख आहे. सर्व ज्योतिर्लिंग आणि प्रमुख शिवमंदिरात महाशिवरात्रीच्या पवित्र दिनी कावड यात्रेद्वारा ठरावीक वेळी गंगाजल पोहोचविण्याची व्यवस्था केली आहे. अन्य ४३ स्थळी जेथे दानशीलतेचे प्रतीक निर्माणकार्ये आहेत. त्यात चित्रकूट, पुष्कर, वृंदावन, नाथद्वारा, कुरूक्षेत्र, वेरुळ, बऱ्हाणपुर, रावेर, मिरी (अहमदनगर) गोकर्ण तथा बीड (निजाम स्टेट) येथे ही आवश्यक दान दिलेले आहे. महेश्वरचे घाट, मंदिर आणि छत्र्या आजही अहिल्यादेवींची गौरवगाथा सांगत आहेत.

दानशीलतेच्या रूपाने केलेल्या या सांस्कृतिक उत्थानाचे वैशिष्ट्य हे आहे की, सुधारणेच्या कामांना स्थायित्व प्रदान करण्यासाठी, त्यांच्या देखरेख व कार्याला अबाधित रूपाने चालू ठेवण्यासाठी दूरगामी व स्थायी व्यवस्था केली आहे. येथे कार्यरत कर्मचारी, सेवक, पुजारी यासाठी भूमी दान देऊन त्यांची व्यवस्था केली आहे. यामुळे या वर्गाला सुख-सुविधा निरंतर मिळत आहेत.

इंदूरस्थित खासगी आणि आलमपूर ट्रस्टचे सचिव व सहसचिव यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजही ट्रस्टच्या माध्यमातून रामेश्वरम (तामिळनाडू), गोकर्ण (कर्नाटक), जेजुरी, पंढरपूर, चोंडी, चांदवड (महाराष्ट्र), वाराणसी, इलाहाबाद, हरिद्वार, संभल, नैमिषारण्य (उत्तरांचल, उत्तर प्रदेश) पुष्कर (राजस्थान), महेश्वर, ओंकारेश्वर, भानपुरा, आलमपूर, इंदूर (म.प्र.) येथे देखरेख व्यवस्था व स्थळाच्या गौरवाप्रमाणे तेथील कार्यासाठी आवश्यक मदत दिली जात आहे. श्रीमंत महाराणी उषादेवी या ट्रस्टच्या प्रमुख ट्रस्टी आणि सतीशचंद्र मल्होत्रा हे कार्यकारी ट्रस्टी आहेत.

सन १७९५ मध्ये लोकमाता अहिल्यादेवींनी इहलोक संपवून आपला देह ठेवला. पती खंडेरावांच्या मृत्युसमयी (इ.स. १७५४) त्या अवघ्या २९ वर्षांच्या होत्या. आपले श्वसुर आणि होळकर राज्य संस्थापक श्रीमंत मल्हारराव होळकर यांजकडून त्यांनी राजनैतिक आणि सैनिक शिक्षणाचे धडे घेतले. आपल्या कार्यांद्वारे अहिल्यादेवींनी याची सार्थकताही सिद्ध करून दाखवली. अहिल्यादेवींच्या दानशीलता आणि निर्माणकार्याच्या तेजोवलयाला या राजनैतिक व सैनिक उपलब्धी कदाचित आच्छादित करीतही असतील; परंतु कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या दानशीलता आणि लोककल्याणकारी कार्याचे महत्त्व जराही कमी होत नाही.

*मूळ हिंदीतून मराठी अनुवाद विठ्ठलराव गावडे.*

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून पुनर्मुद्रित)

# गौरव तेजस्वी स्त्रीशक्तीचा 'पुण्यश्लोक ३००' उपक्रम




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी कर्तबगार व दूरदृष्टी असणाऱ्या स्त्रीशक्तीचे प्रतीक आहेत. त्यांनी धार्मिक, सहिष्णुता, समाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायनिष्ठ प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली.

हे वर्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा पुन्हा नव्याने जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे; राज्यातील तसेच देश-विदेशातील समाजमनात त्यांच्या कार्याची स्मृती जिवंत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या आदर्शांचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

SCAN ME

अहिल्यादेवींविषयी जनसामान्यांमध्ये पुन्हा नव्याने जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने 'पुण्यश्लोक ३००' हे विशेष बोधचिन्ह शासनाने तयार केले आहे. हे चिन्ह शासनाच्या सर्व शासकीय पत्रव्यवहारात वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासाठी संबंधित क्युआर कोडदेखील तयार करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्थ क्षेत्रीय कार्यालयांना, महामंडळांना व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर या बोधचिन्हाचा योग्य उपयोग व्हावा, याबाबत योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. जेणेकरून या बोधचिन्हाचा प्रभावी वापर होईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त संपूर्ण राज्य आणि देश त्यांच्या कार्याचा गौरव करत आहे. ही केवळ एक औपचारिकता नसून आपल्या सांस्कृतिक जाणिवेला नवे बळ देणारी एक चळवळ आहे.

**महेश्वरहून पेशव्यांबरोबर राजनैतिक चर्चा करण्यासाठी वारंवार पुण्याला जावे लागे. महेश्वरहून पुण्याला जाण्याचा मार्ग चांदवडमार्गेच होता. चांदवडचे अप्रतिम सृष्टीसौंदर्य पाहून अहिल्याबाईंनी चांदवडला दक्षिणेकडचे मुख्यालय बनविले. पर्वतरांगांनी वेढलेल्या चांदवडला एक भक्कम किल्ला बनवला.**

# चांदवडचा रंगमहाल

**शरद बर्वे**

मुंबई-आग्रा राजमार्गावर इंदूरहून ३८४ किलोमीटर अंतरावर नाशिकच्या उत्तरेस ६० किलोमीटरवर 'चांदवड' ही ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वाची नगरी आहे. अहिल्याबाईंचा या गावाशी जवळचा संबंध आहे. महेश्वर ही अहिल्याबाईंची राजधानी होती. महेश्वरहून पेशव्यांबरोबर राजनैतिक चर्चा करण्यासाठी वारंवार पुण्याला जावे लागे. महेश्वरहून पुण्याला जाण्याचा मार्ग चांदवडमार्गेच होता. चांदवडचे अप्रतिम सृष्टीसौंदर्य पाहून अहिल्याबाईंनी चांदवडला दक्षिणेकडचे मुख्यालय बनविले. पर्वतरांगांनी वेढलेल्या चांदवडला एक भक्कम किल्ला बनवला. पाण्याच्या सोयीकरिता एक विशाल ऐतिहासिक विहीर बनविली. कित्येक दुष्काळात याच विहिरीतून चांदवड तालुक्यातील अनेक गावांना पिण्याचे पाणी पुरविले गेले. विहिरीला महिरपी आकाराच्या एकूण तीन कमानी आहेत. विहिरीच्या पायऱ्या संपताच एक चिरेबंदी हौद आहे. हौदाची खोली २० ते २१ फूट आहे. त्याखाली ६ ते ८ फूट एक कुंड आहे. त्यातील न संपणाऱ्या पाण्यामुळे नेमकेपणाने अंदाज सांगता येणे कठीण आहे.

चांदवडचे विश्रांतीगृह म्हणजेच चांदवडचा प्रसिद्ध रंगमहाल. त्यातील लाकडावरील कोरीव देखणे नक्षीकाम पाहिले की डोळ्यांची तृप्ती होते. हे नक्षीकाम आजही लाकडी शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. मुख्य महाद्वार उत्तरेकडे आहे. हा दरवाजा अत्यंत भरभक्कम आणि मजबूत आहे. पूर्वीच्या काळात हत्तीच्या साहाय्याने असे दरवाजे तोडले जात असत. याच कारणामुळे दरवाजाला १०-१५ फूट उंचीवर मजबूत लोखंडी सुळे बसविलेले आहेत. वाड्याच्या चौकात होळकर स्थापत्य शैलीचा हत्ती, दरवाजा, नगारखाना, सुरक्षा सैनिकांचे निवासस्थान, घोड्याचा तबेला, दरबार सभागृह, लक्ष्मीनारायण मंदिर महेश्वरसारखी गादीची बैठक इत्यादी विराजमान आहेत. अहिल्याबाईंच्या शासनकाळात बांधलेल्या दरबार सभागृहाच्या अर्ध्या भागात धार्मिक प्रसंगांची रंगीबेरंगी भित्तीचित्रे काढलेली आहेत. यात रामायण व महाभारतातील वेगवेगळे प्रसंग, कृष्णलीला, राग-रागिण्या इत्यादी विविध विषयांवरची चित्रे आहेत.

या अप्रतिम भित्तीचित्रांमुळेच या वाड्याला रंगमहाल असे नाव पडले.



(छायाचित्र : मनोज अहिरे)

रंगमहालाहून दोन किलोमीटर अंतरावर रेणुकादेवीचे मंदिर आहे. नवरात्रात रेणुकादेवीचे अलंकार आणि अहिल्याबाईंची प्रतिमा यांची भव्य भावपूर्ण शोभायात्रा आणि पालखी निघते.

रंगमहाल ही कलात्मक वास्तू असून अनेक कसबी कारागिरांनी साकार केलेले स्वप्न आहे. इ. स. १९८९ साली मुख्य चौकामध्ये देवी अहिल्याबाईंचा पुतळा बसविण्यात आला आहे. पर्वतांनी वेढलेले असल्यामुळे सुरक्षित चांदवडला चांदीच्या नाण्यांची टाकसाळ बनविली गेली होती. तिचे अवशेष आजही अस्तित्वात आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात घोडेस्वार वीर देश-धर्मांचे रक्षण करण्यासाठी चांदवड नगरीच्या परिसरात वेगाने दौडत असत. दाऊदखान पठाणाच्या बदल्याची कारवाई चांदवडने पाहिली आहे. अहिल्याबाईंच्या काळात चांदवडला अस्थायी दरबारही भरत असे. त्यावेळी न्यायदानाचे काम चाले. गावाच्या भोवतालची पर्वतांची सीमारेषा आणि बुलंद दरवाजे आजही विद्यमान आहेत. चांदवडचा चांदीचा रुपया, कुंकवाचा करंडा, काथ्या, मावा आजही सर्वत्र प्रसिद्ध आहे.

'रंगमहाल' या नावाबद्दल काही अभ्यासकांचा गैरसमज झालेला आहे. रंगमहालाचे व्यवस्थापन देवी अहिल्या ट्रस्ट, इंदूर यांच्यातर्फे ट्रस्टचे मॅनेजर बघतात. दरबार हॉलमधील रंगीत भित्तीचित्रांमुळेच या वास्तूचे 'रंगमहाल' हे नाव रूढ झाले आहे. इंदूरचे प्रसिद्ध विचारवंत आणि इतिहासतज्ज्ञ डॉ. गणेश मतकर यांनीही याबाबतीत संशोधन केले असून त्यांचेही मत याप्रमाणेच आहे. ऐतिहासिक वास्तूंची नावे, त्यांचे ऐतिहासिक संवर्धन या गोष्टी सुजाणपणे जपल्या गेल्या पाहिजेत. रंगमहालाकडे पाहिल्यानंतर मनात एकच भावना जागते ती शाश्वत पावित्र्याची!

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून पुनर्मुद्रित)

**भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली, परंतु या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला, त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केले की, एका स्त्रीचे नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरते मर्यादित न राहता ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकते.**

# आदर्श स्त्री नेतृत्वाला वंदन!

**वर्षा फडके-आंधळे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इंदूरच्या राणी नव्हत्या, तर त्या एक द्रष्ट्या प्रशासक, न्यायप्रिय नेत्या, धर्मपरायण समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. ३००व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे.

## प्रशासन आणि सामाजिक कार्य

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नेतृत्वात फक्त राज्यकारभारच नव्हता, तर त्यात धर्म, न्याय, लोकसेवा आणि नीतिमूल्यांचे सखोल अधिष्ठान होते. त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवले. ही राजधानी एक आदर्श प्रशासनाचे प्रमाण होते. येथे अहिल्यादेवींनी एक पारदर्शक, न्यायपूर्ण आणि लोकाभिमुख राज्यकारभार चालवला. तेव्हाच्या काळात एक राणी प्रत्यक्षपणे जनतेच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेते, अशी कल्पनाही करवत नाही; पण अहिल्यादेवी दररोज प्रजेसोबत संवाद साधत, त्यांच्या अडचणी समजून घेत आणि न्याय देत. हे त्यांचे कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन आणि समाजकल्याण यासाठी वाहिले. काशी विश्वनाथ, गंगाघाट, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका अशा अनेक प्राचीन आणि पवित्र स्थळांचा जीर्णोद्धार करून त्यांनी भारतीय सांस्कृतिक एकात्मतेचे धागे मजबूत केले. याशिवाय देशभर त्यांनी शेकडो धर्मशाळा, घाट, कुंड, विहिरी, अन्नछत्रे आणि विश्रामगृहे उभारली. हे कार्य कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वसामान्य जनतेसाठी केले. त्यांच्या या पुढाकारामुळे हजारो लोकांना निवारा, अन्न आणि आधार मिळाला. त्यांचे हे सामाजिक कार्य आजही संपूर्ण भारतात लोककल्याणकारी राज्यशासनाचा आदर्श नमुना मानले जाते. प्रशासन आणि समाजकारण यांचा असा सुरेख मिलाफ क्वचितच इतिहासात पाहायला मिळतो आणि त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर!




## स्त्री सक्षमीकरणाचे आदर्श!

भारतात १८व्या शतकातील स्त्रियांना घराच्या चार भिंतींपलीकडे जाण्याची मुभा नव्हती; पण अशा काळातही अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रियांनी आत्मनिर्भर बनण्यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात त्यांनी सुरू केलेला महेश्वरी साडी उद्योग केवळ व्यवसाय नव्हता, तर तो एक सामाजिक क्रांतीचा भाग होता. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी काशी आणि इतर ठिकाणांहून कुशल विणकरांना महेश्वरला बोलावून स्थानिक महिलांना हातमाग प्रशिक्षण दिले आणि महिलांना घरोघरी बसून उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण केली. या उद्योगाने हजारो महिलांना केवळ रोजगारच दिला नाही, तर स्वाभिमान, ओळख आणि आत्मसन्मानही दिला. आजही महेश्वर व आसपासच्या भागात महेश्वरी साड्या विणणाऱ्या हजारो महिला आपल्याला पाहायला मिळतात. या साड्या केवळ पारंपरिक पोशाख नाहीत, तर त्या अहिल्यादेवींच्या द्रष्ट्या धोरणांचा आणि स्त्रीसन्मानाच्या तत्त्वांचा वस्त्ररूप अविष्कार आहेत. त्यांनी कोणत्याही जाती, धर्म, वर्ग यांचा भेद न करता सर्वांसाठी कार्य केले. १३ ऑगस्ट १७९५ रोजी या महान राणीने देहत्याग केला. धर्मशाळा, भजनमंडळे, सार्वजनिक पाणवठे आणि शिक्षणाच्या सुविधा त्यांनी महिलांसाठी खुल्या केल्या. त्या काळात जेव्हा स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, तेव्हा त्यांनी महिलांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची मुभा दिली. अहिल्यादेवींच्या या कार्यामुळेच त्यांना 'पुण्यश्लोक', 'लोकमाता' आणि 'राजमाता' अशा सन्मानार्थ उपाधी प्राप्त झाल्या. भारत सरकारने त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे. इ.स. १७६७ साली त्यांनी महेश्वर येथे हातमाग उद्योग सुरू करून एक स्थायिक, गुणवत्ताधिष्ठित आणि बाजारपेठेचा विचार करणारा स्थानिक उद्योग उभारला. यामागील हेतू होता की, स्त्रियांना उपजीविकेचा मार्ग उपलब्ध करून देणे आणि महेश्वरला धार्मिक व पारंपरिक वस्त्रकलेचे केंद्र बनवणे. महेश्वरी साडी आणि अहिल्यादेवी यांचे नाते केवळ वस्त्रनिर्मितीपुरते मर्यादित नाही, तर ते महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक उद्योगाचा उत्कर्ष यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

अहिल्यादेवींच्या कार्यातून मिळणारा मूलभूत धडा म्हणजे - कोणताही व्यवसाय फक्त नफ्यासाठी नसून, समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे साधन असावे. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या स्टार्टअप महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शक ठरते.

उपसंचालक (वृत्त)

**अहिल्याबाई या हिंदू संस्कृतीच्या जिवंत प्रतीक होत्या. अहिल्याबाईंची प्रवृत्ती धार्मिक वा त्याहूनही अधिक आध्यात्मिक होती. लोकांच्या कल्याणाकरिता सतत कामे करणे हेच त्यांच्या आयुष्याचे एकमेव ध्येय होते. अहिल्याबाई हे भारतीय आदर्श भारतीय स्त्रीचे प्रातिनिधिक उदाहरण आहे.**

# अहिल्यादेवींचे वेगळेपण!

**हीरालाल शर्मा**

अहिल्याबाईंची बुद्धिमत्ता असामान्य होती. त्यांचा जन्म एका सामान्य मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला; पण आपल्या अंगी असलेल्या असामान्य गुणांमुळे त्यांनी एका राज्याचे राणीपद अतिशय समर्थपणे सांभाळले. आपल्या लोकाभिमुख कामांच्या माध्यमातून त्यांनी सर्वत्र कीर्ती मिळविली. लोकांच्या हृदयात देवी, सती अशा स्वरूपात त्या विराजमान झाल्या. अहिल्याबाईंची सात्त्विकता, नीतिमत्ता, कामावरची निष्ठा आणि समर्पणभाव हे सारे काही अद्वितीय होते.

इतके सर्व गुण एका व्यक्तीच्या ठायी आढळणे ही बाब दुर्मिळ असते. अनेकदा धर्म, तत्त्वज्ञान याबाबतीत श्रेष्ठ असणाऱ्या व्यक्ती प्रशासन आणि मानवता याबाबतीत शुष्क असतात. या उलट प्रशासनात निपुण असलेल्या व्यक्ती धर्म, तत्त्वज्ञान याबाबतीत अनभिज्ञ असतात; तसेच उदात्तता आणि विनय, अधिकार आणि चारित्र्य हे अगदी क्वचित एकत्र आढळतात. मात्र हे सर्व गुण अहिल्याबाईंच्या अंगी एकसवे सामावले होते. अहिल्याबाई हिंदू संस्कृतीचे जिवंत प्रतीक होत्या. अहिल्याबाईंची प्रवृत्ती धार्मिक वा त्याहूनही अधिक आध्यात्मिक होती. लोकांच्या कल्याणाकरिता सतत कामे करणे हेच त्यांच्या आयुष्याचे एकमेव ध्येय होते. अहिल्याबाई हे भारतीय आदर्श भारतीय स्त्रीचे प्रातिनिधिक उदाहरण आहे.

अहिल्याबाईंच्या आयुष्यात जेवढे संघर्ष आणि दुःखं आली, तेवढी इतरांच्या वाट्याला क्वचितच आली असतील. मात्र या सर्व बाबी त्यांना कर्तव्यांच्या मार्गापासून परावृत्त करू शकल्या नाहीत. प्रत्येक संकटाचा सामना त्यांनी धैर्याने खंबीरपणे आणि पूर्ण ताकदीने केला. संकटांच्या मालिकांमुळे त्यांचे मनोबल कमी झाले नाही. त्या कुठल्याही आपत्तीपुढे झुकल्या नाहीत. त्यांनी प्रत्येक संकटाचा प्रसंगी अटीतटीने प्रतिकार केला आणि शेवटी संकटांवर मात केली. काळोखाबाबत तक्रार करण्यापेक्षा त्यांनी आपल्या सात्त्विकतेच्या तेजस्वी तेजाने काळोखाला छेद दिला. त्यांनी आपल्या असामान्य मनोबलाने दुःखालाही आव्हान दिले आणि आपल्या कर्तव्यातच समाधानाचे क्षण शोधले.

नियतीने त्यांच्या वाटेवर अंथरलेले सारे अडथळे त्यांनी ओलांडले आणि त्यातूनच आपल्या कर्तव्याचा मार्ग शोधला. ईश्वरी शक्तीच्या ठायी असलेल्या अतूट श्रद्धेमुळेच अतिशय अडचणीच्या प्रसंगी त्या अविचल राहिल्या. विपरित परिस्थितीतही बुद्धिकौशल्य आणि मुत्सद्दीपणा यांच्या बळावर त्यांनी संकटांतून मार्ग काढला. या संकटांनी त्यांना अधिक मजबूत, आत्मविश्वासयुक्त आणि उदात्त बनविले. प्रत्येक संकटागणिक त्या अधिकाधिक दृढ आणि महान बनत गेल्या. एक स्त्री असूनही मोठमोठ्या संकटांशी मुकाबला करताना त्या जराही डगमगल्या नाहीत. त्यांची लढाई एकट्याची होती. ती लढाई त्या एकट्याच्या बळावर लढल्या आणि जिंकल्याही. त्यांचा हा जीवनसंघर्ष अवघ्या मानवजातीला प्रेरणा देणारा स्रोत आहे.



तत्कालीन परंपरेत स्त्रीचे सामाजिक स्थान अतिशय दुय्यम दर्जाचे होते. तिचे स्थान घरापुरतेच मर्यादित होते. चूल आणि मूल हेच तिचे काम होते. तिचे विचार आणि कर्तृत्व यांना कुठेच वाव मिळत नसे. एकूण तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान अतिशय दयनीय होते. तिला शिक्षणाचाही हक्क नव्हता आणि आपल्या प्रगतीचाही. असुरक्षितता, दीनवाणेपणा आणि सामाजिक दुय्यम स्थान हीच तिची ओळख होती. पतीच्या निधनानंतर सतीच्या नावाखाली स्वतःला जाळून घेणे हे तिच्या आयुष्याचे फलित होते. पतिव्रतेच्या नावाखाली जिवंतपणी जळण्याची ही शिक्षा होती.

अहिल्याबाईंना नियतीने या सतीच्या अतिदाहापासून वाचविले. आपल्या गुणग्राहकता आणि कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी लोकांच्या आयुष्यात स्वर्ग निर्माण केला. आपले राज्य समर्थपणे, सक्षमपणे सांभाळून त्यांनी लोकांना सुख, समाधान आणि आनंद यांची अनुभूती दिली. अहिल्याबाई राणी होत्या; पण त्यांच्या उदार वृत्तीमुळे आणि विशाल हृदयामुळे त्या लोकांना आईसमान वाटत. लोक त्यांना मातोश्री, देवी या नावाने संबोधित. अहिल्याबाई खरोखरच लोकांच्या 'लोकमाता' होत्या.

अहिल्याबाईंचे शिक्षण फार झालेले नव्हते; पण त्यांच्या अंगी असलेली तीक्ष्ण बुद्धिमत्ता, व्यापक सहानुभूती, शुद्ध चारित्र्य आणि दृढ श्रद्धा या विशेषांमुळे त्यांनी

राज्यकारभार, प्रशासन आणि लोककल्याण या बाबतीत अभूतपूर्व यश मिळविले.

या पृथ्वीतलावर लाखो लोक जन्माला येतात; पण माणूस म्हणावे अशा योग्यतेचे फार थोडे असतात. समुद्रातील शिंपल्यात पाण्याचे हजारो थेंब पडतात; पण त्यातील काही ठरावीकच मोती बनतात. हे मोती दुर्मिळ असतात. अहिल्याबाई अशाच होत्या. दुर्मिळ आणि अनमोल. मोत्यासारख्या!



अहिल्याबाईंनी ग्रंथ लिहिले नाहीत; पण त्यांचे आयुष्य हाच एक ग्रंथ होता. या ग्रंथाच्या पानापानावर शांती आणि समाधान यांचा संदेश होता तो सतत प्रेरणा देणारा!

भारताचा कुठलाही कानाकोपरा पाहा, तिथे अहिल्याबाईंचे नाव आदर्शपूर्वक घेतले जाते. भारतीय जीवनशैलीला त्यांनी अतिशय उदात्त दिशा दिली. त्यांनी कन्या, पत्नी, माता आणि राणी या भूमिकांचे अतिशय उत्तुंग आदर्श लोकांसमोर प्रस्थापित केले.

अहिल्याबाईंनी अनेक जणांचे आयुष्य बदलून टाकले. त्यांच्या प्रेरणेने अनेक जणांनी चोरी, दरोडेखोरी, लूटमार अशी समाजविघातक कामे सोडून दिली. 'यथा राजा तथा प्रजा' असे एक वचन आहे. अहिल्याबाईंची प्रजा त्यांच्याप्रमाणेच धर्मशील बनली होती.

एक गोष्ट मुद्दाम नोंदविण्याजोगी आहे. त्या काळात भारताच्या अनेक विभागात दुष्काळ पडले होते; पण अहिल्याबाईंच्या राज्यात ३० वर्षांच्या कारकिर्दीत कुठेही दुष्काळ पडल्याचा उल्लेख नाही. त्यांच्या राज्यात कुठलीही नैसर्गिक आपत्ती आली नाही. जणू त्यांच्या उदात्त जीवनसरणीने आपत्तीही त्यांच्याकडे आल्याच नाहीत.

त्यांच्या उदात्त आणि परोपकारी जीवनपद्धतीने अनेक राजे आणि राण्या यांच्या विचारांवर खोलवर परिणाम झाला आणि त्यांनी अहिल्याबाईंचे अनुकरण करत अनेक लोककल्याणार्थ कामे केली. याद्वारे त्यांनी जणु आपल्या संपत्तीला आणि आयुष्याला योग्य ते वळण दिले.

राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाईंचे इतिहासातील स्थान अद्वितीय आहे. आपल्या लोकांना त्यांनी सर्वार्थाने सुखी केले. त्यांनी खऱ्या अर्थाने रामराज्य आणले. त्या काळचा विचार केला, तर त्यांनी निर्माण केलेले प्रशासन अतुलनीय होते. कुठल्याही अंगाने पाहिले तरी ते आदर्श होते. त्यांनी आपली धार्मिक, सामाजिक आणि प्रशासकीय कर्तव्ये एकाच प्रकारे आणि समर्थपणे पार पाडली. त्यात कुठेही अव्यवस्थितपणा वा ढिलाई नव्हती. स्त्रियाही पुरुषांइतक्याच राज्यकारभार करण्यास समर्थ आहेत हे त्यांनी आपल्या कृतीने सिद्ध केले.

एका प्रगतीशील, संपन्न राज्याच्या राणीने आपले सर्वस्व श्री शंकराच्या चरणी वाहिले, हे सारे केवळ मानवतेच्या कल्याणासाठी. जे आपल्या मालकीचे नाही वा इतरांचे आहे, त्याबद्दल त्यांनी कधीही अभिलाषा बाळगली नाही. इतरांचे काही ओरबाडून घेणे त्यांना विषासमान वाटे.

अहिल्याबाईंनी भारतभूमीतील मंदिरे आणि तीर्थस्थाने याबाबत अविस्मरणीय कार्य केले. त्यांनी मंदिरांचे जीर्णोद्धार केले, घाट बांधले. एकप्रकारे त्यांनी या भूमीचे धार्मिक आणि राष्ट्रीय आयुष्य पुन्हा नव्याने घडविले. शत्रूंनी उद्ध्वस्त केलेल्या मंदिरांचे त्यांनी जीर्णोद्धार केले. याद्वारे त्यांनी लोकांच्या श्रद्धेला गेलेले तडे पुन्हा एकदा सांधून घेतले. देशाच्या कला, उद्योग, साहित्य, संस्कृती या सर्वांना त्यांनी सर्वपरींनी बळ दिले. भारताच्या राष्ट्रबांधणीत ज्यांनी-ज्यांनी योगदान दिले, त्यात अहिल्याबाईंचे स्थान अतिशय वरच्या स्थानी आहे. एका गोष्टीचा खास उल्लेख करणे आवश्यक आहे, तो म्हणजे अहिल्याबाईंचा वैशिष्ट्यपूर्ण पत्रव्यवहार. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाचा परिणाम भारतभर दिसू लागला होता. इंग्रजांच्या वाढत्या वर्चस्वाबाबत पेशव्यांना त्यांनी वारंवार धोक्याचा इशारा दिला होता. सर्व देशभर आपल्या सत्तेचे जाळे पसरावे, असे इंग्रजी सत्तेचे धोरण होते. त्याकरिता त्यांनी सर्वत्र कवायती फौज निर्माण केली होती. भोसले, नवाब आणि इतर मराठा सरदार यांनी एकत्र येऊन इंग्रज सत्तेला आव्हान देऊ नये, अशी रणनीती त्यांनी आखली होती.

भारतीय इतिहासात अहिल्याबाईंचे नाव सुवर्णमय अक्षरांनी लिहिले गेले आहे. अवघ्या भारत राष्ट्राने त्यांना 'देवी' या पदवीने गौरविले आहे. गया येथे विष्णु मंदिरात आणि महेश्वर येथील मंदिरात त्यांच्या मूर्तीची वा प्रतिमेची पूजा होणे हा लोकांनी त्यांना दिलेला सर्वात मोठा आदरसन्मान आहे.

*इंग्रजीतून मराठी अनुवाद : डॉ. निरंजन होळकर*

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून पुनर्मुद्रित)

स्त्रियांसाठी स्त्री मुक्ती संघटना, स्त्री हक्कांची जाणीव, दक्षता समिती, आरक्षणाची योजना, सैन्यात प्रवेश, स्त्रियांच्या परिषदा यांसारख्या अनेक योजना शासनाकडून आज कार्यान्वित होत आहेत; परंतु या सर्व गोष्टींचा अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दीत २५० वर्षांपूर्वीच पुरस्कार केला.

# द्रष्ट्या लोककल्याणकारी!

डॉ. सुलोचना पाटील

महाराष्ट्राच्या सध्याच्या अहिल्यानगर तर तत्कालीन नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी गावी ३१ मे १७२५ सोमवारी अहिल्याबाईंचा जन्म झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे चौंडी गावचे वतनदार पाटील होते. त्यांचा विवाह १७३३ मध्ये पेशव्यांचे मातब्बर सरदार सुभेदार मल्हारराव होळकरांचे चिरंजीव खंडेरावांशी झाला. कुंभेरीच्या लढ्यात १७५४ मध्ये खंडेरावाचा मृत्यू झाला. अहिल्याबाईंच्या दुःखी जीवनाला प्रारंभ झाला. १७६६ मध्ये मल्हाररावांचा मृत्यू झाला. अहिल्याबाईंच्या आधाराचे एकमेव छत्र उडून गेले आणि येथूनच त्यांच्या जीवनाची खरी कसोटी सुरू झाली. अहिल्याबाईंना आपल्या जीवनात अनेक संकटांना व आप्तस्वकीयांच्या मृत्यूला सामोरे जावे लागले. जीवनाची क्षणभंगुरता त्यांनी उघड्या डोळ्यांनी अनुभवली, दुःखांनी त्यांचे मन विव्हळ झाले होते. तरी त्या धीराने राज्यकारभार पाहत होत्या. आपले संस्थान हेच आपले घर आणि आपली प्रजा हीच आपली लेकरे हे ध्येय ठरवून अहिल्याबाईंनी आपल्या लोककल्याणकारी राज्याची उभारणी केली. आपल्या राज्यात विविध योजना राबवून अद्‌भूतपूर्व कामगिरीचा पाया पुढील राज्यकर्त्यांसाठी घालून दिला.

### शैक्षणिक दृष्टिकोन

शिक्षणाच्या बाबतीत अहिल्याबाई अतिशय जागरूक होत्या. त्या स्वतः साक्षर होत्या. त्यांचे मोडी लिपीतील सुंदर हस्ताक्षर आजही उपलब्ध आहे. त्यांच्याजवळ फार मोठा ग्रंथसंग्रह होता. काही ग्रंथांचे त्या नित्यनेमाने श्रवण करीत. अनेक विद्वानांना, पंडितांना, ज्योतिषांना त्यांनी आश्रय दिला होता. त्या काळात मुद्रणकला अस्तित्वात नसल्यामुळे ग्रंथ हस्तलिखित स्वरूपात असायचे. अहिल्याबाईंनी आपल्या आश्रयाला असलेल्या विद्वानांकडून अनेक हस्तलिखित ग्रंथ तयार करवून त्यांचे दान केले होते. ग्रंथ दान करणे हे धर्मकृत्य मानले जाई. धार्मिक ग्रंथांच्या दानाचे महत्त्व रामायण- महाभारतात सांगितले आहे. त्याप्रमाणे आपल्या प्रजेतील लोकांना ज्ञानामृत देण्याची त्यांची भावना होती. अहिल्याबाईंनी पंडित खुशालीराम भट्ट यांच्याकडून 'अहिल्याकामधेनू' नावाचा ग्रंथ लिहून घेतला. हा ग्रंथ म्हणजे कला, विद्या इत्यादींचा कोश होता. ज्ञान प्रसाराचे कार्य या ग्रंथाने तर केलेच; परंतु पूर्वापार चालत आलेल्या पद्धती जिवंत ठेवण्यात मोठ्या प्रमाणावर मदत केली.

अहिल्याबाईंनी महेश्वर आणि तीर्थक्षेत्री अन्य प्रांतीय शास्त्री, पंडित, वैद्य, ज्योतिषी आणून वसाहतीची योजना केली ती म्हणजे ज्ञान संरक्षण व ज्ञान संवर्धनाचीच अभूतपूर्व अशी योजना म्हणावी लागेल. काशी येथे अहिल्याबाईंनी ब्रम्हपुरी वसवली होती. ही पुरी म्हणजे एक प्रकारचे विश्वविद्यालयच होते. या विश्वविद्यालयातून रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखे जगद्‌विख्यात न्यायाधीश निर्माण झाले. ज्या काळात शिक्षणाच्या बाबतीत समाज अंधारात चाचपडत होता त्याच काळात अहिल्याबाईंनी विद्वानांकडून ग्रंथ निर्मिती केली. कारण ग्रंथ हे निद्रिस्तांना जागृत करण्याचे महान असे कार्य करतात. अहिल्याबाईंनी महेश्वर येथे वेदाभ्यासाच्या व संस्कृतच्या पाठशाळा काढल्या, पुराणांचे वाचन, कीर्तन प्रवचन व भागवत सप्ताह, अनेक देवीदेवतांचे उत्सव यांसारख्या माध्यमातून समाज जागृती करून सामाजिक प्रबोधन घडवून आणले. ही एक प्रकारे वैचारिक क्रांतीच म्हणावी लागेल.



### अभयारण्यांची योजना

सर्व प्राणीमात्रांविषयी भूतदया : जे *का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।* या संत तुकारामांच्या अभंगात वर्णन केल्याप्रमाणे अहिल्याबाई होळकर यांचे आचरण होते. त्यांच्या एकंदर सर्व दानधर्मात भावभूतीचा अंकुर होता. त्यांची भूतदया विलक्षण होती. दररोज गोरगरिबांना अन्न, सणावाराच्या दिवशी कनिष्ठ लोकांनाही मेजवानीचे जेवण अहिल्याबाईंकडून दिले जात होते.

उन्हाळ्याच्या दिवसांत रस्तोरस्ती वाटसरूंना पाणी देण्यासाठी अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात पाणपोयांची निर्मिती केली. महेश्वर येथे शेतात काम करणाऱ्या बैलांना पाणी पाजण्यासाठी नोकर धावून जात. बैलांना पाणी पाजल्यामुळे विश्रांती मिळायची. तसेच उन्हामुळे लागलेली तहान शमून ते अधिक जोमाने कामाला लागायचे. यामुळे कृषी उत्पादनांत अधिक भर पडायची. हिवाळ्याच्या दिवसात आश्रितांना आणि अपंग लोकांना वस्त्रे व घोंगड्या वाटण्याचा कार्यक्रम होत असे. हा कार्यक्रम महेश्वर, उज्जयिनी, ओंकारेश्वर या तीर्थक्षेत्री होई. अभयारण्यांची योजना शासनाने अलीकडच्या काळात आरंभिली आहे.



अहिल्याबाईंनी अभयारण्याचा पाया मात्र २५० वर्षांपूर्वी घातला. अहिल्याबाई आपल्या कारकिर्दीत धान्यांची अनेक कोठारे व उभी पिके शेतकऱ्याला धन द्रव्य देऊन विकत घेत असत. ही शेते त्या पशुपक्ष्यांना चरण्यासाठी मोकळी सोडून देत असत. मुंग्यांसाठी जागोजागी साखर, माशांसाठी कणकेचे गोळे, नर्मदा, क्षिप्रेच्या पात्रात टाकण्यात येत असत. आपल्या राज्यातील मुंग्या, पशुपक्षीसुद्धा उपाशी राहू नयेत, इतकी काळजी घेणाऱ्या अहिल्याबाई होळकर या एकमेव राज्यकर्ती होत्या. गाईसाठी त्या स्वतंत्र कुरण सोडीत. अरण्यात चरणाऱ्या पशुपक्ष्यांसाठी त्यांनी पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून तलावांची निर्मिती केली. या तलावांचे वैशिष्ट्य म्हणजे हे तलाव आजही सुस्थितीत आहेत. पशुपक्ष्यांच्या संरक्षणासाठी त्यांनी स्वतंत्र खाते काढून नोकरवर्ग निर्माण केला. आजच्या शासनाची पांजरपोळ या संकल्पनेची बीजं या अहिल्याबाईंनी निर्मिलेल्या कार्यामागे आहेत.

'महेश्वर दरबाराची बातमीपत्रे' यात नोंद सापडते. प्रत्येक शेतकऱ्याने २० झाडे लावलीच पाहिजे. यात लिंबू, औदुंबर, वड, पिंपळ, चिंच इत्यादीचा समावेश असायचा. त्यामुळे जमिनीत पाण्याचा साठा व्हावा, ही भूमिका होती. या व्यतिरिक्त रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली जायची. शेतकऱ्याने लावलेल्या २० झाडांपैकी ११ झाडे सरकारची तर ९ झाडे शेतकऱ्याची असायची. दोघांनी त्या झाडांपासून आवश्यक ते लाकूड वापरावे असा निर्बंध होता. ओसाड, डोंगराळ जमिनीवर भिल्ल, रामोशी, गोंडा यांच्याद्वारे झाडे लावल्याने त्यांना रोजगार मिळत असे. झाडे तोडणे म्हणजे ईश्वरी अपराध करण्यासारखे आहे, ही भावना रयतेच्या मनात निर्माण झाली होती. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणासारख्या संस्था निर्माण होत आहे, त्याची जाणीव अहिल्याबाईंना २५० वर्षांपूर्वी झाली होती.

## स्त्री हक्कांचा पुरस्कार

स्त्रियांसाठी स्त्री मुक्ती संघटना, स्त्री हक्कांची जाणीव, दक्षता समिति, आरक्षणाची योजना, सैन्यात प्रवेश, स्त्रियांच्या परिषदा यांसारख्या अनेक योजना शासनाकडून कार्यान्वित होत आहेत; परंतु या सर्व गोष्टींचा अहिल्याबाईंनी आपल्या कारकिर्दीत २५० वर्षांपूर्वीच पुरस्कार केला. त्यावेळच्या पद्धतीनुसार एखादी निपुत्रिक व्यक्ती मरण पावली, तर त्यांची संपूर्ण संपत्ती सरकार जमा व्हायची. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यातील अनेक विधवांना न्याय मिळवून त्यांचा पतीच्या संपत्तीवर हक्क प्राप्त करून दिला. राज्यातील एखादा निपुत्रिक सरदार मरण पावला, तर त्याचे संस्थान पुढे पूर्ववत चालण्यासाठी त्याच्या कुटुंबाला दत्तकाचा हक्क मान्य केला. विधवा स्त्रियांना उपजीविकेसाठी साधन उपलब्ध करून दिले. सैन्यात त्यांनी एक स्वतंत्र स्त्रियांची पलटण निर्माण केली होती. वेळप्रसंगी स्वतः त्या पलटणीचे नेतृत्व करायच्या. या सर्व गोष्टीत स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची त्यांची योजना होती.

समाजसेवा, पतितोद्धार, गोरगरिबांना मदत, प्रवासाच्या सोयी, राष्ट्रप्रेम, संस्कृतीचे जतन, उपजीविकेची साधने निर्माण करणे, स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करणे इत्यादी कार्य आधुनिक काळात शासन किंवा स्वयंसेवी संस्था करतात. तीच कार्ये मध्ययुगीन कालखंडापर्यंत धर्म या एकाच संकल्पनेत अंतर्भूत होती. आज ज्यांना आपण समाजकार्य म्हणतो तीच पूर्वी इष्टापूर्ती या धर्मकृत्यामार्फत केली जात होती. अहिल्याबाई होळकरांनी याच भावनेने संपूर्ण भारतात ही कामे केलेली दिसून येतात. हिमालयापासून रामेश्वरपर्यंतच्या भिन्न भाषा, जाती, वंश, परंपरा, रुढी असलेल्या समाजाला सांस्कृतिक साखळीने जोडण्याचा प्रयत्न केला, त्यांच्या या कार्यामुळेच प्रजेच्या मनात धर्मजागृती होऊन राष्ट्रप्रेम निर्माण झाले.

## आदर्श शासक

महेश्वरला त्यांनी वस्त्रोद्योग काढला. त्याकाळी वस्त्रोद्योगामुळे महेश्वराचे नाव अखिल हिंदुस्थानात प्रसिद्धीला पावले. या वस्त्रोद्योगात बहुधा सर्वच स्त्रियांना रोजगार मिळत होता. त्यांच्या कलाकौशल्याला वाव मिळायचा. आज त्या वस्त्रोद्योगाचे पुनरुज्जीवन त्यांच्या वंशातील शिवाजीराव होळकर यांनी रेवा सोसायटीच्या माध्यमातून केले आहे. आजही महेश्वराची साडी साऱ्या भारतात प्रसिद्ध आहे. प्रजेच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना त्यांनी राबवल्या म्हणून अहिल्यादेवी लोकमाता ठरल्या. सातत्याने प्रजेचा विकास व सुख त्यांनी सदोदित पाहिले. म्हणूनच अहिल्यादेवी आजच्या राज्यकर्त्यांपुढे 'आदर्श शासक' या संकल्पनेच्या मूर्तिमंत उदाहरण आहेत.

(सौजन्य : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या 'अहिल्याबाई होळकर : गौरवगाथा लोकमातेची' या पुस्तकातून पुनर्मुद्रित)

**राज्यातील स्टार्टअप परिसंस्था आणि महिला उद्योजकतेच्या वाढत्या प्रभावामुळे महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक स्टार्टअप्स असलेले राज्य ठरले असून, राज्यात सुमारे २८ हजार स्टार्टअप्स कार्यरत आहेत. विशेष म्हणजे यामध्ये १४ हजार महिला नेतृत्वातील स्टार्टअप्स असून, महिला स्टार्टअप्सची देशातील सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात आहे. ही आकडेवारी राज्यात महिला उद्योजकतेचा वाढता प्रभाव स्पष्टपणे दर्शवते. ही स्थिती महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे.**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना

**संध्या गरवारे**

राज्य शासनाचे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत राज्य सरकारच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीच्या माध्यमातून 'महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा', 'स्टूडंट इनोव्हेशन चॅलेंज', 'स्टार्टअप सप्ताह' असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहे. त्याच्या अंमलबजावणीतून राज्यातील स्टार्टअप परिसंस्थेला बळकटी दिली जात आहे. विशेषतः तरुण विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण कल्पना व्यवसायाच्या रूपात साकारण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळत आहे.

महिला स्टार्टअप्ससाठी खास योजना या पार्श्वभूमीवर महिला नेतृत्वातील स्टार्टअप्सला चालना देण्यासाठी *'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'* सुरू केली आहे. ही योजना केवळ आर्थिक साहाय्य पुरवणारी नसून, ती महिलांमध्ये नेतृत्वगुण, व्यावसायिक कौशल्ये आणि नवकल्पनांची उभारणी करणारी आहे. महिलांच्या व्यावसायिक वाटचालीसाठी ही योजना एक आधारस्तंभ ठरत आहे. रोजगार निर्मिती, नावीन्यपूर्णतेला चालना आणि महिला स्वावलंबन ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर विविध कार्यशाळा, सेमिनार्स आणि मार्गदर्शन शिबिरे घेतली जात आहेत.

या योजनेंतर्गत १५ एप्रिल २०२५ पर्यंत ५२ महिलांना एकूण २ कोटी ३४ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्यात आले आहे. योजना सुरू झाल्यानंतर अल्पावधीत मिळालेल्या प्रतिसादामुळे महिलांमध्ये उद्योजकतेविषयी आत्मविश्वास निर्माण झाला असून हे केवळ आकड्यांपुरते मर्यादित नाही, तर यातून प्रत्यक्ष उद्योग निर्मिती आणि स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती घडून येत आहे. हे एक सकारात्मक चक्र आहे. एक यशस्वी महिला उद्योजक अनेक महिलांना प्रेरणा देऊन त्यांना वाटचाल करण्यासाठी प्रवृत्त करते.

## उद्देश आणि दृष्टिकोन

महिलांना केवळ उद्योजक बनवण्यापर्यंत ही योजना मर्यादित नसून महिलांमध्ये 'जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ तयार करणे' आणि 'नोकरी मागणाऱ्यांऐवजी नोकऱ्या देणारे नागरिक घडवणे' हे केंद्र व राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. यात महिलांचे योगदान निर्णायक ठरणार आहे. महिलांना केवळ उद्योगात संधी देणे नाही, तर त्या संधी योग्य प्रकारे वापरून समाजात बदल घडवण्यासाठी सक्षम करणे हाही या योजनेचा गाभा आहे.

## महिला स्टार्टअप्सचे योजनेतील निकष

- उद्योग व अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग मान्यताप्राप्त स्टार्टअप असणे आवश्यक आहे.
- किमान ५१ टक्के महिला भागीदारी असलेले स्टार्टअप्स यासाठी पात्र असतील.
- कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयात १ एप्रिल २०२४ पूर्वी नोंदणी झालेली असावी.
- वार्षिक उलाढाल १० लाख ते १ कोटी दरम्यान असावी.
- नावीन्यपूर्ण, प्रभावी व रोजगार निर्मिती करणाऱ्या स्टार्टअप्सना प्राधान्य दिले जाते.
- या योजनेत लाभ घेणाऱ्या स्टार्टअप्सनी राज्य शासनाच्या अन्य योजनांमधून अनुदान घेतलेले नसावे.

## स्वरूप आणि साहाय्य

या योजनेसाठी एकूण १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून सुमारे ५०० महिला स्टार्टअप्सना प्रत्येकी १ लाख ते २५ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. इच्छुक स्टार्टअप्ससाठी अर्जाची माहिती www.msins.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. महिला उद्योजकांना केवळ निधीच नव्हे, तर व्यवसाय वाढवण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळणार आहे. तसेच नावीन्यता सोसायटीअंतर्गत इन्क्युबेटर्सची स्थापना, ग्रँड चॅलेंज, हॅकॅथॅान, गुणवत्ता परीक्षण आणि प्रमाणन अर्थसाहाय्य योजना, बौद्धिक संपदा हक्क अर्थसाहाय्य योजना, महाराष्ट्र व्हर्च्युअल इनक्युबेशन सेंटर यांसारख्या अनेक कार्यक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.

## महिला सक्षमीकरण व सामाजिक बदल

या योजनेमुळे महाराष्ट्रात महिला उद्योजकतेला नवीन दिशा मिळत आहे. महिला स्टार्टअप्समधून केवळ रोजगार निर्मिती होत नसून, महिलांचे नेतृत्व कौशल्य, नवकल्पना आणि आर्थिक स्वातंत्र्यही बळकट होत आहे. महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीत महिलांचे योगदान अधिक ठळकपणे जाणवत असून, ही योजना त्याला अधिक वेग देणार आहे. अनेक महिला ग्रामीण भागातूनही पुढे येत असून, त्या आपले व्यवसाय स्थानिक गरजांनुसार साकार करत आहेत, हे वास्तव या योजनेच्या यशाचे द्योतक आहे.

भारत पुढील काळात जगातील सर्वात मोठी तिसरी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा काळात महिलांचा स्टार्टअप्समधील सहभाग आणि आर्थिक विकास हे भारताच्या विकासात निर्णायक ठरणार आहेत. महिलांच्या विकासासाठी ही योजना महाराष्ट्रापुरती मर्यादित न राहता, देशाच्या आर्थिक यशस्वीतेची प्रेरणादायी कहाणी ठरणार आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या नेतृत्वात प्रभावी राज्यकारभार, जलसिंचन, धर्मरक्षण, तीर्थक्षेत्रे आणि मंदिरांचा जीर्णोद्धार भारतवर्षातील सर्व ठिकाणी करून देश आणि धर्माच्या सेवेत अद्‌भूत असे योगदान दिले आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी त्यांचे कार्य आणि योगदान सर्वश्रुत आहे. अतिशय दुर्गम ठिकाणी आणि दुरस्त ठिकाणावर एका महिला शासकाने केलेले कार्य आणि जीवनचरित्र हे एक मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून गौरविताना श्रीक्षेत्र सप्तशृंगगडावरील त्यांच्या कार्याचा आणि श्रीक्षेत्राचा मागोवा!**

# एक मार्गदर्शक दीपस्तंभ

**सुदर्शन दहातोंडे**

श्रीक्षेत्र सप्तशृंगगड हे तीर्थक्षेत्र महाराष्ट्राच्या उत्तरेला आणि सह्याद्रीच्या पर्वत शृंखलावर नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुका हद्दीत आदिशक्ती श्री सप्तशृंगी मातेच्या पावन स्पर्श आणि सहवासाने पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून अस्तित्वात आलेले आद्यस्वयंभू शक्तीपीठ आहे. हे शक्तीपीठ समुद्र सपाटीपासून सुमारे ४,६५९ फूट उंचीवर असून एकूण सात भिन्न शिखर/शृंगावर विराजमान आहे. त्यामुळे शक्तीच्या या स्वरूपाला सप्तशृंगी असे नाव प्राप्त झाले आहे. श्री भगवतीचे स्वरूप हे ११ फूट उंच, नऊ फूट रुंद असून शेंदूर चर्चित आहे. श्री स्वरूपाने विविध १५ अस्त्र व शस्त्र असून एकूण १८ बुजा अर्थात अष्टदशभुजा प्रकारात विराजलेले आहे. श्रीक्षेत्रावर पौराणिक १०८ कुंड असून विविध मंदिर आणि धार्मिक सेवा केंद्रांनी हा परिसर दिमाखात उभा आहे.

हे तीर्थक्षेत्र अतिप्राचीन असून, फार पूर्वीपासून श्री शक्तीचे येथे अस्तित्व असून म्हैषासुर, शुंभ-निशुंभ अशा राक्षसांचा अंत करून देवी या गडावर विसाव्याला आली. प्रसंगी महर्षी मार्केण्ड यांनी तिची स्तुती अर्थात दुर्गा सप्तशतीचे उच्चारण केले आणि ते एकाग्र होऊन ऐकताना येथेच तिचे निरंतर अस्तित्वातून परिसराला सहवास लाभला, अशी आख्यायिका आहे.

श्री सप्तशृंगी माता ही संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) यांची कुलस्वामिनी असून नाथ संप्रदायाची प्रेरणा आणि शक्ती आहे. नाथसंप्रदायी गुरू मच्छींद्रनाथ यांनी येथे शाबरी विद्येची साधना केली आहे. संत निवृत्ती, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताई, संत सोपान यांचादेखील या श्री क्षेत्रावर भगवती दर्शनाचा संदर्भ दिला जातो. तसेच श्री स्वामी समर्थ, श्री गजानन महाराज, श्री शंकर महाराज, श्री देव मामलेदार महाराज, श्री साई बाबा यांसह अनेक ऋषितुल्य महापुरुष व अवलीयांनी या क्षेत्री शक्तीची साधना केली आहे. वनवासात प्रभू रामचंद्र यांनी श्रीक्षेत्री शक्तीची साधना केली असून छत्रपती शिवाजी महाराज यांनीदेखील या ठिकाणी भगवतीचा कृपाशीर्वाद घेतला आहे.




श्रीक्षेत्र आणि परिसरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली या तीर्थक्षेत्रावर धर्मशाळेची उभारणी करण्यात आली. तसेच शिवालय तीर्थ परिसरातदेखील उपलब्ध पौराणिक मंदिर, कुंड व जलसंपदा उद्देशाने सरन्यातील सरदार आणि जहागीरदार यांच्याकडून जीर्णोद्धार; तसेच उभारणीसाठी योगदान देण्यात आले. या वास्तूंपैकी नामशेष झालेली धर्मशाळा ही ब्रिटिश बंगला म्हणून ओळखली जाते. या संदर्भाने काही उल्लेख हे मुंबई गॅझेटर (डेक्कन), नाशिक; तसेच अहिल्या किल्ला, महेश्वर, जिल्हा खरगोन (मध्य प्रदेश) येथील वास्तूतील भिंतीपत्रके व मध्य प्रदेश शासनाने खरगोन जिल्ह्यातील पुरातत्व व पर्यटन आणि संस्कृती परिषदअंतर्गत प्रसिद्ध केलेल्या पुस्तकं आणि परिपत्रकात नमूद आहेत. यांसह महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी अहिल्यादेवी होळकर गौरवगाथा लोकमातेची (खंड आठ) नावे प्रसिद्ध केलेले त्रिशतकोत्तर लेखन व माहिती साहित्यातदेखील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी श्रीक्षेत्र सप्तशृंगगड येथे केलेल्या कार्य आणि सेवेचा उल्लेख आढळून येतो. मल्लखांब या क्रीडा प्रकाराची देखील पहिली मार्गदर्शक कार्यशाळा या तीर्थस्थानावर झाल्याच्या विविध कथा व संदर्भाने उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त सप्त कुंडलीनी मार्ग अर्थात सहजयोग संकल्पनेतदेखील या तीर्थस्थानाला कुंडलिनी साधनेचे मूलपीठं म्हणून महत्त्व मांडलेले आहेत. भौगोलिक आणि ऐतिहासिक तसेच आदी भौतिक संकल्पना आणि संदर्भ असलेले हे तीर्थक्षेत्र निसर्ग पर्यटनाचे एक केंद्र आहे.

श्रीक्षेत्र सप्तशृंगगड या तीर्थस्थानाच्या विकासात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान लाभले आहे. त्यासाठी त्यांच्या जीवनकार्याला त्रिवार वंदन!

**(मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्य व्यवस्थापक, श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड.)**



चौंडी येथील महादेव मंदिराचा जीर्णोद्धार.



जेजुरी येथील घाट.



गोदावरी नदीवरील पुणतांबे घाट.




चांदवड येथील रंगमहालातील टेहळणी स्थळ.



इंदूर राजवाडा, मध्य प्रदेश.




चांदवड येथील रंगमहालातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची राजगादी.

**सर्वांना सुरक्षित व सकस अन्न मिळावे, ज्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा दर्जा उंचावला जाऊन देशाच्या प्रगतीमध्ये हातभार लागेल, हा उद्देश समोर ठेवून जागतिक अन्न सुरक्षा दिवस साजरा करण्याची संकल्पना लोकाभिमुख व्हावी व जनमनामध्ये त्याबाबत जनजागृती व्हावी, ही बाब निश्चितच अभिनंदनीय व अनुकरणीय आहे. हा विभाग अधिक लोकाभिमुख व्हावा, जनतेचे आरोग्य सुरक्षित राहावे, याच जागतिक अन्नसुरक्षा दिनानिमित्त शुभेच्छा!**

# अन्न हे पूर्णब्रह्म!

**नरहरी झिरवाळ,**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन

***अन्नं हि भूतानां ज्येष्ठम् ।***
***तस्मात् सर्वौषधमुच्यते।।***

तैत्तिरीय उपनिषदामध्ये असे वर्णन आहे की, अन्न हे सर्वात श्रेष्ठ आहे व त्यामध्येच सर्व औषधांचा समावेश होतो. तसेच अन्न हे पूर्णब्रह्म किंवा अन्न, वस्त्र व निवारा या तीन मूलभूत गरजा यावरून अन्नाचे महत्त्व आपल्या लक्षात येते. आहार, निद्रा व ब्रह्मचर्य हे जीवनाचे तीन स्तंभ असल्याचा उल्लेख आयुर्वेदातही आहे.



संयुक्त राष्ट्राच्या डिसेंबर २०१८ मध्ये पार पडलेल्या सर्वसाधारण सभेमध्ये 'जागतिक अन्नसुरक्षा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि पहिला 'जागतिक अन्नसुरक्षा दिवस' ७ जून २०१९ रोजी जगभरात साजरा करण्यात आला. Food Safety, Everyone's business 'अन्नसुरक्षा, प्रत्येकाचे कर्तव्य' ही संकल्पना या दिनानिमित संयुक्त राष्ट्र (UN) संघाने घोषित केली होती. भारतात देखील केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या भारतीय अन्नसुरक्षा व मानके प्राधिकारण, नवी दिल्ली यांनी ७ जून २०१९ हा दिवस 'जागतिक अन्नसुरक्षा दिन' म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. त्यानुसार सर्व देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. केंद्रीय अन्नसुरक्षा प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली 'अन्नसुरक्षा प्रतिज्ञा' (Food Safety Pledge) महाराष्ट्रामध्ये अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत अन्नसुरक्षा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संबंधितांना देण्यात येते.

असुरक्षित, भेसळयुक्त अन्न किंवा दूषित अन्नपदार्थांपासून उद्‌भवणारे आजार हे सामाजिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करतात, ज्याचा विपरीत परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे.

जगभरात दरवर्षी सुमारे ६०० मिलियन आजार हे दूषित/असुरक्षित अन्नाच्या संक्रमणातून होत असून प्रती १० व्यक्तींमागे एका व्यक्तीचा बळी पडत असल्याचे समोर आले आहे. पाच वर्षांखालील मुलांना होणारे ४० टक्के आजार हे असुरक्षित अन्नपदार्थांमधून होत असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने निदर्शनास आणले आहे. या सर्व बाबी विचारात घेता सुरक्षित अन्नाचे महत्त्व आपल्या लक्षात येते. त्यामुळे 'जागतिक अन्नसुरक्षा दिवस' साजरा करण्याची संकल्पना निश्चितच प्रगतीच्या दिशेने एक पाऊल आहे.

अन्न सुरक्षितता व स्वच्छता यांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढू लागल्यामुळे विकसित देशांप्रमाणे केंद्र शासनाने पूर्वीचा अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ रद्द करून ५ ऑगस्ट २०११ पासून जम्मू काश्मीरसह संपूर्ण देशभर 'अन्नसुरक्षा मानदे कायदा २००६ नियम, नियमन २०११ लागू करून अमलात आणला. हा कायदा राबवण्याची जबाबदारी केंद्रीय आरोग्य मंत्रालय अंतर्गत भारतीय अन्नसुरक्षा मानके प्राधिकरण, नवी दिल्ली (FSSAI, New Delhi) यांच्यावर सोपवण्यात आली आहे. भारतीय अन्न प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक राज्याच्या अन्न प्रशासनामार्फत हा कायदा एकछत्री अंमल पद्धतीने राबवण्यात येत आहे. यामध्ये यापूर्वीचे अनेक अन्नविषयक विधेयके, आदेश व कायदे यांचे विलीनीकरण करण्यात आले आहे. महाराष्ट्रामध्ये १९७२ साली स्थापन झालेल्या अन्न विभागामार्फत हा कायदा राबवण्यात येतो. सद्य:स्थितीत अन्नसुरक्षा आयुक्त यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली सह आयुक्त (अन्न), सहायक आयुक्त (अन्न) तथा पदनिर्देशित अधिकारी व अन्नसुरक्षा अधिकारी हे जबाबदारीने व यशस्वीपणे या कायद्याची अंमलबजावणी करत आहेत. सर्वसामान्यांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या विभागाचे नुकतेच बळकटीकरण करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दाखवलेल्या विश्वासामुळे १ जानेवारी २०२५ पासून मी अन्न व औषध प्रशासन, विशेष साहाय्य विभागाचा कार्यभार स्वीकारला. जनतेच्या आरोग्याला प्राधान्य देऊन सर्वप्रथम दूध भेसळीचा विषय ऐरणीवर घेतला. १०० दिवसांच्या उपक्रमामध्ये दूध व दुग्धजन्य पदार्थांचे पाच हजारपेक्षा अधिक अन्न नमुने घेतले असून, यासाठी विविध ठिकाणी दूध टोल नाका मोहीम राबवण्यात आल्या आहेत.

या मोहिमेमध्ये अधिकाऱ्यांचे मनोधैर्य उंचवावे म्हणून मी स्वत: सहभाग घेतला. १०० दिवसांमध्ये विभागाने ९२ टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त राजेश नार्वेकर व विभागातील सर्व अधिकारी यांचे सहकार्य लाभले आहे. तसेच यासाठी मुख्यमंत्र्यांकडून विभागास अभिनंदन पत्र देण्यात आले आहे.

**सर्व अन्न व्यावसायिक, ग्राहक आणि संबंधित यंत्रणांनी एकत्र येऊन अन्नसुरक्षा संदर्भातील जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. सुरक्षित अन्न हेच निरोगी आयुष्याचे आणि सक्षम राष्ट्राचे आधारस्तंभ आहे.**

# अन्नसुरक्षेसाठी कटिबद्ध

**योगेश कदम,**
राज्यमंत्री, अन्न व औषध प्रशासन



७ जून रोजी जागतिक अन्नसुरक्षा दिन साजरा करताना, अन्नसुरक्षा आणि गुणवत्ता याचे महत्त्व अधोरेखित करण्याची ही एक महत्त्वाची संधी आहे. सुरक्षित व पौष्टिक अन्न हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत हक्क असून, निरोगी समाज व राष्ट्राच्या बांधणीत याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

अन्न व औषध प्रशासनातील सन १९७२ मध्ये स्थापना झालेला अन्न विभाग हा जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी अन्नसुरक्षा नियमांची अंमलबजावणी करण्यास सदैव कटिबद्ध आहे. अन्न उत्पादन, प्रक्रिया, वितरण आणि विक्री या सर्व टप्प्यांवर अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासन आवश्यक उपाययोजना करीत आहे. या दिवशी, सर्व अन्न व्यावसायिक, ग्राहक आणि संबंधित यंत्रणांनी एकत्र येऊन अन्नसुरक्षा संदर्भातील जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. सुरक्षित अन्न हेच निरोगी आयुष्याचे आणि सक्षम राष्ट्राचे आधारस्तंभ आहे.

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी अन्न सुरक्षेसंदर्भात नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे महत्त्वपूर्ण अनेक पावले उचलली आहेत.

**परवाना व नोंदणी प्रणाली (FSSAI अंतर्गत) :** सर्व अन्न व्यावसायिकांसाठी FSSAI नोंदणी किंवा परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**नियमित तपासणी व नमुना संकलन :** हॉटेल्स, खाद्यपदार्थ विक्रेते, प्रक्रिया उद्योग, पथविक्रेते यांची नियमित तपासणी केली जाते. संशयास्पद अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले जातात. निकृष्ट किंवा भेसळयुक्त अन्न आढळल्यास कारवाई केली जाते.

**जनजागृती व प्रशिक्षण :** अन्न व्यावसायिकांना फूड सेफ्टी ट्रेनिंग अँड सर्टिफिकेशन (FoSTaC) प्रशिक्षण दिले जाते. शाळा, महाविद्यालये, मंडळे यांच्यामार्फत अन्नसुरक्षेवर जनजागृती अभियान राबवले जाते. ग्राहकांसाठी अन्नाच्या लेबल व गुणवत्ता ओळखण्याबाबत मार्गदर्शन. Eat Right उपक्रमांतर्गत EAT RIGHT SCHOOL, Eat Right Campus, BHOG (Blissful and Hygienic offering to God) Clean Street Food Hub, RuCo (Repurpose used Cooking Oil) initiative, Hygien Rating Initiative



**त्वरित कारवाई व दंडात्मक पावले :** अन्न कायद्यानुसार दोषी आढळलेल्या व्यावसायिकांवर दंड, परवाना निलंबन व खटले दाखल करण्यात येतात. अन्नामध्ये भेसळ, कालबाह्य उत्पादने विक्री, अस्वच्छतेबाबत तात्काळ कारवाई.

**प्रयोगशाळा व तंत्रज्ञानाचा वापर :** आधुनिक अन्न तपासणी प्रयोगशाळा मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. मोबाइल अन्न तपासणी युनिट्स (Food Safety on Wheels) राज्यात काही ठिकाणी कार्यरत. डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर तक्रार नोंदवण्याची व मागोवा घेण्याची सुविधा-food safety connect portal/Foscos portals

**विशेष मोहिमा :** १) दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळ मोहीम २) मसाले मोहीम ३) पनीर व पनीर analogue मोहीम ४) सणासुदीची मोहीम ५) १०० दिवसांच्या विशेष मोहिमेमध्ये विभागाने ५००० दुधाचे अन्न नमूने विश्लेषणासाठी घेतले ६) प्रतिबंधित अन्नपदार्थ मोहीम.

**विभागाचे बळकटीकरण :** विभागात १९४ अन्नसुरक्षा अधिकारी व आठ सहायक आयुक्त अन्न यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेली आहे.

- बाह्यस्रोताद्वारे डेटा एन्ट्री ऑपरेटर, अन्न नमुना साहाय्यक, वाहने यामुळे प्रशासनाला बळकटी व विभागाची प्रतिमा उंचावण्यात नक्कीच मदत मिळत आहे.

या सर्व उपाययोजनांचा उद्देश म्हणजे महाराष्ट्रातील नागरिकांना सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व पौष्टिक अन्न उपलब्ध करून देणे व अन्नसुरक्षेबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढवणे हा आहे. चला, आपण सर्वजण अन्नसुरक्षेचे महत्त्व जाणून, आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठी 'सुरक्षित अन्न : निरोगी भारत' या संकल्पनेला कृतीत उतरवू या.

**जागतिक अन्न सुरक्षा दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**

**अन्न व औषध प्रशासनाचा १८००-२२२-३६५ हेल्पलाइन क्रमांक असून याद्वारे नागरिक अन्न व औषधविषयक तक्रारी, शंका व माहिती सहज नोंदवू शकतात. तसेच www.fdamaharashtra.gov.in, भारतीय अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाचे FoSCoS पोर्टलवर ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे.**

# शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्

**राजेश नार्वेकर,**
आयुक्त, अन्न व औषध प्रशासन



'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' शरीर हे सर्व कर्तव्यसाधनांचे माध्यम आहे, त्यासाठी ते निरोगी असणे आवश्यक आहे. यथा अन्नं तथा मनः - म्हणजे जसे अन्न, तसे मन, असा आपला भारतीय विचार आहे. अन्न केवळ शरीराला पोषण देणारे नसून, ते आपले आरोग्य, विचार आणि जीवनशैली ठरवते. त्यामुळे अन्न सुरक्षित, स्वच्छ आणि पोषक असणे अत्यावश्यक आहे. आरोग्य राखण्यासाठी शुद्ध अन्न व सुरक्षित औषध हाच मूलमंत्र आहे. समाजाच्या आरोग्याची देखभाल ही कोणत्याही सुसंस्कृत आणि जबाबदार शासनव्यवस्थेची प्राथमिक जबाबदारी असते. आरोग्य उत्तम असेल, तरच शिक्षण, काम, सेवा व संस्कार फळाला येतात. म्हणूनच आरोग्य टिकविण्यासाठी सुरक्षित अन्न आणि प्रभावी औषधे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. या हक्काची पूर्तता सुनिश्चित करणारी व त्यासाठी निःस्वार्थपणे कार्य करणारी संस्था म्हणजे अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य. ही संस्था केवळ नियमावलीची अंमलबजावणी करणारी प्रशासकीय यंत्रणा नाही, तर ती सामाजिक बांधिलकीची सजीव अभिव्यक्ती आहे.

एखाद्या औषधाला मान्यता देणे किंवा एखाद्या अन्नपदार्थाच्या घटकांवर नियंत्रण ठेवणे हे केवळ कायदेशीर किंवा तांत्रिक काम नव्हे, तर ते सामाजिकदृष्ट्या फार मोठे जबाबदारीचे काम आहे. या यंत्रणांकडून घेतले जाणारे निर्णय थेट लाखो नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम करतात. म्हणूनच सामाजिक बांधिलकी या संकल्पनेला अन्न व औषध प्रशासनात विशेष महत्त्व असून जनतेच्या हितासाठी कार्य करणे, गरीब व वंचित घटकांचा विचार, सर्वसामान्य जनतेत जागरूकता निर्माण करणे, आपत्तीच्या वेळी तत्काळ प्रतिसाद, या सामाजिक बांधिलकीच्या पैलूंना अन्न व औषध प्रशासन बांधील राहून कार्यरत आहे. अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्यात अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ व औषध व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० या प्रमुख कायद्यांची अंमलबजावणी करीत असून या कायद्यातील तरतुदींनुसार अन्न व्यावसायिकांना परवाने व नोंदणी देणे, अन्न उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक आणि विक्री यांमधील नियम ठरवणे; तसेच औषध उत्पादन, वितरण, विक्री यांचे नियंत्रण, भेसळ, बनावट औषधे यावर कठोर कारवाई, यासोबतच अन्न व औषध क्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारींचे निवारण, जनजागृती, प्रशिक्षण आणि सामाजिक उपक्रम राबवत आहे.

## समाजाभिमुख योजना / मोहीम

### गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांवरील बंदी

महाराष्ट्र शासनाने २०१२ पासून गुटखा व सुगंधित पानमसाल्यावर बंदी घातली असून, अन्न व औषध प्रशासन ही बंदी प्रभावीपणे राबवत आहे. शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी तंबाखूविरोधी जनजागृती मोहिमा राबवण्यात येतात. गुटखाबंदी ही फक्त कायदेशीर कारवाई नसून जनतेच्या आरोग्य रक्षणाचा सामाजिक संकल्प आहे.

### अन्न व औषध भेसळविरोधी कारवाई

दरवर्षी हजारो अन्न व औषध नमुन्यांची तपासणी करून अप्रमाणित अन्न व औषधे जप्त व उत्पादकांवर गुन्हे दाखल करण्यात येतात. तसेच सण-उत्सव काळात विशेष तपासणी मोहिमा राबवण्यात येतात.

औषधांचा दुरुपयोग, बनावट औषधे, चुकीच्या उत्पादन प्रक्रियेवर नजर ठेवते. अनेकदा सोशल मीडियावरून मिळणाऱ्या तक्रारींवरही त्वरित कारवाई केली जाते.

### Eat Right Maharashtra – आरोग्यदायी महाराष्ट्राचा मार्ग

भारतीय अन्न सुरक्षा मानके प्राधिकरणाच्या 'Eat Right India' या उपक्रमांतर्गत अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्यात अनेक उपक्रम राबवत आहे.

## तंत्रज्ञानावर आधारित सशक्त व्यवस्था

अन्न व औषध प्रशासन आता डिजिटल युगाशी सुसंगत होत असून e-License प्रणालींतर्गत - अन्न व औषध व्यवसाय परवाने ऑनलाइन देण्यात येतात.

## दृष्टिकोन – भविष्याची दिशा

- एआय आधारित निरीक्षण प्रणाली
- औषध ट्रॅकिंगसाठी ब्लॉकचेन प्रणाली
- स्मार्ट फूड टेस्टिंग व्हॅन्स
- One Health मॉडेल -अन्न, औषध, पशु व पर्यावरण यांचा समन्वय
- QR कोड ट्रॅकिंग - औषध व अन्न पुरवठा साखळीची पारदर्शकता

## आव्हाने व संधी

वाढती लोकसंख्या, तितकीच उत्पादनांची विविधता, डिजिटल बाजारपेठेमुळे औषधांच्या ऑनलाइन विक्रीमुळे वाढता अप्रामाणिकपणा, ग्रामीण भागातील अन्नसुरक्षा व औषधांची गुणवत्ता ही आव्हाने आहेत. सामाजिक बांधिलकी ही संस्थेची मूलभूत प्रेरणा आहे. राज्यातील नागरिकांनी जागरूक ग्राहक म्हणून अन्न व औषध सुरक्षा या विषयात सक्रिय सहभाग घेणे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. कायम सत्य, गुणवत्ता आणि सेवा यावर विश्वास ठेवून कार्य करणे, हेच आमचे ब्रीद आहे. या विचाराला घेऊन अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्रात आरोग्यपूर्ण आणि सुरक्षित जीवनशैलीसाठी सदैव तत्पर आहे.

आरोग्य म्हणजे रोगांचा अभाव नसून शारीरिक व मानसिक, सामाजिक व संपूर्ण स्वास्थ म्हणजे आरोग्य होय. पोषणाचा आरोग्याशी अनन्यसाधारण संबंध आहे. आहारातून आपल्याला सर्व अन्नघटके मिळतात. जसे, कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध, जीवनसत्वे, क्षार, खनिजे, पाणी योग्य प्रमाणात मिळल्यास उत्तम पोषण झाल्याने आरोग्य उत्तम राहते.

# अन्न संपुष्टीकरणाचे महत्त्व

**ऋषिकेश मरेवार**

अन्न संपुष्टीकरण म्हणजे अन्नपदार्थांमध्ये आवश्यक पोषक घटक जसे की, जीवनसत्त्वे (विटामिन्स) आणि खनिजे घालण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे अन्नाचे पोषणमूल्य वाढते. त्यामुळे शरीराला आवश्यक पोषण सहज मिळू शकते. भारतातील अनेक लोकांना त्यांच्या रोजच्या आहारातून पुरेसे पोषण मिळत नाही. यामुळे अनेक आरोग्यसंबंधी समस्या निर्माण होतात, जसे की अशक्तपणा, रोगप्रतिकारशक्ती कमी होणे. सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांचे पोषणमूल्य वाढवून, रोजच्या आहारातील त्रुटी दूर करून आणि लोकांच्या खाण्याच्या सवयी बदलण्याची गरज नाही.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

अन्न संपुष्टीकरणाची संकल्पना २० व्या शतकाच्या सुरुवातीला उदयास आली. लोकांना त्यांच्या रोजच्या अन्नातून आवश्यक पोषक घटक मिळत नव्हते आणि त्यामुळे गंभीर आरोग्य समस्या उद्भवत होत्या. या पार्श्वभूमीवर अन्न संपुष्टीकरण ही एक प्रभावी उपाययोजना म्हणून स्वीकारली गेली.

## महत्त्वाचे टप्पे


१९२० चे दशक - गलगंड (थायरॉईड ग्रंथी वाढणे) हा आजार टाळण्यासाठी स्वित्झर्लंड आणि अमेरिकेत आयोडीनयुक्त मीठ वापरण्यास सुरुवात झाली. हा अन्न संपुष्टीकरणाच्या इतिहासातील पहिला यशस्वी प्रयोग मानला जातो.

## १९३० चे दशक

रिकेट्स (हाडे कमकुवत होणे) या आजारावर उपाय म्हणून दुधात विटामिन डी घालण्याची पद्धत सुरू करण्यात आली. या उपायाने अनेकांचे आरोग्य सुधारले.

## १९४० चे दशक

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, युरोप व अमेरिकेत पिठूळ अन्नात लोह आणि बी-विटामिन्स (B-complex Vitamins) मिसळण्यास सुरुवात झाली. युद्धाच्या काळात अन्नाचा तुटवडा झाल्यामुळे शरीरास आवश्यक पोषण मिळवण्यासाठी अन्न संपुष्टीकरण महत्त्वाचे ठरले.





## १९९० चे दशक

या कालखंडात, विशेषतः न्यूरल ट्यूब दोष मुलांच्या मेंदू व मज्जासंस्थेशी संबंधित त्रुटी कमी करण्यासाठी धान्यपदार्थांमध्ये फॉलिक आम्ल (Folic Acid) घालणे अनेक देशांमध्ये अनिवार्य करण्यात आले.

## संपुष्टीकरणाचे प्रकार

**व्यापक संपुष्टीकरण** : सर्वसामान्य लोकसंख्या वापरत असलेल्या मुख्य अन्नधान्यांमध्ये (गहू, तांदूळ) पोषक घटक घालणे. उदा- सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS)

## अंतर्गत संपुष्टीकृत तांदूळ वाटप

**लक्षित संपुष्टीकरण** : बालकांसाठी अन्न, गर्भवती महिलांसाठी पूरक अन्न यांसारख्या विशिष्ट गटांवर लक्ष केंद्रित करणे. उदा- महिला व बाल कल्याण विभागामार्फत वितरित होणारे संपुष्टीकृत खिचडी, कडधान्य पावडर इ. वाटप

**बाजार-प्रेरित संपुष्टीकरण** : कंपन्यांद्वारे स्वेच्छेने पोषक घटक जोडणे. (उदा., विटामिन-युक्त ब्रेकफास्ट सिरियल्स, संपुष्टीकृत खाद्य तेल, दूध इ.)

## सामान्य संपुष्टीकृत

**मुख्य धान्ये** : गहू (लोह, फॉलिक आम्ल), तांदूळ (विटामिन ए), मका (जस्त).

**दुग्ध उत्पादने** : दूध (विटामिन ए आणि डी).

मीठ (आयोडीन), तेल (विटामिन ए आणि डी).

**प्रक्रिया केलेले अन्न** : धान्याचे पदार्थ (वेगवेगळी विटामिन्स), स्नॅक्स (कॅल्शियम).

## महत्त्वाचे पोषक घटक

विटामिन ए (दृष्टी), विटामिन डी (हाडांचे आरोग्य), विटामिन बी-कॉम्प्लेक्स (ऊर्जा चयापचय).

**खनिजे** : लोह (रक्तक्षय प्रतिबंध), आयोडीन (थायरॉईड कार्य), जस्त (रोगप्रतिकार शक्ती).

### संपुष्टीकरणाचे फायदे

**सार्वजनिक आरोग्यावर परिणाम :** न्यूरल ट्यूब दोष, गलगंड, रिकेट्स, रक्तक्षय प्रतिबंध यांसारख्या आजारांमध्ये घट.

**किफायतशीर उपाय :** कमी खर्चात मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोच.

**सहज उपलब्धता :** आहारात मोठा बदल न करता पोषण सुधारणे.

### आव्हाने आणि मर्यादा

**अतिउपभोग धोके -** ज्याप्रमाणे काही पोषक घटकांची कमतरता शरीरासाठी हानिकारक असते, त्याचप्रमाणे त्यांचा अति प्रमाणात वापरदेखील धोका निर्माण करू शकतो. उदाहरणार्थ, विटामिन-ए या घटकाचे अत्याधिक सेवन केल्यास विषबाधा होऊ शकते. त्यामुळे संपुष्टीकरण करताना पोषक घटकांचे प्रमाण अत्यंत काटेकोरपणे ठरवावे लागते.

**तांत्रिक समस्या -** अन्नप्रक्रिया व साठवणुकीदरम्यान पोषक घटकांची स्थिरता टिकवणे हे एक मोठे तांत्रिक आव्हान आहे. उष्णता, प्रकाश, आर्द्रता अशा घटकांमुळे काही पोषक द्रव्यांचे गुणधर्म नष्ट होण्याची शक्यता असते. त्यामुळे संपुष्टीकरण करताना योग्य तंत्रज्ञान आवश्यक असते.

**असमानता -** शहरी भागात संपुष्टीकृत अन्न सहज उपलब्ध असते, पण ग्रामीण, दुर्गम आणि गरीब भागांमध्ये त्याची मर्यादित उपलब्धता ही एक गंभीर समस्या आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य लोकांना या उपाययोजनेचा पुरेसा लाभ मिळत नाही.

**आहारातील आळस -** संपुष्टीकृत अन्नावर अधिक अवलंबून राहिल्यास लोक संतुलित आणि नैसर्गिक आहाराकडे दुर्लक्ष करू शकतात. विविध प्रकारची ताजी फळे, भाज्या, डाळी, धान्ये यांचा समावेश असलेला संतुलित आहार हा कायमच आरोग्यासाठी आवश्यक असतो.

### नियामक

जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि अन्न आणि कृषी संघटना (FAO) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार पोषक घटकांची सुरक्षित पातळी ठरवली जाते. भारतात, अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) ने २०१८ मध्ये फोर्टिफाइड फूडची मानके जारी केली आहेत. १३० पेक्षा जास्त देशांमध्ये आयोडीनयुक्त मीठ अनिवार्य केले आहे.

### यशस्वी उदाहरणे

- **आयोडीनयुक्त मीठ :** जागतिक स्तरावर गलगंड रोग ७० टक्क्यांनी कमी झाला.
- **फॉलिक आम्लाची भर :** अमेरिकेत १९९८ पासून न्यूरल ट्यूब दोष ५० टक्क्यांनी घटले.
- **विटामिन ए युक्त साखर :** मध्य अमेरिकेत बालकांमध्ये अंधत्व रोखले.
- **भारतातील योजना :** सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) अंतर्गत संपुष्टीकृत तांदूळ वाटप.

### भविष्यातील दिशानिर्देश

बदलत्या जीवनशैली, हवामानातील बदल आणि पोषणाची वाढती गरज लक्षात घेता अन्न संपुष्टीकरण समस्येवर प्रभावी.

### बायोफोर्टिफिकेशन

बायोफोर्टिफिकेशन ही एक नैसर्गिक पद्धत आहे. ज्यामध्ये पिकांमध्येच आवश्यक पोषक घटक वाढवले जातात. पिकांमध्ये नैसर्गिकरीत्या पोषक घटक वाढवण्यासाठी प्रयत्न करणे (उदा., बीटा - कॅरोटीनयुक्त सोनेरी तांदूळ).

### नॅनो तंत्रज्ञान

नॅनो तंत्रज्ञान हे एक आधुनिक आणि प्रभावी साधन ठरू शकते. नॅनो - कॅप्स्युलसच्या मदतीने पोषक घटक शरीरात अधिक प्रभावीपणे शोषले जाऊ शकतात.



### हवामानाशी सुसंगतता

जमिनीतील पोषणतटस्थता, हवामानातील बदल यामुळे भविष्यातील अन्नपदार्थांमध्ये पोषण टिकवणे हे एक मोठे आव्हान ठरत आहे. अशा स्थितीत अशा पद्धती विकसित कराव्या लागतील, ज्या पिकांना खराब जमिनीवरही पोषणदृष्ट्या समृद्ध बनवतील, अशा पद्धती शोधून काढण्यासाठी प्रयत्न करणे. ज्यामध्ये पोषक बियाणे, माती परीक्षण यांचा समावेश केला जाऊ शकतो. काही समीक्षकांच्या मते, अन्न संपुष्टीकरण हा एक तात्पुरता उपाय असून, तो दीर्घकालीन आणि मूलभूत समस्यांपासून दुर्लक्षित होत आहे; पण अन्न संपुष्टीकरणासाठी बनवलेली अनिवार्य धोरणे आणि ग्राहकांच्या आवडीनिवडींच्या स्वातंत्र्यावरही यामुळे प्रश्न उपस्थित होत आहेत. यासाठी अन्न संपुष्टीकरणासोबतच पोषण शिक्षण, शाश्वत शेती आणि सामाजिक, आर्थिक सुधारणांचीही गरज आहे,

### निष्कर्ष

अन्न संपुष्टीकरण हे पोषण समस्यांवर मात करण्याचे एक शक्तिशाली साधन आहे. हा केवळ एकच उपाय नसून, संतुलित आहार, शिक्षण, आणि समाजातील आर्थिक स्थैर्य यांसोबत एकत्रितपणे वापरण्यासाठी महत्त्वाचे साधन आहे. तंत्रज्ञान आणि धोरणे विकसित होत असताना, संपुष्टीकरणाची भूमिका भविष्यात अधिक महत्त्वपूर्ण करावी लागणार आहे. जेणेकरून आरोग्यदायी आणि टिकाऊ समाजाची निर्मिती करता येईल.

**(लेखक हे नांदेड येथे अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन पदावर कार्यरत आहेत.)**

**अन्न ही मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक गरज आहे. अन्नाची ही गरज पूर्ण करताना प्रत्येकाला सुरक्षित व सकस अन्न मिळावे, यासाठी शासन स्तरावरदेखील आवर्जून प्रयत्न होताना दिसतात. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत नियम व नियमने यांच्या माध्यमातून राज्यात या कायद्याची अंमलबजावणी अन्न व औषध प्रशासन विभाग करत आहे.**

# अन्नपदार्थांवरील लेबलिंग

**गौरी जोशी**

अन्नसुरक्षा व मानके कायद्यांतर्गत विविध विषयांवर एकूण २८ नियमने आहेत. त्यापैकी अन्नपदार्थांच्या लेबलिंगसाठी अन्नसुरक्षा व मानके (Labelling and Display) नियमने २०२० महत्त्वाचे आहेत.

## अन्नपदार्थांवर लेबलिंगची आवश्यकता

अन्नपदार्थांवरील लेबलवरून अन्नपदार्थातील घटकपदार्थांची माहिती, अन्नपदार्थ कधी उत्पादित झाला असून त्याचा वापरण्यायोग्य कालावधी समजतो, त्याचप्रमाणे अन्नपदार्थ शाकाहारी की मांसाहारी हेदेखील लक्षात येते. यासोबतच उत्पादित कंपनीचे नाव, वापरण्यात आलेल्या पदार्थांची टक्केवारी अशा अनेक बाबींची माहिती लेबलवर दिली जाते.

बऱ्याच वेळेस सुपर मार्केटमध्ये किंवा मोठ्या मॉलमध्ये डिस्काऊंट किंवा एकावर एक फ्री मिळत असले की, त्या अन्न पदार्थांची पाकिटे न पाहता खरेदी केली जातात. त्यानंतर घरी आल्यावर लक्षात येते की, घेतलेल्या अन्नपदार्थांचा वापरण्यायोग्य कालावधी संपायला पुरेसा कालावधी शिल्लक नाही. तसेच काही अन्नपदार्थांमध्ये अन्य घटकांचा समावेश अधिक प्रमाणात केलेला असतो. या सर्व गोष्टी टाळायच्या असल्यास अन्नपदार्थांवर लेबलिंग अत्यावश्यक आहे.

## पाकीटबंद अन्नपदार्थांच्या लेबलवर आवश्यक बाबी

- लेबलवरील मजकूर सुस्पष्ट, ठळक, न मिटणारा व ग्राहकाला सहज वाचता येईल असा असणे आवश्यक आहे.
- लेबलवरील मजकूर हा इंग्रजी अथवा हिंदी किंवा देवनागरी लिपीमध्येच असावा. या भाषांसोबत अन्य भाषेचा समावेश केलेला असेल तरी चालेल.
- अन्नपदार्थाचे नाव पॅकेटच्या पृष्ठभागावर नमूद केलेले पाहिजे.
- अन्नपदार्थात असलेल्या घटकांची यादी घटकांच्या प्रमाणानुसार उतरत्या क्रमात नमूद करणे बंधनकारक आहे. जेणेकरून अन्नपदार्थात जो घटक वजन किंवा घनतेनुसार जास्त आहे, तो पहिला लिहायचा व अनुक्रमे पुढील घटकपदार्थ नमूद करायचे.
- ज्या अन्नपदार्थात दोन किंवा दोनपेक्षा जास्त घटक आहेत, अशा अन्नपदार्थाच्या लेबलवर Nutritional Information लिहिणे बंधनकारक आहे. यामध्ये






अन्नपदार्थात प्रती १०० ग्रॅम किती Energy value (kcal) म्हणजे त्यात किती कॅलरीज आहेत, तसेच प्रती १०० ग्रॅममध्ये किती प्रोटीन, फॅट व कार्बो हायड्रेट्स आहेत, हेदेखील नमूद करणे बंधनकारक आहे. कार्बोहायड्रेट नमूद करताना त्यामध्ये शुगर व डेड शुगर; तसेच फॅट नमूद करताना सॅच्युरेटेड फॅट, ट्रान्स फॅट व कोलेस्ट्रॉल असे स्वतंत्र नमूद करणे बंधनकारक आहे. लेबलवरील Nutritional Information लिहिण्यास काही अन्नपदार्थांना सूट आहे, जसे किमान प्रक्रिया केलेली कृषी उत्पादने ज्यामध्ये एकच घटक आहे, जसे गहू, तांदूळ, फळे, डाळी, पाणी, चहा पावडर, कॉफी चिकोरी मिक्स, मद्य, फ्लेवर्स, जिलेटीन व अन्य काही.

- वरील माहितीसोबत प्रत्येक अन्न पदार्थाच्या लेबलवर शाकाहारी अथवा मांसाहारी अन्नपदार्थाचे चिन्ह असणे आवश्यक आहे.
- उत्पादकाचा / रिपॅकरचा पूर्ण पत्ता, ब्रॅण्ड मालक अथवा मार्केटर जे लागू असेल त्याचा पूर्ण पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. बाहेरील देशातून आयात केलेला अन्नपदार्थ असेल तर त्यावर आयातदाराचा पूर्ण पत्ता नमूद करणे बंधनकारक आहे.
- प्रत्येक अन्नपदार्थाच्या लेबलवर FSSAI क्रमांक खालील पद्धतीत नमूद करणे बंधनकारक आहे.
- लेबलवर अन्नपदार्थाचे वजन, किंमत, बॅच क्रमांक, उत्पादनाची तारीख; तसेच वापरण्यायोग्य तारीख, कस्टमर केअर क्रमांक, ॲलर्जीबाबतचे विधान नमूद करणे आवश्यक आहे.

वर नमूद लेबलविषयी तरतुदींव्यतिरिक्त देखील काही ठरावीक अन्नपदार्थांसाठी लेबलच्या विशेष तरतुदी आहेत. जसे न्यूट्रास्युटिकल्स, नवजात अर्भकांकरिताच्या अन्नपदार्थांवरील लेबल, जैविक अन्नपदार्थ, खाद्यतेल.

कायद्याने तरतुदी केलेल्या आहेत; पण लेबलबाबतीत राज्यात काही समस्यादेखील आहेत. जसे स्थानिक उत्पादनांवरील अपूर्ण किंवा चुकीचे लेबल, अनधिकृत किंवा बनावट लेबल, पोषणविषयी माहितीचा अभाव किंवा चुकीची माहिती, ॲलर्जी निर्माण करणाऱ्या घटकांची स्पष्ट माहिती न देणे, या समस्या सोडवण्याकरिता अन्न व औषध प्रशासन सातत्याने कार्यशील आहे. प्रशासनस्तरावर अन्न व्यावसायिकांच्या तपासण्या करणे, अन्न व्यावसायिकांना प्रशिक्षण देणे, ग्राहक व अन्न व्यावसायिकांसाठी २४ तास उपलब्ध असणाऱ्या हेल्पलाइन क्रमांकाच्या माध्यमातून ग्राहकांना मदत करणे, जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करणे व ग्राहकांना अन्नसुरक्षेबाबत सजग करण्याचे काम अन्न व औषध प्रशासन विभाग करत आहे.

अन्नसुरक्षा व अन्न व्यवसायाचा आवाका पाहता, यासाठी फक्त प्रशासनावर अवलंबून न राहता प्रत्येकाने स्वत:पासून सुरुवात करून अन्न सुरक्षेची दक्षता घेणे आवश्यक आहे, मग तो ग्राहक असो अथवा अन्न व्यावसायिक. जेव्हा प्रत्येक नागरिक अन्नसुरक्षेबाबतीत जागरूक होईल, तेव्हाच राज्य आणि पर्यायाने देश सुदृढ होईल. अन्नपदार्थांच्या लेबलवरील महत्त्वाच्या घटकांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

- लेबलवरील घटक पदार्थ व त्यामधील कॅलरीजचे प्रमाण पाहणे.
- अन्नपदार्थ तयार करण्यासाठी कोणत्या खाद्यतेलाचा वापर केला आहे.
- खाद्यपदार्थाची वापरण्यायोग्य तारीख.
- शक्यतो उघड्यावरील अन्नपदार्थ, भडक रंगाचे अन्नपदार्थ खाणे टाळणे.
- जास्त मीठ, साखर व तेल असलेल्या अन्नपदार्थाचे सेवन कमी करणे.




- अन्नपदार्थ विकत घेताना दुकानदाराकडून पक्के बिल घेणे.
- स्थानिक व सिजनल फळे, भाज्या, तृणधान्ये व भरडधान्ये यांचा आहारात समावेश करणे.
- अशा छोट्या वाटणाऱ्या; पण आपल्या आरोग्यावर थेट परिणाम करणाऱ्या गोष्टींची दैनंदिन आयुष्यात काळजी घेतल्यास अधिक निरोगी व सुदृढ समाज घडवू शकतो.

(लेखिका या बृहन्मुंबई येथे अन्नसुरक्षा अधिकारी या पदावर कार्यरत आहेत.)

**प्रत्येक अन्नपदार्थासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या कायद्यांमुळे त्यांच्या अंमलबजावणीत बऱ्याच अडचणी येत होत्या. तसेच संबंधित अन्न व्यावसायिकांना वेगवेगळ्या परवान्यांची आवश्यकता भासत होती. २००६ साली अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ हा तयार झाला. या कायद्यांतर्गत विविध अन्नपदार्थांचे तत्कालीन कायदे एकत्र करून केंद्रीय स्तरावर अन्नसुरक्षा नियंत्रणासाठी एकच केंद्रीय कायदा तयार केला, तो म्हणजे अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६.**

# अन्नसुरक्षा कवच

**नारायण सरकटे**

भारतामध्ये यापूर्वी अन्नपदार्थात होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न भेसळ प्रतिबंध कायदा १९५४ हा लागू होता. या कायद्याबरोबरच इतर अन्नपदार्थांबाबत जसे की, दुधाबाबत वेगळा कायदा, मांस (meat) पदार्थांसाठी, खाद्यतेल, फळे व भाजीपाला प्रक्रिया या सर्वांसाठी वेगवेगळे कायदे लागू होते. प्रत्येक अन्नपदार्थासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या कायद्यांमुळे त्यांच्या अंमलबजावणीत बऱ्याच अडचणी येत होत्या. तसेच संबंधित अन्न व्यावसायिकांना वेगवेगळ्या परवान्यांची आवश्यकता भासत होती. २००६ साली अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ हा तयार झाला. या कायद्यांतर्गत विविध अन्नपदार्थांचे तत्कालीन कायदे एकत्र करून केंद्रीय स्तरावर अन्नसुरक्षा नियंत्रणासाठी एकच केंद्रीय कायदा तयार केला, तो म्हणजे अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६. कायद्यानंतर जवळपास पाच वर्षे या कायद्याचे संबंधित नियम व नियमन बनवण्यासाठी लागली. अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ आणि नियम व नियमन २०११ हे एकत्रित करून केंद्रीय स्तरावर अन्नसुरक्षा नियंत्रणासाठी ५ ऑगस्ट २०११ पासून सर्व भारतभर हा कायदा लागू झाला.

### सेंद्रिय अन्नपदार्थ

अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ च्या कलम २२ नुसार सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणजे असे अन्नपदार्थ जे सेंद्रिय अन्नपदार्थ उत्पादन प्रक्रियेची विशेष मानदे पाळून तयार केलेले अन्नपदार्थ होय. सोप्या भाषेत सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणजे ज्यांच्या प्रक्रियेच्या वेळेस कोणतीही रासायनिक खते, रसायने किंवा इतर असे कृत्रिम पद्धती न वापरता जसे आहेत, तसे नैसर्गिकरीत्या तयार झालेले अन्नपदार्थ होय.

### अन्नसुरक्षा व मानदे (सेंद्रिय अन्नपदार्थ) नियमन २०१७

बाजारात आज बरेच अन्नपदार्थ सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणून विकले जातात; परंतु त्या अन्नपदार्थाच्या लेबलिंगवर सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणून बऱ्याच ठिकाणी आपल्याला दिसून येत नाही. तर हेच सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणून विकल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांवर प्रशासनाचे नियंत्रण असावे म्हणून अन्नसुरक्षा व मानदे प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी अन्न सुरक्षा व मानदे (सेंद्रिय अन्नपदार्थ) नियमन २०१७ ही तयार केले (Food Safety and Standard(Organic food) Regulation २०१७). हे भारतीय राजपत्र (Gazzette of India) यामध्ये २९ डिसेंबर २०१७ रोजी अधिसूचित करण्यात आले आणि हे नियम प्रत्येक अन्न व्यावसायिक जे की, सेंद्रिय अन्नपदार्थांची निर्मिती, वेष्टण व विक्री करतात, अशा प्रत्येक अन्न व्यावसायिकाला १ जुलै २०१८ पासून बंधनकारक करून लागू करण्यात आले आहेत.

अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी घोषित केल्याप्रमाणे, छोटे मूळ उत्पादक आणि शेवटचे ग्राहक हे अन्नसुरक्षा व मानदे (सेंद्रिय अन्नपदार्थ) नियमन २०१७ यांना या नियमातील तरतुदींमधून वगळण्यात आले आहे.

### महत्त्वाची तरतूद

अन्नसुरक्षा व मानदे (सेंद्रिय अन्नपदार्थ) नियमन, २०१७ अंतर्गत, सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणून पॅक करून विक्री करतो, त्या प्रत्येक सेंद्रिय अन्नपदार्थाला, १) सेंद्रिय उत्पादन राष्ट्रीय कार्यक्रम (National Programme for Organic Production - NPOP), २) एकत्रित सहभागी हमी यंत्रणा - भारत सरकार (Participatory Gurantee System - PGS INDIA) ३) अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरणाने (FSSAI) वेळोवेळी अधिसूचित केलेले इतर मानदे यापैकी कोणत्याही एका यंत्रणेचे प्रमाणपत्र असणे हे या नियमानुसार बंधनकारक आहे.

### सेंद्रिय उत्पादन राष्ट्रीय कार्यक्रम

भारत सरकारच्या परकीय व्यापार (विकास व नियंत्रण) कायदा १९९२ या अंतर्गत हा कार्यक्रम राबवला जातो. या कायद्यामध्ये सेंद्रिय अन्नपदार्थाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय मानकांनुसार अंमलबजावणी केली जाते. या कार्यक्रमांतर्गत सेंद्रिय अन्नपदार्थाच्या उत्पादनाची तृतीय पक्ष (Third Party Certification) मार्फत प्रमाणित नियंत्रण यंत्रणेद्वारे प्रमाणपत्र देऊन सेंद्रिय अन्नपदार्थाचे मानदानुसार उत्पादन कसे करावे हे प्रमाणित करण्यात येते.

### एकत्रित सहभागी हमी यंत्रणा

भारत सरकारच्या कृषी मंत्रालय आणि शेतकरी विकास, मंत्रालयाच्या अखत्यारीतील कृषी सहकार विभागामार्फत राबवण्यात येणारी ही कार्यक्रम यंत्रणा आहे. या कार्यक्रमांतर्गत सेंद्रिय शेती करणाऱ्या उत्पादक, ग्राहक आणि

इतर व्यावसायिक जे की सेंद्रिय उत्पादन राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत (National Programme for Organic Production - NPOP) तृतीय पक्ष प्रमाणपत्र (Third Party Certification) च्या कक्षेबाहेर येतात. या कार्यक्रमांमध्ये सर्व उत्पादक, ग्राहक आणि इतर सेंद्रिय अन्नपदार्थांचा व्यवसाय करणारे लोक एकत्र येऊन सेंद्रिय अन्नपदार्थांच्या उत्पादनाची हमी दिली जाते.

## अन्नसुरक्षा व मानदे प्राधिकरणाने वेळावेळी अधिसूचित केलेले इतर मानदे

सेंद्रिय उत्पादन राष्ट्रीय कार्यक्रम (National Programme for Organic Production - NPOP) व एकत्रित सहभागी हमी यंत्रणा -भारत सरकार (Participatory Guarantee System -PGS INDIA) या व्यतिरिक्त इतर मानदे जे अन्नसुरक्षा व मानदे प्राधिकरण, नवी दिल्ली यांनी अधिसूचित केले असेल अशी मानदे.

## सेंद्रिय अन्नपदार्थांचे लेबलिंग

- सेंद्रिय अन्नपदार्थांच्या वेष्टनावर सेंद्रिय अन्नपदार्थांची पूर्ण माहिती अचूक आणि सद्य:स्थिती निर्देशित केलेली असावी.
- प्रत्येक सेंद्रिय अन्नपदार्थांच्या वेष्टनावर अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण यांनी पारित केलेला इंडियाज ऑरगॅनिक लोगो - जैविक भारत (Jaivik Bharat) हा स्पष्टपणे छापलेला असावा.
- सेंद्रिय अन्नपदार्थांवर एनपीओपी (NPOP) किंवा पिजीएस इंडिया (PGS-INDIA) या प्रमाणित करणाऱ्या CERTIFICATION BODY या दोन्हीपैकी एकाचा दर्जात्मक लोगो छापलेला असावा. तसेच त्यांनी वेळोवेळी घोषित केलेली लेबलिंगची आवश्यकता हेसुद्धा सेंद्रिय अन्नपदार्थांच्या लेबलवर छापलेले असावे.
- सर्व सेंद्रिय अन्नपदार्थांबाबतीत उपरोक्त लेबलिंग नियमांच्या व्यतिरिक्त अन्न सुरक्षा व मानदे (पॅकेजिंग आणि लेबलिंग) नियमन २०११ यामधील अन्नपदार्थांबाबत दिलेल्या तरतुदीचेसुद्धा पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

## सेंद्रिय अन्नपदार्थांची घटकाच्या टक्केवारीनुसार घोषणा

- ***सेंद्रिय अन्नपदार्थ (organic) :*** सेंद्रिय अन्नपदार्थ म्हणून घोषित केलेल्या अन्नपदार्थांमध्ये १००% एकच सेंद्रिय घटक असणे आवश्यक आहे.
- ***प्रमाणित सेंद्रिय अन्नपदार्थ (certified organic) :*** सेंद्रिय अन्नपदार्थांमध्ये ९५ टक्के घटक हे सेंद्रिय असणे आवश्यक आहे.
- ***सेंद्रिय घटकांपासून बनवलेली (made with organic ingridients) :*** यामध्ये ७०% पेक्षा जास्त, परंतु ९५% पेक्षा कमी सेंद्रिय घटक पदार्थ असतील. ज्यामध्ये ७०% पेक्षा कमी घटक सेंद्रिय असतील अशा अन्नपदार्थांमध्ये प्रत्येक घटकाची टक्केवारी आणि सेंद्रिय घटकाची टक्केवारी हे घोषित करणे आवश्यक असेल.

## सेंद्रिय अन्नपदार्थांची ओळख

सेंद्रिय अन्नपदार्थाच्या लेबलवर जैविक भारत (jaivik Bharat), अथवा एनपीओपी लोगो (NPOP) किंवा पीजीएस इंडिया (PGS-INDIA) लोगो छापणे बंधनकारक आहे. त्यामुळे सेंद्रिय अन्नपदार्थ ओळखण्यास सोपे होते.

### अ) एनपीओपी प्रमाणित सेंद्रिय अन्नपदार्थ

प्रत्येक सेंद्रिय अन्नपदार्थाच्या लेबलिंगवर एनपीओपी (NPOP) लोगो छापलेला असतो. तसेच प्रत्येक एनपीओपी (NPOP) प्रमाणित सेंद्रिय अन्नपदार्थांच्या उत्पादकाला स्कोप सर्टिफिकेट (scope certificate) आणि ट्रांजेक्शन सर्टिफिकेट (Transaction Certificate) हे एनपीओपी (NPOP) प्रमाणित यंत्रणेने दिलेले असते. उपरोक्त दोन्ही प्रमाणपत्रांच्या अनुषंगिक सेंद्रिय अन्नपदार्थाच्या लोगोवर एक क्युआर (QR Code) कोड आणि बारकोड दिलेला असतो. सदर क्युआर कोड आपण स्कॅन केला असता आपल्याला (The Agricultural and Processed Food Products Export Development Authority (APEDA) च्या ट्रेसनेट (Trace Net) संकेत स्थळावरून उपरोक्त प्रमाणपत्राची पीडीएफमधील कॉपी लगेच मिळते. यामुळे सेंद्रिय अन्नपदार्थाची सत्यता (Authenticity) पडताळण्यास मदत होते.

### ब) PGS INDIA प्रमाणित सेंद्रिय अन्नपदार्थ

सेंद्रिय अन्नपदार्थाचे उत्पादन करणाऱ्या अन्न व्यावसायिकाला भारत सरकारच्या कृषी मंत्रालय आणि शेतकरी विकास, मंत्रालयाच्या अखत्यारीतील कृषी सहकार विभागामार्फत एकत्रित सहभागी हमी यंत्रणा -भारत सरकार (Participatory Gurantee System - PGS INDIA )च्या विभागीय परिषद (regional councils) मार्फत लोकल ग्रुप नंबर किंवा ट्रांजेक्शन सर्टिफिकेट नंबर दिला जातो. लोकल ग्रुपला त्यांचा लोकल ग्रुप रजिस्ट्रेशन कोड (local group registration number) हा सेंद्रिय अन्नपदार्थाच्या लेबलवर छापणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक सेंद्रिय अन्नपदार्थाच्या लेबलवर एक व्हॅलिड युनिक आयडेंटिफिकेशन (UID) नंबर असतो, ज्या कोडच्या माध्यमातून Natioanl Centre For Organic Farming (NCOF) च्या संकेतस्थळावरून सेंद्रिय अन्नपदार्थाची सत्यता पडताळून पाहू शकतो.

सेंद्रिय अन्नपदार्थांच्या अधिक माहितीसाठी

१) https://jaivikbharat.fssai.gov.in
२) https://ncof.dacnet.nic.in
३) https://pgsindia-ncof.gov.in
४) http://apeda.gov.in/apedawebsite/organic

## अन्न व औषध प्रशासनामार्फत आवाहन

अन्न पदार्थांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनाचे कार्यालय कार्यरत आहे. या कार्यालयामार्फत सहायक आयुक्त व अन्नसुरक्षा अधिकारी हे नियमित तसेच ग्राहकांच्या तक्रारीच्या अनुषंगाने अन्नपदार्थांचे नमुने घेऊन आवश्यक कार्यवाही करतात.

**(सहायक आयुक्त (अन्न) तथा पदावधीत अधिकारी, पुणे, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य)**

आजच्या यांत्रिक आणि धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होणे ही एक सामान्य बाब बनली आहे. कामाचा ताण, प्रदूषण, मानसिक तणाव, अपुरी झोप आणि वेळेअभावी खाल्ला जाणारा असंतुलित आहार या सगळ्यांचा आपल्या शरीरावर आणि मनावर दीर्घकालीन परिणाम होतो. शरीराला आवश्यक असणारी जीवनसत्त्वे (Vitamins), खनिजे (Minerals), प्रथिने (Proteins) फायबर्स, अ‍ॅन्टी ऑक्सिडंटस आणि इतर पोषणतत्त्वे अशा परिस्थितीत कमी पडू लागतात. ही कमतरता भरून काढण्यासाठी अन्नपूरक (food Supplements) म्हणजेच पूरक आहार घटकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

# आरोग्यदायी अन्नपूरके

सायली टाव्हरे

अन्नपूरक हे गोळ्यांच्या, कॅप्सूल्स, पावडर किंवा द्रव स्वरूपात उपलब्ध असतात आणि विशिष्ट पोषणतत्त्वांची पूर्तता करतात. उदा. व्हिटॅमिन-डी, कॅल्शियम, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स, आयर्न, झिंक आणि प्रोबायोटिक्स हे काही महत्त्वाचे अन्नपूरक घटक आहेत.

## अन्नपूरकांची गरज कधी भासते?

आजच्या घाईगर्दीच्या जीवनशैलीमध्ये अनेकदा आपल्याला समतोल आहार घेणे शक्य होत नाही. त्यामुळे शरीराला आवश्यक असलेली पोषकतत्त्वे मिळत नाहीत आणि याच ठिकाणी अन्नपूरकांची गरज भासते. अन्नपूरक हे आहारातल्या कमतरतेची पूर्तता करणारे घटक असतात, जे शरीराच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. उदा. जीवनसत्त्व-डी, १२, लोह कॅल्शियम याची कमतरता.

- ***पोषणाची कमतरता असलेल्या वेळी :*** दैनंदिन आहारामधून शरीराला आवश्यक असलेले जीवनसत्त्वे (जसे की Vitamin), खनिजे (जसे की लोह, कॅल्शियम) किंवा इतर पोषक घटक पुरेसे प्रमाणात मिळत नसतील, तर अन्नपूरकांचा वापर केला जातो.
- ***गर्भधारणेच्या काळात :*** गरोदर स्त्रियांना काही विशिष्ट पोषकतत्त्वांची - विशेषतः आयर्न, फॉलिक ॲसिड, कॅल्शियम - अधिक गरज भासते. हे बाळाच्या योग्य वाढीसाठी आणि मातेच्या आरोग्यासाठी अत्यावश्यक असतात. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अन्नपूरक घेणे आवश्यक ठरते.
- ***वाढत्या वयात किंवा वृद्धापकाळात :*** वय जसजसे वाढते, तसतशी पचनशक्ती कमी होते आणि पोषकतत्त्वांचे शोषण कमी प्रमाणात होते. यामुळे शरीरात कमतरता निर्माण होते आणि आरोग्यावर त्याचा परिणाम होतो. अशा वेळेस अन्नपूरक उपयोगी पडतात.
- ***कठीण व्यायाम किंवा ॲथलेटिक प्रशिक्षण करताना :*** खेळाडू किंवा नियमित व्यायाम करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या शरीराची ऊर्जा आणि ताकद टिकवण्यासाठी जास्त प्रमाणात प्रथिनं, कार्बोहायड्रेट्स, इलेक्ट्रोलाइट्स यांची गरज असते. त्यासाठी अन्नपूरकांचे सेवन उपयुक्त ठरते.
- ***विशिष्ट रोगांमध्ये :*** काही आजारांमध्ये शरीर पोषकतत्त्वांचे योग्य शोषण करू शकत नाही. उदाहरणार्थ - ॲनिमिया, थायरॉईड विकार, हाडांचे आजार इत्यादी. अशा परिस्थितीत अन्नपूरक हे आवश्यक ठरतात, कारण ते शरीराची गरज भागवण्यास मदत करतात.
- ***शाकाहारी किंवा विशिष्ट आहार पद्धतीचे पालन करणाऱ्यांसाठी :*** जे लोक मांसाहार टाळतात किंवा Vegan (संपूर्ण वनस्पतीजन्य आहार) पद्धतीचा अवलंब करतात, त्यांना काही महत्त्वाचे पोषकतत्त्व - जसे की Vitamin B१२, ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स - आहारातून मिळणे कठीण जाते. त्यामुळे त्यांना अन्नपूरकांच्या स्वरूपात ही तत्त्वे घेणे आवश्यक असते.



## प्रमुख अन्नपूरक प्रकार

- **मल्टीव्हिटॅमिन्स -** विविध जीवनसत्त्वांची एकत्रित भर.
- **प्रोटीन पूरक -** स्नायू वाढवण्यासाठी कॅल्शियम व व्हिटॅमिन डी - हाडांचे आरोग्य टिकवण्यासाठी.

- **फिश ऑइल (ओमेगा-३) -** मेंदू आणि हृदयाच्या आरोग्यासाठी.
- **हर्बल पूरक -** तुलसी, अश्वगंधा, ब्राह्मी यांसारखे आयुर्वेदिक घटक.

## काळजी घेण्यासारख्या गोष्टी

- डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे, विशेषतः ज्या व्यक्तींना आधीपासूनच काही वैद्यकीय समस्या आहेत.
- योग्य प्रमाणातच अन्नपूरक घ्यावेत - अति प्रमाणात सेवन केल्यास काही दुष्परिणाम होऊ शकतात.
- हे कोणत्याही प्रकारचे औषध नाहीत; ते केवळ पोषणाची पूर्तता करणारे पूरक आहेत.
- संपूर्ण आहाराचा पर्याय म्हणून त्यांचा वापर करू नये.

## अन्नपूरक पदार्थांचे नियम व नियमन

आजच्या आधुनिक जीवनशैलीत अन्नपूरक (Food Supplements) पदार्थांचा वापर झपाट्याने वाढत आहे. पोषणाची पूर्तता, प्रतिकारशक्ती वाढवणे, आणि आरोग्य राखण्यासाठी ही उत्पादने उपयोगी ठरतात. मात्र यांचा योग्य वापर आणि दर्जा सुनिश्चित करण्यासाठी नियामक यंत्रणांचे अस्तित्व अत्यावश्यक आहे. भारतात यासाठी मुख्यत्वे FSSAI (Food Safety and Standards Authority of India) ही संस्था जबाबदार आहे.

## FSSAI काय आहे?

FSSAI ही भारत सरकारची एक स्वतंत्र संस्था आहे, जी खाद्यसुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे अन्नपदार्थांचे गुणवत्ता नियंत्रण आणि ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे.

FSSAI च्या अंमलबजावणींतर्गत अन्नपूरकांचे वर्गीकरण:

१. न्यूट्रास्युटिकल्स
२. डाएटरी सप्लिमेंट्स (Dietary Supplements)
३. फूड फॉर स्पेशल डाएटरी युजेस (FSDU)
४. फूड फॉर स्पेशल मेडिकल पर्पज (FSMP)
५. हर्बल किंवा बॉटॅनिकल सप्लिमेंट्स प्रोबायोटिक आणि प्रिबायोटिक अन्न अन्नपूरक उत्पादनांवरील नियमनाचे मुख्य मुद्दे.

## नोंदणी आणि परवाना

FSSAI अंतर्गत प्रत्येक अन्नपूरक उत्पादकाला वैध परवाना घेणे आवश्यक आहे. अन्न उत्पादक, वितरक, आयातदार किंवा किरकोळ विक्रेते हे सर्व या नियमांच्या अधीन असतात.

## लेबलिंगवर अनिवार्य असलेले घटक

FSSAI नुसार, अन्नपूरक पदार्थाच्या लेबलवर खालील गोष्टी नमूद करणे बंधनकारक आहे :-




**१. उत्पादनाचे नाव -** स्पष्टपणे अन्नपूरक असे नमूद करणे
**२. घटकांची यादी -** उत्पादनामध्ये वापरलेले सर्व घटक त्यांच्या प्रमाणासहित
**३. पोषणमूल्य माहिती (Nutritional Information) -** ऊर्जा (कॅलोरी), प्रथिने, चरबी, कार्बोहायड्रेट्स, जीवनसत्त्वे, खनिजे यांचे प्रमाण.
**४. नेट वजन / प्रमाण -** एकूण वजन किंवा प्रमाण (जसे की ५०० मि. ग्रॅ., १ लिटर इ.
**५. सेवन करण्याचा डोस आणि पद्धत -** किती प्रमाणात, कसे आणि किती वेळा घ्यावे.
**६. चेतावणी (Warnings) -** जसे की हे औषध नाही, डॉक्टरांच्या सल्ल्यानेच सेवन करावे, गर्भवती स्त्रिया किंवा आजारी व्यक्तींनी वैद्यकीय सल्ला घ्यावा इ.
**७. उत्पादन व समाप्ती तारीख (Mfg Exp Date)**
**८. FSSAI परवाना क्रमांक**
**९. निर्माता व पत्त्याची माहिती**
**१०. ॲलर्जन माहिती -** उत्पादनात असणारे संभाव्य ॲलर्जन घटक (जसे : दूध, सोया, शेंगदाणे इ.)

## गुणवत्ता आणि सुरक्षा मानके

उत्पादनामध्ये वापरण्यात आलेले सर्व घटक FSSAI च्या यादीत समाविष्ट असणे आवश्यक आहे.

अतिरिक्त प्रमाणातील वापर (Overdose) टाळण्यासाठी घटकांचे प्रमाण स्पष्टपणे नमूद करणे अनिवार्य आहे.

## वैज्ञानिक आधार व चाचण्या

विशिष्ट आरोग्यदाव्यांवर आधारित उत्पादने वैज्ञानिक संशोधनावर आधारित असावीत.

क्लिनिकल ट्रायल्स किंवा संशोधन डेटा असल्यास, ते उत्पादनास अधिक विश्वासार्ह बनवते.

अन्नपूरक हे आजच्या युगातील अपरिहार्य गरज बनली आहे, परंतु त्यांचा वापर अत्यंत जबाबदारीने आणि नियमानुसारच व्हावा. महाराष्ट्रात FSSAI ही संस्था अन्न सुरक्षा आणि मानकांचे योग्य प्रकारे पालन करून ग्राहकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपूरक उत्पादने मिळवून देण्याचे काम करत आहे. उपभोक्त्यांनीही अन्नपूरक वापरण्यापूर्वी त्यावरील माहिती काळजीपूर्वक वाचावी, प्रमाणित उत्पादनेच वापरावी आणि शक्य असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

**(लेखिका या पुणे येथे अन्नसुरक्षा अधिकारी अन्न व औषध प्रशासन पदावर कार्यरत आहेत.)**

**भारतीय अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरणाला (FSSAI) अन्नसुरक्षा मानके कायदा २००६ च्या कलम २२ अंतर्गत दिलेल्या तरतुदींनुसार सेंद्रिय अन्नाचे उत्पादन, वितरण, विक्री किंवा आयात करण्याचे नियमन करण्याचे अधिकार आहेत.**

# उदयोन्मुख सेंद्रिय बाजारपेठ

**योगेश देशमुख**

सेंद्रिय शेती ही भारतात प्राचीन काळापासून चालत आली आहे. तथापि, १९६० च्या दशकात हरितक्रांतीची सुरुवात झाली, शेतीमध्ये रासायनिक आणि तांत्रिक प्रगतीचा परिचय झाला. या क्रांतीमुळे उत्पादकता लक्षणीयरीत्या वाढली, ज्यामुळे भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्न उपलब्धतेचा धोका कमी झाला; परंतु यामुळे पर्यावरणीय ऱ्हास होऊन मातीचे आरोग्य बिघडणे, नवीन कीटक आणि रोगांचा प्रादुर्भाव, जमिनीस फायदेशीर असणाऱ्या सूक्ष्मजीवांचा नाश आणि अन्नसाखळीत हानिकारक रसायनांचा प्रवेश होण्यास सुरुवात झाली. या प्रतिकूल परिणामांना ओळखून, पर्यावरणास हानी न पोहोचवता शेती उत्पादन टिकवून ठेवू शकणाऱ्या पर्यायी शेती पद्धतीची आवश्यकता निर्माण झाली. जमीन, पाणी, जैवविविधता यांच्या संतुलित आणि विज्ञान आधारित व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करून सेंद्रिय शेती हा एक व्यवहार्य उपाय म्हणून उदयास आला.

## सेंद्रिय शेती विकासासाठी प्रयत्न

सेंद्रिय शेती क्षेत्राला पाठिंबा देऊन त्याच्या विकास करण्यासाठी भारत सरकारने काही महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. त्यामध्ये ऑक्टोबर १९८४ मध्ये वर्धा येथे असोसिएशन फॉर प्रोपॅगेशन ऑफ इंडिजिनस जेनेटिक रिसोर्सेसद्वारे (APIGR) आयोजित पहिल्या परिषदेने भारतातील सेंद्रिय शेती चळवळीला औपचारिक मान्यता मिळाली. अन्न आयातीसाठी युरोपियन देशांनी मानके कडक केल्याने कीटकनाशकांच्या रेशीड्यूसह अन्नपदार्थ कंटेनर परत येऊ




लागल्यामुळे भारत सरकारने निर्यात वाढवण्यासाठी सेंद्रिय शेतीला पाठिंबा देण्यास सुरुवात केली. २००१ मध्ये वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन कार्यक्रम (NPOP) सुरू झाला. २००४ मध्ये कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने सेंद्रिय शेतीवरील राष्ट्रीय प्रकल्प सुरू केला. ज्यामध्ये क्षमता बांधणी, प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक कार्यक्रमांद्वारे सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित केले. जैव-खते आणि जैव-कीटकनाशके यांसारख्या सेंद्रिय अदानांच्या विकासालादेखील पाठिंबा दिला आहे.

सुरुवातीला निर्यात-केंद्रित सेंद्रिय प्रमाणन योजना महागड्या व युरोपियन निरीक्षकांवर अवलंबून होत्या. कालांतराने मान्यताप्राप्त एजन्सींमधील भारतीय निरीक्षकांनी जबाबदारी घेतली. प्रमाणन प्रक्रिया सुलभ व खर्च कमी करण्यासाठी भारत सरकारने २०११ मध्ये सहभागी हमी प्रणाली (PGS) सुरू केली. २०१५ मध्ये भारत सरकारने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी परंपरागत कृषी विकास योजना (PKVY) आणि ईशान्येकडील प्रदेशासाठी मिशन सेंद्रिय मूल्यसाखळी विकास (MOVCDNER) या दोन प्रमुख योजना सुरू केल्या.

भारतीय अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरणाला (FSSAI) अन्नसुरक्षा मानके कायदा २००६ च्या कलम २२ अंतर्गत तरतुदींनुसार सेंद्रिय अन्नाचे उत्पादन, वितरण, विक्री किंवा आयात करण्याचे नियमन करण्याचे अधिकार आहेत. सेंद्रिय अन्न हे कायद्याच्या तरतुदींनुसार अधिसूचित केलेल्या अन्नसुरक्षा आणि मानके (सेंद्रिय अन्न) नियमन २०१७ द्वारे नियंत्रित केले जातात. ग्राहकांना सेंद्रिय अन्न ओळखण्यास मदत करण्यासाठी FSSAI ने जैविक भारत लोगो सादर केला आहे. या उपक्रमाचा उद्देश सेंद्रिय उत्पादनांसाठी एकीकृत लोगो प्रदान करणे, ग्राहक जागरूकता आणि आत्मविश्वास वाढवणे हा होता. भारतातील सर्व सेंद्रिय अन्न उत्पादने स्थापित मानकांचे पालन करतात, याचीदेखील खात्री करण्यात येते. भारताच्या सेंद्रिय निर्यात क्षेत्राला चालना देण्यासाठी कृषी उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाने (APEDA) समर्पित सेंद्रिय प्रोत्साहन विभाग तयार केला आहे. हा विभाग देशाची सेंद्रिय निर्यात क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नांचे समन्वय साधण्यासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करत आहे.

## सेंद्रिय शेतीचे क्षेत्र व बाजारपेठ

कोविड-१९ साथीच्या आजारानंतर

जागतिक आणि देशांतर्गत ग्राहकांकडून सेंद्रिय अन्नाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी शेतकरी मोठ्या संख्येने सेंद्रिय शेतीकडे वळले आहेत.

भारतीय देशांतर्गत सेंद्रिय बाजारपेठेचे विविध श्रेणींमध्ये वर्गीकरण केले जाऊ शकते. ज्यामध्ये धान्ये आणि बाजरी, डाळी, मसाले, खाद्यतेल, स्वीटनर, चहा, कॉफी, दुग्धजन्य पदार्थ, फळे आणि भाज्या, प्रक्रिया केलेले अन्न आणि औषधी वनस्पती उत्पादने यांचा समावेश आहे. बेंगळुरू, चेन्नई आणि हैदराबाद यांसारखी महानगरे या भागात सेंद्रिय अन्नाची मागणी असलेल्या प्रमुख शहरांचा देशातील बाजारपेठेत सुमारे ३५% वाटा असून उत्तरेकडील प्रदेशांचा बाजारपेठेतील वाटा ३०% आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने दिल्ली आणि गुरुग्रामसारखी शहरे आहेत. पश्चिम प्रदेश तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने घरगुती सेंद्रिय अन्न उत्पादन बाजारातील महसुलात २५% योगदान दिले आहे. मुंबई, पुणे आणि अहमदाबाद यांसारख्या शहरांमधून लक्षणीय मागणी आहे. सेंद्रिय उत्पादनाची बहुतेक खरेदी किराणा दुकानात केली जात असे, ज्याचे कारण वस्तूची पोहोच, सेवा शुल्काचा खर्च; तसेच फळे आणि भाज्यांचा ताजेपणा यांसारख्या घटकांवर अवलंबून असते. सद्य:स्थितीत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तसेच ई-कॉमर्स उद्योगाच्या विस्ताराने ऑनलाइन किराणा बाजाराला लक्षणीयरीत्या चालना दिली आहे. सेंद्रिय उत्पादनांच्या वाढत्या मागणीमुळे अनेक ई-कॉमर्स कंपन्यांनी थेट शेतकरी/एफपीओकडून साहित्य खरेदी करण्यास सुरुवात केल्याने त्यांची उलाढाल आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट यांसारख्या ई-कॉमर्स कंपन्यांनी त्यांच्या उत्पादन श्रेणींमध्ये एक स्वतंत्र 'ऑरगॅनिक स्टोअर' श्रेणी सुरू केली आहे.

## सेंद्रिय अन्न पदार्थांसाठी तरतुदी

अन्नसुरक्षा आणि मानके (सेंद्रिय अन्न) नियम २०१७ या नियमांतील तरतुदींचे पालन केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही सेंद्रिय अन्नाचे उत्पादन, पॅकिंग, विक्री, मार्केटिंग, वितरण किंवा आयात करता येणार नाही. विक्रीसाठी ठेवलेले किंवा जाहिरात केलेले सेंद्रिय अन्न उत्पादनास राष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन कार्यक्रम (एनपीओपी), सहभागी हमी प्रणाली (पीजीएस-इंडिया) किंवा अन्न प्राधिकरणाने वेळोवेळी सूचित केलेली इतर कोणतीही प्रणाली किंवा मानके यापैकी कोणत्याही एका प्रणालीच्या सर्व लागू असलेल्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे.

## आव्हाने

सेंद्रिय उत्पादनांची हाताळणी करताना अन्नपदार्थ खराब होणे, अन्नपदार्थांमध्ये कृत्रिम संरक्षकांचा मर्यादित वापर आणि कठोर प्रमाणन प्रक्रियांमुळे काही आव्हाने निर्माण होतात. सध्या सेंद्रिय उत्पादने प्रामुख्याने सामाजातील उच्च उत्पन्न असलेल्या लोकांकडून वापरली जातात. कारण सेंद्रिय उत्पादनांसाठी प्रीमियम किंमत देण्याची त्यांची क्षमता असते, तर सेंद्रिय उत्पादन विकणारे अनेक शेतकरी पारंपरिक बाजारपेठेत प्रीमियम किंमत मिळवण्यासाठी संघर्ष करतात. तसेच अन्न पदार्थांच्या लेबल्सवर असलेला विविध मजकूर (जसे की कीटकनाशकमुक्त, नैसर्गिकरीत्या पिकवलेले आणि नैसर्गिक इ.) यामुळे ग्राहकांमध्ये अन्न पदार्थांच्या गुणवत्तेबाबत संभ्रम निर्माण होतो. ज्यामुळे त्यांच्या विश्वासावर परिणाम होतो. ग्राहकांना खरे सेंद्रिय उत्पादन ओळखण्यात आव्हानांचा सामना करावा लागत आहे. प्रमाणित सेंद्रिय अन्न उत्पादनांच्या पॅकेजेसवर लोगो आणि ट्रेसेबिलिटी सिस्टम्स असले तरी, प्रमाणित उत्पादनांमधील आणि इतर उत्पादनांमधील फरकांबद्दल ग्राहकांमध्ये जागरूकता वाढवणे आवश्यक आहे.



## उपाय

अधिकाधिक शेतकऱ्यांना सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यात आणि बाजारपेठेतील मागणी पूर्ण करण्यासाठी त्यांचे उत्पादन एकत्रित करण्यात शेतकरी उत्पादक संस्थांनी (FPO) महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच शेतकरी स्वयंसहायता गट ही सेंद्रिय उत्पादने नाममात्र दराने वितरित करू शकतात. ज्यामुळे ती निम्न-मध्यमवर्गीय ग्राहकांसाठी उपलब्ध होतील, जे निर्भेळ आणि सुरक्षित अन्न सेवन करू इच्छितात. अन्नसुरक्षा नियमन मजबूत करण्यासाठी ट्रेसेबिलिटी संदर्भात आयटी आधारित माहिती विश्लेषण लागू करणे आवश्यक आहे. सेंद्रिय प्रमाणन हे उत्पादन प्रमाण नसून प्रक्रिया प्रमाणपत्र आहे. त्यामुळे सेंद्रिय उत्पादन चाचणी होण्यासाठी देशभरात जसे अन्नचाचणी पायाभूत सुविधांचा विशेषतः खासगी प्रयोगशाळांचा विस्तार होत आहे. ज्यामुळे ग्राहकांना मिळणारे अन्नपदार्थ निर्भेळ व सुरक्षित असल्याची खात्री होते. अन्नपदार्थ सेंद्रिय असण्याबाबत APEDA, FSSAI व NPOP या संस्थांच्या संकेतस्थळावर जाऊन खात्री करता येते. याबाबत ग्राहकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक असून ग्राहकांची होणारी फसवणूक टाळता येऊ शकेल.

पारंपरिक शेतीच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल जागतिक स्तरावर वाढती जागरूकता, शहरीकरण, ग्राहकांच्या पसंतींमध्ये बदल, किरकोळ विक्रीचा विस्तार, अन्नसुरक्षेच्या वाढत्या चिंता, आरोग्याबाबत ग्राहकांमध्ये वाढती जागरूकता आणि हानिकारक रसायनमुक्त उत्पादन आणि शाश्वत शेती पद्धतींना मिळणारी पसंती, यामुळे भारतात सेंद्रिय अन्न पदार्थांच्या बाजारपेठेच्या वाढीला चालना मिळून या क्षेत्राची वाढ बळकट होत आहे. जे निरोगी जीवनशैली आणि शाश्वत अन्न पदार्थांची वाढती मागणी अधोरेखित करते.

(लेखक हे अन्न सुरक्षा अधिकारी आहेत.)

*अन्न हे पूर्ण ब्रह्म!* **ताटात वाढलेले अन्न संपवावे किंवा जेवढे आवश्यक असेल, तेवढेच अन्न वाढून घ्यावे, असे वडीलधारी माणसे सतत आपल्याला सांगत असतात, ते अगदी खरे आहे. ग्लोबल हंगर इंडेक्स २०२४ नुसार १२७ देशांच्या यादीत भारताचे स्थान १०५ वे आहे आणि हा खूप महत्त्वाचा विषय आहे.**

# अन्नसंजीवनी!

**मिलिंद महांगडे**

आज भारतात अन्नाची कमतरता आणि अन्नाचा अपव्यय या दोन्ही समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. एका बाजूला कोट्यवधी लोकांना दोन वेळचे पुरेसे अन्न मिळत नाही, तर दुसरीकडे लग्न समारंभात, पार्ट्या, हॉटेल्समध्ये मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. कित्येक वेळा अशा समारंभांच्या बाहेर जिथे अन्न टाकून दिले जाते, तिथे आजूबाजूची गरीब मुले अन्नाच्या शोधात उष्टे अन्न खाण्यास येत असतात, हे दृश्य अतिशय विदारक आहे. ही विसंगती लक्षात घेऊन भारतीय अन्नसुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) ने अन्न अपव्यय, पुनर्प्राप्ती आणि वितरण नियमन २०१९ लागू केले. या नियमनाचा उद्देश सुरक्षित आणि शिजवलेले, उरलेले अन्न गरजूंपर्यंत पोहोचवणे आणि अन्नाचा अपव्यय कमी करणे असा आहे.

भारतात दरवर्षी अंदाजे ६.७ कोटी टन अन्न वाया जाते. ज्यामुळे केवळ आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय सामाजिक आणि नैतिक प्रश्नही निर्माण होतात. आंतरराष्ट्रीय अहवालानुसार भारतात सुमारे २० कोटी लोक अन्नाच्या अभावाने त्रस्त आहेत. अशा परिस्थितीत उपलब्ध अन्नाचा योग्य वापर होणे गरजेचे आहे. लग्न समारंभ, पार्टी हॉल्स, हॉटेल्स, मोठ्या केटरिंग सेवा येथे दररोज मोठ्या प्रमाणात अन्न बनते आणि त्यातील काही अन्न उरते. या उरलेल्या अन्नाचा योग्य प्रकारे पुनर्वापर करून गरजू लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे.

## नियमनाचे मुख्य घटक

**१. *दानासाठी अन्नाची गुणवत्ता*** : दानासाठी वापरले जाणारे अन्न सुरक्षित असावे. त्यात कोणत्याही प्रकारचा अपायकारक घटक नसावा.

अन्नाच्या वास, चव किंवा रंगात कोणताही बदल झालेला नसावा. तसेच एक्सपायरी डेट ओलांडलेले अन्न देऊ नये.

**२. *दान संस्था आणि त्यांचे कर्तव्य*** : अन्न जमा करणाऱ्या आणि वितरण करणाऱ्या संस्थांनी (Food Recovery Organizations) खालील नियम पाळणे आवश्यक आहे.

अन्न स्वच्छतेच्या सर्व निकषांनुसार साठवले आणि वितरित केले पाहिजे. योग्य तापमानात अन्न साठवावे, अन्न खराब होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच वितरणाच्या वेळी वाहने स्वच्छ असावी आणि अन्नसुरक्षेचे नियम पाळलेले असावेत.

**३. *दान करणाऱ्यांची जबाबदारी*** : अन्न दान करणाऱ्या हॉटेल्स, केटरिंग सर्व्हिसेस इत्यादी यांनी खात्री करावी की, अन्न योग्य प्रकारे साठवले आहे. दान करताना अन्नाची माहिती योग्यरीत्या द्यावी, जसे की बनवलेली तारीख, वापरण्याची अंतिम तारीख वगैरे.

**४. *नोंदणी आणि परवाने*** : अन्न पुनर्प्राप्ती संस्था आणि अन्न दान करणाऱ्या युनिट्सना FSSAI मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना FSSAI चा परवाना किंवा नोंदणी प्रमाणपत्र घ्यावे लागते.

**५. *नियम तोडल्यास कारवाई*** : जर कोणत्याही संस्थेने अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केले, तर त्यांच्यावर अन्नसुरक्षा मानदे कायद्याखाली दंडात्मक कारवाई होऊ शकते.

हे नियमन जरी असले तरी अन्न अपव्यय टाळून त्याची पुनर्प्राप्ती व वितरणात अनेक अडचणी आहेत. जसे की,

**अ) वाहतूक आणि साठवणूक व्यवस्था** - सर्व ठिकाणी योग्य प्रकारची कोल्ड स्टोरेज आणि वाहतूक व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे अन्न खराब होण्याचा धोका वाढतो.

**ब) सहकार्याची कमतरता** - काही वेळा हॉटेल्स, मोठ्या आयोजनकर्त्यांमध्ये दान करण्याची इच्छाशक्ती कमी असते.

**क) तांत्रिक अडचणी** - दान केलेल्या अन्नाचे ट्रॅकिंग, सुरक्षित वितरण यासाठी तांत्रिक साधने (जसे की मोबाइल ॲप्स, पोर्टल्स) सर्वत्र उपलब्ध नाहीत.

**ड) जागरूकतेचा अभाव** - सामान्य लोकांना आणि छोट्या व्यावसायिकांना या नियमांची पूर्ण माहिती नाही. त्यामुळे अन्नदानाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे वाढलेले नाही.

## अन्नदानाचे फायदे

- **सामाजिक फायदे** : उपासमारीवर प्रभावी नियंत्रण प्राप्त होऊ शकते. गरजू लोकांना गरजेनुसार अन्न मिळवून देता येऊ शकते आणि त्यातून सामाजिक समानता वाढीस लागते.
- **आर्थिक फायदे** : अन्न अपव्ययामुळे होणारे आर्थिक नुकसान कमी होते. संसाधनांचा योग्य वापर होतो.
- **पर्यावरणीय फायदे** : अन्नदान केल्यामुळे नैसर्गिक संसाधनांचे रक्षण होण्यास मदत होते. या बाबतीत काही सामाजिक संघटना काम करतात, काही एनजीओ जसे की, रॉबिन हूड आर्मी, रोटी बँक यांनी या नियमांचा आधार घेत गरिबांसाठी दररोज लाखो भोजनाचे वाटप केले आहे.

काही शहरांमध्ये 'फूड बँक' तयार करून उरलेले अन्न नियोजनबद्ध पद्धतीने संकलित व वितरित केले जाते.

अन्न अपव्यय, पुनर्प्राप्ती आणि वितरण नियमन २०१९ हा एक अतिशय महत्त्वाचा आणि आवश्यक निर्णय आहे. योग्य नियोजन केले, तर आपण गरजूंची भूक भागवू शकतो आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतो. प्रत्येक व्यक्ती, संस्था, हॉटेल, कॅटरिंग सेवा यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. अन्न हे फक्त संसाधन नाही, तर ते जीवन आहे. जीवन वाचवण्यासाठी अन्नदान हे एक प्रभावी साधन आहे.

'तहानलेल्याला पाणी देणे आणि भुकेल्याला अन्न देणे' ही तर भारतीयांची संस्कृती आहे. त्या संस्कृतीला जपणे व वृद्धिंगत करणे अत्यंत गरजेचे आहे !

(लेखक हे रायगड येथे सहायक आयुक्त (अन्न), परिमंडळ-२ या पदावर कार्यरत आहेत.)

**भविष्यात सर्जनशील अर्थव्यवस्थेचा भारत कणा असणार याची खात्री पटली. या मनोरंजन विश्वाच्या मुंबईवारीत भारताच्या सांस्कृतिक सत्तेची बीजे रोवली गेली. यातून भारत जगाला फक्त कुशलच नाही, तर सर्जनशील शक्ती देईल. चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके यांनी महाराष्ट्राच्या मातीत मनोरंजनविश्वाचा पाया रचला, त्याच मराठी मातीत आपल्या मायभूमीत मनोरंजन क्षेत्राला गवसणी घालणारी 'वेव्हज् २०२५' परिषद संपन्न झाली याचा आनंद आहे.**


# मनोरंजनविश्वाची मुंबईवारी सर्जननिष्ठांची मांदियाळी

**सागरकुमार कांबळे**

भारताचे आणि सृजनाचे अतूट नाते आहे. आपल्याला अनेक वर्षांचा सर्जनाचा वारसा लाभला आहे. भारतीय परंपरेत कला आणि साहित्याची निर्मिती प्राचीन आहे. कला, संगीत, नृत्य, लोकसाहित्य, विज्ञान, लोककला, चित्रकला, दृक्श्राव्य माध्यमे, स्थापत्यकला या सर्व घटकांनी सर्जनशीलतेला वाव दिला. ज्यामुळे भारतीय कला आणि साहित्याची ओळख जगभर झाली; परंतु आता या सगळ्या परंपरेला आधुनिकतेची, व्यावसायिकतेची जोड देण्याबाबत जागतिक पातळीवर विचारमंथन सुरू आहे. हे सांगण्याचे कारण म्हणजे १ ते ४ मे २०२५ या कालावधीत बीकेसी मुंबई येथे 'वेव्हज् २०२५' ही भव्य आंतरराष्ट्रीय परिषद झाली. या परिषदेच्या माध्यमातून दृक्श्राव्य मनोरंजन क्षेत्राचे जागतिक पातळीवर भारत नेतृत्व करणार हे नक्की झाले. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटेल अशी ही संधी आहे. यानिमित्ताने सर्जननिष्ठांची मांदियाळी मुंबईत अवतरली होती. या मांदियाळीच्या साक्षीने भारत आशयनिर्मितीचा दाता होण्याच्या वाटा मोकळ्या झाल्या. शिवाय भविष्यात सर्जनशील अर्थव्यवस्थेचा भारत कणा असणार याची खात्री पटली. या मनोरंजनविश्वाच्या मुंबईवारीत भारताच्या सांस्कृतिक सत्तेची बीजे रोवली गेली. यातून भारत जगाला फक्त कुशलच नाही, तर सर्जनशील शक्ती देईल. चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके यांनी महाराष्ट्राच्या मातीत मनोरंजनविश्वाचा पाया रचला, त्याच मराठी मातीत आपल्या मायभूमीत मनोरंजनक्षेत्राला गवसणी घालणारी 'वेव्हज् २०२५' परिषद संपन्न झाली याचा आनंद आहे.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पुढाकाराने WAVES २०२५ (World Audio Visual Entertainment




Summit) ही परिषद जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे १ ते ४ मे दरम्यान झाली. या परिषदेमुळे 'क्रिएट इन इंडिया' हा दृष्टिकोन रुजला. 'वेव्हज् २०२५' हा क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट क्षेत्रातील जगातील सर्वात मोठा होता. जागतिक दर्जाच्या या परिषद आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला. यामुळे जगातील 'क्रिएटिव्ह एंटरटेनमेंट' क्षेत्र मुंबईकडे आकर्षित झाले. जगाला भारताची नवी ओळख करून देण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी संकल्पना आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी या परिषदेच्या आयोजनाचा मान महाराष्ट्राला मिळाला, असेच म्हणावे लागेल. करमणूक क्षेत्राची अर्थव्यवस्था अतिशय जलदगतीने विकसित होत आहे. यात भारतानेदेखील अग्रेसर असले पाहिजे ही भूमिका आहे. ही परिषद दरवर्षी मुंबईत होणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाचे सहकार्य आहे.

वेव्हज् अर्थात जागतिक दृक्श्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषदेला प्रदर्शक, उद्योग धुरीण, स्टार्टअप्स, धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि सामान्य जनतेकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला. वेव्हज् हे केवळ एक संक्षिप्त नाव नाही, तर संस्कृती, सर्जनशीलता आणि सार्वत्रिक नातेसंबंधांची ही एक लाट आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात केले. भारत चित्रपट निर्मिती, डिजिटल आशय, गेमिंग, फॅशन, संगीत आणि लाईव्ह कॉन्सर्टसाठी जागतिक केंद्र म्हणून उदयाला येत आहे. वेव्हज्

म्हणजे भारताच्या केशरी अर्थव्यवस्थेची पहाट आहे. या सर्जनशील लाटेवर स्वार होण्याचे आणि भारताला जागतिक सर्जनशील निर्मिती केंद्र बनवण्याचे आवाहन प्रधानमंत्री यांनी युवा वर्गाला केले.

'वेव्हज्'मध्ये एआर लेन्स डिझाईन करणे, एआय अवतार तयार करणे आणि उत्पादकक्षम कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने गेम विकसित करण्याबाबत माहिती दिली. 'वेव्हज्'मध्ये ५५ विभागीय चर्चासत्रे होती. या चर्चासत्रांच्या माध्यमातून प्रसारण, डिजिटल मीडिया, ओटीटी, एआय, संगीत, बातम्या, लाईव्ह कार्यक्रम, ॲनिमेशन, गेमिंग, आभासी निर्मिती, चित्रकथा आणि चित्रपट निर्मिती यांसारख्या विशेष संकल्पनेवर सखोल चर्चा करण्यात आली. या सत्रांमध्ये मेटा, गुगल, मनोरंजन स्टार्ट-अप्स्ची निवड केली. एक हजाराहून अधिक नोंदणींसह, या उपक्रमामुळे सध्या सुरू असलेल्या ५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. याशिवाय, १०० पेक्षा अधिक स्टार्ट-अप्स्नी समर्पित स्टार्ट-अप पॅव्हेलियनमध्ये संभाव्य गुंतवणूकदारांना त्यांच्या संकल्पना आणि उत्पादने प्रदर्शित केली. क्रिएट इन इंडिया चॅलेंजने (सीआयसी) ॲनिमेशन, एक्सआर, गेमिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता, चित्रपट निर्मिती, डिजिटल संगीत आणि इतर क्षेत्रातील निर्मात्यांना एकत्र आणले होते.

वेव्हज्चा एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या आठव्या राष्ट्रीय सामुदायिक नभोवाणी संमेलनात केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी देशभरातील १२ उत्कृष्ट




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वेव्हज् २०२५ परिषदेत 'लोकराज्य' विशेषांकाचे प्रकाशन संपन्न झाले. यावेळी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव विकास खारगे आदी मान्यवर उपस्थित होते.**

ॲमेझॉन, एक्स, स्नॅप, स्पॉटीफाय, डीएनईजी, नेटफ्लिक्स आणि एनव्हीआयडीएआय यांसारख्या आघाडीच्या कंपन्यांमधील वरिष्ठ व्यावसायिकांसह फिक्की, सीआयआय आणि आयएमआयसारख्या उद्योग संस्थांचे प्रतिनिधी एकत्र आले. या परिषदेत जागतिक माध्यम संवाद २०२५ मध्ये सदस्य राष्ट्रांनी 'वेव्हज् जाहीरनामा' स्वीकारला. 'जागतिक माध्यम संवाद २०२५' हा एक ऐतिहासिक कार्यक्रम होता. वेव्हज् स्टार्ट-अप प्रवेगकांनी ४५ प्रमुख एंजेल गुंतवणूकदारांपैकी लुमिकाई, जिओ, कॅबिल, वॉर्मअप व्हेंचर्ससारख्या मोठ्या गुंतवणूकदारांना त्यांच्या अद्वितीय कल्पना थेट मांडण्यासाठी ३० माध्यम आणि सामुदायिक नभोवाणी केंद्रांना 'राष्ट्रीय सामुदायिक नभोवाणी पुरस्कार' देऊन गौरवले. माहिती आणि प्रसारण मंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांनी आशय-सामग्री निर्मितीवर असलेल्या तंत्रज्ञानाच्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश टाकला आणि स्थानिक आशय-सामग्री, सह-निर्मिती करार आणि संयुक्त निधी उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

### सर्जनशील महासत्ता म्हणून जगाचे नेतृत्व करण्यास भारत सज्ज : मुख्यमंत्री

भारत आता सर्जनशील महासत्ता म्हणून जगाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली वेव्हज् परिषद ही एक चळवळ आहे. राज्य शासन या परिवर्तनाला पोषक वातावरण तयार करत असून यासाठी सक्षम धोरण राबवणार आहे. मुंबईचे महत्त्व जागतिक पातळीवर वाढणार आहे, असे उद्घाटनाप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र सरकारने वेव्हज्मध्ये आठ हजार कोटी रुपयांचे सामंजस्य करार करून शिखर परिषदेत व्यावसायिक मूल्य वाढवले आहे. यॉर्क विद्यापीठ आणि वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठासोबत प्रत्येकी १,५०० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले, तर राज्याच्या उद्योग विभागाने प्राइम फोकस आणि गोदरेजसोबत अनुक्रमे ३,००० कोटी रुपयांचे आणि २,००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. 'एनएसई इंडायसेस लिमिटेड'ने मुंबईत आयोजित वेव्हज् २०२५ या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हर्च्युअल बेल वाजवून 'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'चा शुभारंभ केला. 'निफ्टी वेव्हज् इंडेक्स'च्या माध्यमातून या कंपन्यांमध्ये जगभरातील गुंतवणूक होईल. निफ्टी वेव्हज् इंडेक्समध्ये मीडिया, मनोरंजन आणि गेमिंग क्षेत्रातील ४३ सूचीबद्ध कंपन्या समाविष्ट आहेत. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगातील दोन सर्वोत्तम विद्यापीठांसोबत सामंजस्य करार होत आहे. नवी मुंबईत सुरू होत असलेल्या 'एज्यू सिटी'मध्ये जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठे एकाच ठिकाणी येतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले असून त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांत शिकण्याचे येथील युवकांचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे. आपल्याला सर्वोत्तम होण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायचे आहे.

जगातील सर्जनशील मान्यवर, धोरणकर्ते, उद्योग नेते, तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज, स्टार्टअप्स् आणि देशभरातील तरुण कलाकार, लेखक, ॲनिमेटर्स, गेम डेव्हलपर्स आणि संगीतकारांचा सहभाग हे 'वेव्हज् २०२५' परिषदेचे वैशिष्ट्य ठरले. सध्या कंटेंट चोरी किंवा पायरेसी समस्या आहे. या समस्येवर मात करण्यासाठी फिंगरप्रिंटिंग, वॉटरमार्किंग, एआय-आधारित ट्रॅकिंग तंत्रज्ञान यावरदेखील वेव्हज् परिषदेत विचारविनिमय झाला. या परिषदेच्या





निमित्ताने ‘वेव्हज् बाजार’ ही अभिनव संकल्पना सत्यात आणली. चित्रपट, दूरचित्रवाणी, ॲनिमेशन, गेमिंग, जाहिरात, एक्सआर, संगीत, ध्वनी संयोजन, रेडिओ यासह अनेक माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रातील हितधारकांना एकत्र आणणारी ‘वेव्हज् बाजार’ ही एक अनोखी ई-बाजारपेठ आहे. उद्योग व्यावसायिक त्यांचे कौशल्य सहजपणे प्रदर्शित करू शकतील, संभाव्य ग्राहकांशी जोडले जाऊ शकतील आणि अर्थपूर्ण सहकार्य मिळवू शकतील याची खात्री करून हा मंच खरेदीदार आणि विक्रेत्यांमधील दुवा म्हणून काम करतो. यामुळे मनोरंजन क्षेत्राला बळकटी मिळाली आहे. भारत जगाची मनोरंजनाची भूक भागवू शकतो, ही क्षमता ओळखून आपण तयारी देखील सुरू केली आहे. केंद्रीय माहिती व प्रसारण विभागाची मालाडला २४० एकर जागा आहे. या जागेवर जागतिक दर्जाच्या एंटरटेनमेंट हबची व्यवस्था उभी करण्यात येणार आहे. त्यामुळे जगातील करमणूक क्षेत्रातील नामवंत मुंबईकडे आकर्षित होतील. त्याचबरोबर आयआयसीटी म्हणजे इंडियन इंस्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी नावाची संस्था केंद्र सरकारने मुंबईत उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठीदेखील राज्य शासनाचे सहकार्य असणार आहे. ही महत्त्वाची संस्था मुंबईत होणार असल्याने या क्षेत्रात मुंबई जगाच्या एक पाऊल पुढे राहणार आहे. खरेतर येत्या काळात मुंबई ही मनोरंजन क्षेत्राची जागतिक राजधानी असेल. मुंबई मनोरंजन उद्योगाचे मोठे केंद्र आहे. मात्र, आयआयसीटी या नव्या संस्थेमुळे भारताच्या सर्जनशील उद्योगास जागतिक दर्जाचे व्यासपीठ मिळणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून मुंबईला जागतिक ‘क्रिएटिव्ह हब’ करण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश आहे. हा प्रकल्प केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता, त्याचा लौकिक जगभरात होणार आहे. आयआयसीटीमुळे क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी उद्योगाला नवी दिशा मिळणार आहे. ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी’ही संस्था केवळ चित्रपट निर्मितीपुरती मर्यादित न राहता, डिजिटल कंटेंट, व्हीएफएक्स, ॲनिमेशन, ऑडिओ - व्हिज्युअल स्टोरी टेलिंग, मीडिया इनोव्हेशन आणि वेब ३.० तंत्रज्ञान अशा क्षेत्रांतील संशोधन व प्रशिक्षणात कार्यरत असेल. यासाठी महाराष्ट्र शासनाने गोरेगाव येथील फिल्मसिटी येथे जागा निश्चित केली आहे. मालाड येथे भव्य क्रिएटिव्ह स्पेसचा विकास केला जाईल. या योजनेत केंद्र आणि राज्य शासन एकत्र येऊन को-क्रिएशन मॉडेलद्वारे काम करणार आहे. पोस्ट प्रॉडक्शन, स्टुडिओज, फिल्म टेक्नोलॉजी, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्ससारख्या आधुनिक सेवा आणि अभ्यासाचे वर्ल्ड क्लास सेंटर येथे उभारले जाणार आहे. या प्रकल्पांमुळे मुंबईचे स्थान केवळ देशातच नव्हे, तर जगात एंटरटेनमेंट इंडस्ट्रीतील प्रमुख केंद्र म्हणून बळकट होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

भारताने जगाला योग, आयुर्वेद, ध्यान, अध्यात्म दिले. जगाला अन्नधान्याचा पुरवठा करणारा आपला देश आहे. त्यामुळे जगाचा पोशिंदादेखील आपल्याला म्हटले जाते. जागतिकीकरणानंतर कुशल मनुष्यबळ भारताने जगाला पुरविले. आता जगाला सर्जनशील ताकद देणारा देश म्हणून भारताची नवी ओळख निर्माण होईल. या निमित्ताने मुंबई जगाची मनोरंजनाची राजधानी म्हणून नावारूपाला येईल, हा महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा असून याचा प्रत्येकाला अभिमान वाटेल. सर्जन क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. जागतिक पातळीवर सिद्ध होण्याची संधी सर्जनशील युवांना होईल. त्यामुळे थोडक्यात या ‘वेव्हज् २०२५’ परिषदेचे महत्त्व अधोरेखित करायचे असेल, तर *सर्जननिष्ठांची मांदियाळी-मनोरंजनविश्वाची मुंबईवारी ‘वेव्हज् २०२५’ सर्जनांची पंढरी* असेच म्हणावे लागेल.

(सहायक संचालक (मा.), मावज, मंत्रालय, मुंबई.)

**पहिल्या टप्प्यात दिलेले उद्दिष्ट १०० दिवसांत पूर्ण करण्यात महिला व बालविकास विभाग अव्वल ठरला आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ, राज्य बालहक्क संरक्षण, राज्य महिला आयोग, एकात्मिक बालविकास सेवा योजना, मिशन शक्ती, लेक माझी लाडकी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण अशा महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि संरक्षणासाठीच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे काम महिला व बालविकास विभाग करत आहे.**

# 'महिला व बालविकास'ची सुप्रशासनात आघाडी

**श्रद्धा मेश्राम**

महिला व बालकांच्या विकासाला चालना देऊन त्यांना शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य आणि सामाजिकरीत्या सुरक्षिततेची भावना निर्माण करून त्यांना पाठबळ देऊन सर्वांगीण विकासासाठी महिला व बालविकास विभागामार्फत विविध लोकोपयोगी योजना राबवल्या जातात. त्या योजनांची माहिती आणि लाभ पात्र महिला व बालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यस्तरीय ते तालुकास्तरावरील कार्यालय आणि अंगणवाडी व आशासेविकांपर्यंत सर्व अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने कार्यरत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून शासन-प्रशासन व नागरिकांमधील विश्वास वृद्धिंगत होण्यासाठी राबवलेल्या १०० दिवसांच्या कार्यालयीन मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात महिला व बालविकास विभागाने सर्वोत्तम कामगिरी केल्याने प्रशासकीय गुणांकनात उत्तुंग भरारी घेत सर्वोत्तम मंत्रालयीन विभाग ठरला आहे.

या उपक्रमात महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाने राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्यासह एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, आयुक्त नयना गुंडे, जिल्हा प्रशासन आणि महिला व बालविकास विभागाचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या योगदानाने उद्दिष्ट गाठले आहे. भारतीय गुणवत्ता परिषदेमार्फत वेबसाईट कार्यक्षमता, कार्यालयीन सोयी-सुविधा, तक्रार निवारण व्यवस्था, गुंतवणूक अनुकूलता, नागरिकांसाठी सेवा सुलभता, तंत्रज्ञान वापर अशा दहा निकषांवर आधारित मूल्यमापन करून विभागाने ८० टक्के गुण प्राप्त केले आहेत.

पहिल्यांदाच विविध विभागाला १०० दिवसांचे कार्यालयीन सुधारणा मोहीम आणि शासन लोकाभिमुख करण्यासाठी राबवलेला हा उपक्रम आपल्या शासनाची दिशा ठरवणारा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. लोकाभिमुखता, कामकाजात सुलभता आणि उत्तरदायित्व (अकाऊंटेबिलिटी) या तीन आधारांवर प्रशासनात पुढे जाणे अत्यावश्यक असल्याने हा उपक्रम राबवण्यात आला. राज्यातील १२,५०० कार्यालयांना सुधारणा करण्याची संधी देण्यात आली होती.

तसेच शासकीय योजना नागरिकांपर्यंत विविध माध्यमातून पोहोचविणे, यासाठी पारदर्शक कारभार आणि गतिमान पद्धतीने कार्यवाही करत १०० दिवसांत दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

महिला व बालविकास विभागाने योजनांची माहिती एका क्लिकवर मिळावी, यासाठी विभागाचे संकेतस्थळ युजर फ्रेंडली केले आहे. http://womenchild.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ मराठी; तसेच इंग्रजी भाषेत कार्यान्वित करण्यात आले. महाराष्ट्र सार्वजनिक सेवा हक्क अधिनियम आणि आरटीएस कायद्यांतर्गत अधिसूचित सेवांची यादी डाऊनलोड करण्यासाठी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### अंगणवाड्यांचे सक्षमीकरण

राज्यातील १३ हजार ११ मिनी अंगणवाडी केंद्रांमध्ये प्रधानमंत्री जन जाती महान्याय अभियान अंतर्गत १४५ अंगणवाड्या कार्यान्वित करण्यात आल्या. ९,६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. ३४५ अंगणवाड्यांमध्ये पाळणाघर सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही, ३३ हजार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अन्न व पोषण मापदंड प्रशिक्षण देण्यात आले. १० वन स्टॉप सेंटरला मान्यता देण्यात आली. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सुमारे ६४ लाख ५ हजार ९९८ लाभार्थ्यांना किमान ३०० दिवस पूरक पोषण आहार देण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले. अंगणवाडी सेविकांमार्फत गृहभेटी देऊन ९ लाख ३३ हजार ५४२ लाभार्थ्यांचे समुपदेशन करण्याबाबतचे उद्दिष्ट १०० टक्के साध्य करण्यात आले. अंगणवाडी केंद्रांमधील सर्व ४८ लाख ५९ हजार ३४६ लाभार्थी बालकांचे ग्रोथ मॉनिटरिंग करण्यात आले असून १०० टक्के ग्रोथ मॉनिटरिंगची नोंद पोषण ट्रॅकर



प्रणालीवर करण्यात आली.

प्रत्येक अंगणवाडी केंद्रामध्ये दरमहा दोन समुदाय विकास कार्यक्रम आयोजित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले असून सहा लाख ६२ हजार ९१६ समुदाय विकास कार्यक्रम घेण्यात आले आहेत. पोषण अभियान कार्यक्रमामध्ये पोषण माह व पोषण पंधरवडा कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवून (उपक्रमांची संख्या दोन कोटी ४५ लाख ८१ हजार ०९३) राज्याचा देशात प्रथम क्रमांक आला आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेंतर्गत एक लाख २१ हजार १३० अंणवाडी कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण मिळण्यासाठी प्रिमियमची एकूण रक्कम रुपये २.७६ कोटी खात्यावर जमा करण्यात आली आहे. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत सर्व पात्र एक लाख ८२ हजार ६४१ अंगणवाडी कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण मिळण्यासाठी प्रिमियमची एकूण रक्कम रुपये ३६.५२ लाख त्यांच्या खात्यावर जमा केली आहे. १७ हजार २५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली असून १३,५९५ अंगणवाडी केंद्रांचे श्रेणीवर्धन करून सक्षम अंगणवाडी केंद्रामध्ये रूपांतर केले आहे.

राज्यात एकूण ५३७ बालकांना दत्तक प्रक्रियेद्वारे हक्काचे कुटुंब मिळाले असून यामध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. तसेच बालविवाह रोखण्यासाठी जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेंतर्गत ३३१ बालविवाह रोखण्यात आले असून २७ प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला.

मुदतबाह्य अभिलेखांचे पुनर्विलोकन, जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंचे निर्लेखन करण्यात आले. आपले सरकार पोर्टलवरील मार्च २०२५ मध्ये ९६.७० टक्के तक्रार अर्जांचे निराकरण विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्यामार्फत करण्यात आले. तसेच पी.जी. पोर्टलवरील मार्च महिन्यात १००टक्के तक्रारींचे निराकरण करण्यात आले.

### विधि कक्ष

विभागामार्फत दर महिन्याला क्षेत्रीय स्तरावर महिला लोकशाही दिन साजरा करण्यात येतो. कार्यालयात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा, कार्यालयात स्तनदा मातांकरिता हिरकणी कक्ष, अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतीक्षालय, कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण करण्यात आलेले आहेत.

कार्यालयीन कामकाजासाठी ई-ऑफिस वापरणे, प्रसारमाध्यमांमध्ये शासनाच्या विरोधात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांबाबत आवश्यक ते स्पष्टीकरण तातडीने देणे, अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, सेवाविषयक, न्यायालयीन बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येतो. विभागामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा वेळेत निपटारा होण्यासाठी उपसचिव (विधि) यांच्या अध्यक्षतेखाली विधि कक्ष निर्माण करण्यात आला.

### महत्त्वपूर्ण निर्णय

- अवघ्या ३ महिन्यांत २.४७ कोटी महिलांना थेट DBTद्वारे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत आर्थिक लाभ देण्यात आला.
- ५० लाख महिलांचे आधार-सीडिंग करून योग्य लाभवितरण सुनिश्चित.
- पोषण अभियानांतर्गत २.४५ कोटी लोकसहभागी उपक्रम, ५१ हजार SAM बालकांवर उपचार.
- ३७ हजार सेविकांचे प्रशिक्षण, तीन हजार ५९५ शहरी बालविकास केंद्रे (UCDC).
- डिजिटल यश आणि पारदर्शक प्रशासन अंतर्गत E-Office प्रणालीचा ८५% वापर, RTI व RTS अद्ययावत व ९५% तक्रारी वेळेत निकाली.
- २० लाख महिलांना माविम व नवतेजस्विनी योजनेतून उद्योजकतेकडे वाटचाल.
- Amazon, ONDC, GIZ यांसारख्या संस्थांसोबत भागीदारी.
- राज्य शासन व केंद्र शासन यामध्ये समन्वयाची प्रभावी अंमलबजावणी
- विविध योजनांचे उद्दिष्ट १००% पार, अन्न व पोषण, गृहभेटी, ग्रोथ मॉनिटरिंग यामध्ये संपूर्ण साध्यता.

### महिला उद्योजकांच्या पंखात बळ

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत डाटा ॲनालिसेस कार्याकरिता पावर बी डॅशबोर्डचा वापर करण्यात आला. महिला आर्थिक विकास महामंडळ हे १.५० लाख बचतगटांच्या माध्यमातून राज्यातील २० लाख महिलांकरिता काम करत आहे. साधारण ३० टक्के महिला उद्योजक या नात्याने विकसित होत आहेत. याचबरोबर व्यापारी, कामगारवर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे, माविमने भागीदारी केलेल्या ॲमेझॉन, ओएनडीसी ऑनलाइन प्लॅटफॉर्म बचतगटांची उत्पादने अपलोड करण्यासाठी विविध संस्थांची मदत घेणे. अशा विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी आणि जास्तीत जास्त योजनांचा लाभ महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यालयाच्या कामकाजात होणाऱ्या अद्ययावतीकरणात महिला व बालविकास विभाग अव्वल ठरला आहे.

### १५० दिवसांच्या कार्यक्रमात विभागाच्या उन्नतीचे चित्र साकारणार

भविष्यातही लोकाभिमुख आणि पारदर्शक काम करण्यास प्रोत्साहन मिळावे, यासाठी ६ मे ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. शासकीय सेवेमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून विविध उपक्रम राबवल्यास 'विकसित महाराष्ट्र २०४७' चा आराखडा तयार करणे सुलभ होणार आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' मध्ये १६ शासकीय विभागांचे एकत्रीकरण करून संबंधित विभागांमध्ये अल्प व दीर्घ कालावधीत उद्दिष्ट आणि त्याची पूर्तता विभागातील आव्हाने, बलस्थाने यावरती काम केले जाणार आहे. १५० दिवसांच्या सेवाविषयक प्रशासकीय सुधारणांमध्ये Ease of Living मध्ये कार्यालयीन सेवा अधिक सुलभ करणे, Ease of Doing Business प्रत्येक व्यावसायिक सेवा अधिक सुलभ करणे, G2G - Ease of Working राज्यांतर्गत आणि केंद्रांच्या विविध विभागांशी समन्वय साधणे याचा समावेश असणार आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

**राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे 'अटल' (Assessment Test and Learning) उपक्रम राबवण्यात येत असून, विद्यार्थ्यांना मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्ट्सद्वारे परीक्षेचा सराव करता येतो. या चाचण्यांमुळे केवळ परीक्षेची तयारीच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवड आणि आत्मविश्वास वाढविण्यास मदत होते.**

# विद्यार्थ्यांसाठी 'अटल' उपक्रम

**चंद्रकांत पाटील,**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनाही राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे 'अटल' (Assessment Test and Learning) या उपक्रमामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांची तयारी करता येते. परीक्षांचे वेळापत्रक, अभ्यासक्रमाची माहिती आणि मार्गदर्शन या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होते. परीक्षेपूर्वी मिळणाऱ्या प्रभावी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम व भीती दूर होऊन त्यांच्यात सकारात्मकता व आत्मविश्वास निर्माण होतो.

## राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षांच्या संभाव्य तारखा प्रसिद्ध करून या अभ्यासक्रमांच्या नोंदणी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. सर्वाधिक नोंदणी असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि कृषी तंत्रज्ञान, एमबीए; तसेच विधि, बी.एड. अभ्यासक्रमांच्या नोंदणीप्रक्रियेला उमेदवारांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

## सामायिक प्रवेश परीक्षा २०२५

बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस/एमबीए (इंटिग्रेटेड) आणि एमसीए (इंटिग्रेटेड) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी अनिवार्य असून, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बीबीए / बीसीए / बीबीएम / बीएमएस / एमबीए (इंटिग्रेटेड) आणि एमसीए (इंटिग्रेटेड) या अभ्यासक्रमास व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून मान्यता मिळाल्यानंतर या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सीईटी कक्षामार्फत महा-बीबीए / बीसीए / बीबीएम / बीएमएस एमबीए (इंटिग्रेटेड) / एमसीए (इंटिग्रेटेड) ही सीईटी प्रथमच घेण्यात आली होती. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता महा-बीबीए / बीसीए / बीबीएम / बीएमएस या सीईटीची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून प्रवेश घेण्याकरिता उमेदवारांना सीईटी देणे अनिवार्य आहे.

## विधि सामायिक प्रवेश परीक्षा १२० गुणांची

राष्ट्रीय स्तरावर CLAT २०२५ प्रमाणेच महाराष्ट्र राज्यात विधि परीक्षा सुधारित गुण योजना लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून विधि ३ व ५ वर्षे अभ्यासक्रमांसाठी सीईटी घेण्यासाठी गुणांकन योजनेत सुधारणा केली असून सीईटी १५० गुणांऐवजी १२० गुणांसाठी घेतली जाणार आहे. विधि सीईटीचा अभ्यासक्रम, घटकनिहाय गुणांकन आणि परीक्षेचा कालावधी पूर्वीप्रमाणेच म्हणजे १२० मिनिटे असेल.

## एम.आर्च अभ्यासक्रमासाठी सीईटी अनिवार्य

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत एम.आर्च सीईटी २०२५ ही आयोजित करण्यात येणार नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एम.आर्च या अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांना केंद्रीय स्तरावरून कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणारी PGETA (POST GRADUATE ENTRANCE TEST IN ARCHITECTURE) ही सीईटी लागू राहणार आहे.

## सीईटी-अटल

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून घेण्यात येणाऱ्या सीईटीसाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रथमच CET-ATAL (Assessment Test and Learning) Mock Test and Psychometric Test Module सुरू करण्यात आले आहे. या मॉड्यूलचा फायदा उमेदवारांना त्यांच्या अभ्यासक्रमाच्या सामायिक परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांचा सराव करण्यासाठी होईल. त्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष सामायिक प्रवेश परीक्षा देतानाचा आत्मविश्वास वाढेल. तसेच Psychometric Test चा फायदा त्यांना त्यांचे करिअर निवडण्यास होईल.

यंदा विविध अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षांसाठी अंदाजे १३ लाख उमेदवारांनी अर्ज भरून निश्चित केलेला आहे. यापैकी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व कृषी शिक्षण अभ्यासक्रमासाठी ७ लाख ६५ हजार, एमबीए/एमएमएस - १ लाख ५७ हजार, एमसीए - ५६ हजार, एलएलबी ३ वर्षे - ९१ हजार, बी.एड - १ लाख १६ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.

## परीक्षा केंद्रांवरील सीसीटीव्ही सुविधा

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबवण्यात येणाऱ्या सीईटी सुरळीतपणे व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी उमेदवारांना परीक्षा केंद्रात प्रवेश देतेवेळी बायोमेट्रिक, क्युआर कोड स्कॅनिंग; तसेच परीक्षेदरम्यान प्रत्येक परीक्षा केंद्रावर लाईव्ह सीसीटीव्ही कॅमेराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**अधिक माहिती :**
https://cetcell.mahacet.org/
**सीईटी कक्ष हेल्पलाइन क्रमांक :**
०२२-२२०१६१५३/५७/५९

**शब्दांकन : काशीबाई थोरात,**
(विभागीय संपर्क अधिकारी)

**सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभांवर उभारलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण संविधानिक मूल्यांवर आधारित असून सन २०३० पर्यंत साध्य करावयाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांशी जोडले गेले आहे.**

# राष्ट्रीय शिक्षण धोरण : शाश्वत विकासाकडे वाटचाल

**ब्रिजकिशोर झंवर**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे एकविसाव्या शतकातील पहिले शिक्षण धोरण आहे. स्वातंत्र्योत्तर काळात १९६४-१९६६ मध्ये कोठारी आयोग व १९८६ मध्ये आलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण यामुळे राज्य व देशातील शिक्षणामध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्या आहेत.

आता जवळपास ३४ वर्षांनंतर राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० ला मंजुरी देण्यात आली आहे. या नवीन धोरणामध्ये पूर्वीच्या १०+२+३ या रचनेमध्ये बदल करून ५+३+३+४ याप्रमाणे रचनात्मक बदल करण्यात आला आहे. यामध्ये पायाभूत स्तरापासून पदवी स्तरापर्यंतच्या शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे.



राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू आहे. सर्वांना सहज शिक्षण, समता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच मूलभूत स्तंभावर उभारलेले हे धोरण संविधानिक मूल्यांवर आधारित आहे. तसेच सन २०३० पर्यंत साध्य करावयाच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांशी हे धोरण जोडले गेले आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, यांच्यामार्फत तयार करण्यात आलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४; तसेच राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्याटप्प्याने लागू करण्यास शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे.

## धोरणाच्या अंमलबजावणीसाठी समित्या

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० च्या अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्याच्या अनुषंगाने शालेय शिक्षण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. तसेच या शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० अनुसार ५+३+३+४ आकृतिबंधातील शिक्षणाचे प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन व शिक्षण (ईसीसीई) यावर आधारित पायाभूत स्तर; तसेच शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण या घटकांचे अवलोकन करून राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

## स्तरांची रचना

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या स्तरांऐवजी पायाभूत स्तर, पूर्वतयारी स्तर, पूर्व माध्यमिक स्तर, माध्यमिक स्तर हे शब्द वापरण्यात येणार आहेत. पायाभूत स्तरामध्ये तीन ते आठ वयोगटाच्या विद्यार्थ्यांचा आणि बालवाटिका एक, दोन, तीन; तसेच इयत्ता पहिली व दुसरीचा समावेश असेल. पूर्वतयारी स्तरामध्ये आठ ते ११ या वयोगटाचा आणि इयत्ता तिसरी ते पाचवीचा समावेश असेल. पूर्व माध्यमिक स्तरामध्ये ११ ते १४ या वयोगटाचा आणि इयत्ता सहावी ते आठवीचा समावेश असेल. तर, माध्यमिक स्तरामध्ये वय वर्ष १४ ते १८ आणि इयत्ता नववी ते बारावी या इयत्तांचा समावेश असेल.

## नवीन अभ्यासक्रम अंमलबजावणीचे टप्पे

राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमाची

## अभ्यासक्रम आराखडा

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ आधारित तयार केलेल्या पुस्तकांचा देशातील २३ राज्यांकडून वापर करण्यात येत आहे. या पाठ्यपुस्तकांची निर्मिती देशभरातील विविध क्षेत्रातील नामवंत, अनुभवी तज्ज्ञ यांच्याकडून करण्यात आली आहे. या पाठ्यपुस्तकांवर आधारित राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांची तयारी केली जाते. देशभरात ही पाठ्यपुस्तके विविध मंडळांच्या शाळांमधून वापरण्यात येतात. राज्यस्तरीय सुकाणू समिती, शिक्षण क्षेत्रातील नामवंत व अनुभवी तज्ज्ञ यांनी साकल्याने विचार करून महाराष्ट्र राज्यातही राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तयार केलेली इयत्तानिहाय त्या-त्या विषयाची पाठ्यपुस्तके टप्प्याटप्प्याने आवश्यक त्या बदलांसह व संदर्भीकरणासह वापरण्याचे निश्चित केले आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२२ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम २०२४ हे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यामार्फत तयार करण्यात आले आहेत. तसेच, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२३ वर आधारित राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ तयार करण्यात आला आहे. शालेय शिक्षण अभ्यासक्रम २०२५ ची निर्मिती सुरू आहे.

अंमलबजावणी राज्यातील शाळांमध्ये सर्व संबंधित विभागांमार्फत २०२५-२६ पासून टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिलीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल. २०२६-२७ या वर्षांमध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल. २०२७-२८ मध्ये इयत्ता पाचवी, सातवी, नववी आणि अकरावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल, तर २०२८-२९ मध्ये इयत्ता आठवी, दहावी आणि बारावीच्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी होईल.

बालवाटिका १, २, ३ राबविण्याविषयी महिला व बालविकास विभागाच्या सहमतीने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे.

## अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्मिती

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांच्या आधारे राज्याच्या गरजा लक्षात घेऊन राज्यासाठीचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करण्यात येत आहे. संबंधित स्तराचे अंतिम पाठ्यसाहित्य निर्मितीसाठी बालभारतीस विहित वेळेत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नवीन अभ्यासक्रम पहिल्यांदाच लागू होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यासक्रम संबंधित सर्व इयत्तांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत तयार करून तो आवश्यक त्या सर्व वर्षांमध्ये वापरण्यात येईल.

## पाठ्यपुस्तके व पाठ्यसाहित्य

राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्यासाठी आवश्यक असे सर्व बदल करून स्वीकारण्यात येणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत नमूद पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, शिकणे हे सर्वांगीण, एकात्मिक, आनंददायक आणि रंजक असणे, आवश्यक शिक्षण आणि तार्किक विचारसरणी वाढवण्यासाठी अभ्यासक्रमाचा मजकूर कमी करणे, अनुभवात्मक शिक्षण इत्यादी बाबींचा अंतर्भाव अभ्यासक्रमामध्ये असणार आहे. तसेच मूल्यमापन, अध्यापन पद्धती, वेळापत्रक, निरीक्षण व सनियंत्रण, शिक्षकांचे प्रशिक्षण इ. सर्वांगीण बाबींमध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत आवश्यक त्या सुधारणा निर्गमित केल्या जातील.

बालभारतीची पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी पाठ्यपुस्तक निर्मितीमध्ये वेळोवेळी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संबंधित विभागप्रमुख व विषयतज्ज्ञ यांचा सहभाग असेल. ही



पाठ्यपुस्तके निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तींची पूर्तता करणारी व अंमलबजावणीसाठी योग्य आहेत किंवा कसे याची पडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत केली जाईल. त्यानंतर सदर अंतिम पाठ्यपुस्तकांना शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समन्वय समितीची मान्यता घेऊन पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी केली जाईल.

अंमलबजावणी वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय पाठ्यपुस्तके आवश्यक सर्व माध्यमांत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांची राहणार आहे. तर पाठ्यपुस्तकांना पूरक साहित्य, हस्तपुस्तिका इ. निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत करण्यात येईल.

तसेच बालवाटिका १, २, ३ चा पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य, आशय इ. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती कार्यालयामार्फत तयार करून महिला व बालविकास विभागाकडे छपाई व वितरणासाठी सुपुर्द केली जाईल.

## मूल्यमापन

राष्ट्रीय शिक्षण धोरण व राज्य अभ्यासक्रम आराखड्यांमधील तरतुदीनुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत शालेय विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापनविषयक मार्गदर्शक सूचना स्वतंत्ररीत्या निर्गमित केल्या जाणार आहेत.

त्यासाठी समग्र प्रगतिपत्रकाचा (Holistic Progress Card) आधार घेतला जाईल.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) २०२४ व राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ यामध्ये सुचवलेल्या दैनिक, साप्ताहिक, वार्षिक वेळापत्रकानुसार, इयत्तानिहाय, विषयनिहाय निश्चित केलेल्या तासिकांची संख्या व कालावधीनुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सत्र निश्चितीचा कालावधी हा प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालकांमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांच्या सल्ल्याने निश्चित केला जाईल. द्वितीय सत्र अखेरचे संकलित मूल्यमापन/ वार्षिक परीक्षा या सत्राअखेरच घेण्यात येतील आणि त्यांचे वेळापत्रक आवश्यकतेनुसार प्राथमिक / माध्यमिक शिक्षण संचालकांमार्फत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालकांच्या सल्ल्याने निर्गमित केले जाईल. एकूणच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे शाश्वत विकासाच्या ध्येयांशी जोडले गेले असून शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणणारे ठरेल, हे निश्चित.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

**वाळू उत्खननासाठी परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळविणे हा एकमेव उद्देश नसून, विकासकामांसाठी; तसेच नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी, हा प्रमुख उद्देश आहे.**

# वाळू निर्गती धोरण

**ब्रिजकिशोर झंवर**

विकासकामे व नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी; नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व आणि तुटवडा विचारात घेऊन काँक्रिटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने राज्य शासनाने नुकतेच सुधारित वाळू निर्गती धोरण जाहीर केले आहे.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ मध्ये, नाला, नदी व खाडीपात्रातील वाळू / रेतीच्या निर्गतीबाबत तरतुदी केल्या असून 'लिलाव, विनियोग इत्यादींच्या अटी व शर्ती यासंबंधातील कार्यपद्धती शासनाकडून वेळोवेळी सूचनांच्याद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल,' अशी तरतूद केली आहे. यानुसार वाळू डेपोमधून वाळू उपलब्ध करून देण्यास क्षेत्रीय स्तरावर आलेल्या अडचणी, डेपोपद्धती व लिलावपद्धती यामधील गुण-दोष; तसेच विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालातील वाळू निर्गती धोरणाच्या अनुषंगाने हरकती/सूचना; तसेच त्यानंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन मंत्रिमंडळाच्या मान्यतेने वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर करण्यात आले आहे.

स्थानिक वापर व घरकुलासाठी सहज व सुलभतेने वाळू उपलब्ध करणे, पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना हातपाटी-डुबी पद्धतीने विनालिलाव पद्धतीचा वापर करून वाळूगट उपलब्ध करून देणे, खासगी शेतजमिनीमध्ये नैसर्गिक कारणांमुळे अथवा इतर कारणांमुळे जमा झालेली वाळू निष्कासन करून शेतजमीन लागवडीयोग्य करणे, नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व, नैसर्गिक वाळूचा तुटवडा या बाबी विचारात घेऊन कोणत्याही काँक्रिटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देऊन जास्तीत जास्त कृत्रिम वाळूचा वापर करणे, पर्यावरण अनुमतीप्राप्त वाळूगटामधून खाडी व नदीपात्रातील वाळूगटांसाठी लिलाव प्रक्रियेचा अवलंब करून वाळू उत्खनन करणे व मोठ्या खाणींमधील ओव्हर बर्डनमधून निघणाऱ्या वाळूचा वापर करणे यासाठी सध्याच्या वाळू धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. वाळू उत्खननासाठी परवाना देण्यामागे वाणिज्यिक किंवा महसूल मिळवणे हा एकमेव उद्देश नसून विकासकामांसाठी; तसेच नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी सुलभतेने वाळू उपलब्ध व्हावी हा प्रमुख उद्देश आहे. तसेच नदीपात्रात वाळू साठल्याने आजूबाजूच्या परिसरात पूरसदृश परिस्थिती उद्भवू नये, यासाठीदेखील वाळूचे उत्खनन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## वाळूगटांचे सर्वेक्षण व निश्चिती

महाराष्ट्र सागरी किनारपट्टी क्षेत्रातील नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेतीचे निष्कासन, नदीपात्रामधील वाळूचे निष्कासन, स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी वाळू निर्गती करणे, मोठ्या खाणीमधील ओव्हर बर्डनमधून उपलब्ध करून उपलब्ध होणारी वाळू विकास कामांसाठी; तसेच नागरिकांना वैयक्तिक वापरासाठी उपलब्ध करण्यासाठी जिल्हास्तरीय वाळू सनियंत्रण समिती वाळूगट निश्चित करणे याचा धोरणात समावेश करण्यात आला आहे.

वाळू निर्गती धोरणात विविध समित्यांचा समावेश करण्यात आला आहे. नदीपात्रातील वाळू गटांचे स्थळ निरीक्षण करण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक उपसमिती स्थापन करण्यात आली आहे, तर प्रत्येक तालुक्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय, तर प्रत्येक जिल्ह्यामध्ये वाळू निर्गतीसंबंधी संपूर्ण प्रक्रियेचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली वाळू संनियंत्रण समिती गठित करण्यात येईल.

## घरकुलांसाठी वाळू निर्गती

ग्रामपंचायत हद्दीमधील वाळू स्थळातून वाळू उत्खननांकरिता केंद्र शासनाच्या पर्यावरण व नववातावरणीय बदल मंत्रालयाकडील अधिसूचनेनुसार ग्रामपंचायतीस व त्यांच्या वैयक्तिक वापराकरिता किंवा सामुदायिक कार्याकरिता वाळू उपलब्ध करून देण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. ग्रामपंचायत हद्दीमधील वाळू स्थळातून वाळू उत्खननाकरिता केंद्रीय अधिसूचनेनुसार निश्चित वाळू गट; तसेच ज्या वाळूगटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे व जे वाळू गट लिलावामध्ये गेलेले नाही असे नदी, नाले, ओढे इत्यादींमधील वाळू गट स्थानिक वापरासाठी व घरकुलांसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखालील समिती निश्चित करेल. अर्जदारांनी वाळू मागणी करताना आवश्यक असलेल्या वाळूचे परिमाण व ज्या ठिकाणी बांधकाम करण्यात येणार आहे, त्या ठिकाणच्या नाव, पत्ता व बांधकाम आराखडा इत्यादी कागदपत्रांसह महा खनिज या संगणक प्रणालीवर ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

## पर्यावरण अनुमती व ग्रामसभेची शिफारस

वाळूगटांच्या लिलावपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांकडून खाडीपात्रासाठी तीन वर्ष कालावधीचा व नदीपात्रासाठी दोन वर्ष कालावधीचा खाणकाम आराखडा तयार करून पर्यावरण विभागामार्फत अनुमती

घेण्यात येईल. खाडीपात्रातील वाळू गटांसाठी सीआरझेड क्षेत्रात वाळू उत्खनन प्रतिबंधित आहे. तथापि सीआरझेड क्षेत्रात जलमार्ग साफ/सुकर करणे ही बाब अनुज्ञेय असून त्यासाठी एमसीझेडएमएची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. लिलावधारकाला इरादा पत्र दिल्यानंतर एक आठवड्याच्या आत पर्यावरण अनुमती संबंधित लिलावधारक यांच्या नावे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरणाकडे सादर करण्यात येईल. तसेच लिलावासाठी प्रस्तावित केलेल्या सर्व वाळूगटांसाठी जनसुनावणी घेणे बंधनकारक राहणार आहे. पंचायत विस्तार अधिनियमानुसार वाळू गटांकरिता अनुसूचित क्षेत्रामधील नदीपात्रातील ग्रामसभेची शिफारस घेणे अनिवार्य असून इतर क्षेत्रांसाठी ग्रामसभेची शिफारस अनिवार्य राहणार नाही.



### कृत्रिम वाळू

नैसर्गिक वाळूचे पर्यावरणीय महत्त्व व तुटवडा या बाबी विचारात घेऊन काँक्रिटच्या बांधकामामध्ये कृत्रिम वाळूच्या वापरास प्रोत्साहन देण्यात येणार आहे. त्यासाठी जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम व शासनाच्या इतर विभागांच्या बांधकामांमध्ये लागणाऱ्या एकूण वाळूच्या किमान २० टक्के कृत्रिम वाळू वापरणे बंधनकारक करण्यात येणार आहे. सुरुवातीला हे प्रमाण २० टक्के करण्यात येऊन पुढील तीन वर्षांपर्यंत १०० टक्के कृत्रिम वाळू बंधनकारक करण्यात येईल. तसेच जिल्ह्यातील खासगी बांधकामांमध्येदेखील कृत्रिम वाळूचा वापर केला जाईल. यासाठी जिल्हास्तरीय समितीमार्फत प्रयत्न करण्यात येतील. कृत्रिम वाळूच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने स्वतंत्र कृत्रिम वाळू धोरण तयार करण्यात येत आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

# संवाद वाणिज्यदूतांसोबत...

मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असण्यासोबतच देशाची आर्थिक आणि व्यावसायिक राजधानी आहे. जगभरातील विविध देशांचे वाणिज्य दूतावास मुंबईमध्ये कार्यरत आहेत. या देशांना राज्य शासनाशी संपर्क साधण्यासाठी 'Point of Contact' म्हणून राजशिष्टाचार विभाग कार्य करत आहे. या सर्व वाणिज्यदूतांशी एकत्रित भेट आणि चर्चा घडवून आणण्याच्या उद्देशाने राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी विभागामार्फत महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे स्वागत समारोहाचे आयोजन केले.



राज्य शासनाच्या या समारोहात मुंबईतील विविध ७० देशांच्या सहभागी झालेल्या वाणिज्यदूत व मानद वाणिज्यदूत यांचे राज्यामार्फत त्यांना जगप्रसिद्ध 'हापूस' आंबा भेट देऊन आदरातिथ्य करण्यात आले. राजशिष्टाचार विभागामार्फत या दूतावासांच्या माध्यमातून परस्पर संबंध जोपासले जातात. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या पुढाकाराने हे संबंध वृद्धिंगत होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. हा समारोहदेखील याचाच एक भाग होता. भारताच्या 'फाईव्ह ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी'च्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नपूर्तीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्राचा वाटा 'एक ट्रिलियन'चा असणार आहे, त्यादृष्टीने राज्य शासनामार्फत वाटचाल सुरू आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धीचा यामध्ये महत्त्वपूर्ण सहभाग असणार आहे, हे लक्षात घेऊन राजशिष्टाचार मंत्री श्री.रावल यांनी पदभार स्वीकारल्यापासून आतापर्यंत युएई, सायप्रस, महाराष्ट्र युरोपियन युनियन, व्हिएतनाम, जिबूती, अर्जेंटिना आदी देशांच्या वाणिज्यदूतांशी संवाद साधला आहे. येत्या काळात मुंबईतील सर्व वाणिज्यदूतांशी संवाद साधण्याचे त्यांचे नियोजन असून या माध्यमातून परस्पर सौहार्दाचे संबंध वृद्धिंगत करण्याबरोबरच विशेषत: राज्यातील कृषी उत्पादनांच्या निर्यातीमध्ये वाढ आणि राज्यात विदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे, यासाठी प्रयत्न केला जात आहे.

राज्यातील गुंतवणूक असो अथवा राज्यातून होणारी निर्यात असो, यासाठी वाणिज्यदूत महत्त्वाची भूमिका बजावतात. यादृष्टीने त्यांना विविध विभागांशी जोडून देणारा दुवा म्हणून राजशिष्टाचार विभागाची मोलाची भूमिका असते. ही बाब विचारात घेऊन राजशिष्टाचार विभागाने या समारोहामध्ये राज्याच्या विविध विभागांच्या मंत्री आणि अपर मुख्य सचिवांना निमंत्रित करून त्यांच्याशी वाणिज्यदूतांचा संवाद घडवून आणला. विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, राजशिष्टाचार विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्रशासक भूषण गगराणी यांसह विविध विभागांच्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांचा यामध्ये सहभाग होता.

राजशिष्टाचार विभागाच्या वतीने राजभवनच्या हिरवळीवर पहिल्यांदाच आयोजित केलेल्या या समारोहाने विविध देशांच्या वाणिज्यदूतांना राज्य शासनाच्या सकारात्मक धोरणाची प्रचिती आली असून भविष्यात आर्थिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञान, व्यापारीक अशा विविध पातळीवर परस्परसंबंध वाढण्यासाठी हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार आहे, हे निश्चित.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन







**नरेंद्र मोदी**
प्रधानमंत्री

**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना

## महिला स्टार्टअप साठी निकष आणि पात्रता

- उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (DPIIT) मान्यताप्राप्त महाराष्ट्रातील स्टार्टअप असावेत.
- महिला संस्थापक यांचा किमान ५१ % वाटा असावा.
- कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयांतर्गत १ एप्रिल २०२४ पूर्वीची नोंदणी आवश्यक.
- वार्षिक उलाढाल १० लाख ते १ कोटी पर्यंत असावी.
- आश्वासक,नाविन्यपूर्ण,प्रभावी व रोजगार निर्मिती करणाऱ्या स्टार्टअप्सना प्राधान्य.
- राज्य शासनाच्या इतर योजनेतील अनुदान स्वरूपातील आर्थिक लाभ घेतलेला नसावा.
- अर्ज करण्यासाठी इच्छुक स्टार्टअप्सनी www.msins.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.
- योजनेसाठी ₹१०० कोटी इतक्या निधीची तरतूद.



**देवेंद्र फडणवीस**
मुख्यमंत्री

**एकनाथ शिंदे**
उपमुख्यमंत्री

**अजित पवार**
उपमुख्यमंत्री

**मंगल प्रभात लोढा**
मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासन**

R.N.I.No. 14140

आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

---

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**केशव करंदीकर**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक केशव करंदीकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह